# प्रकरण चार

## ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

**4.300 पाणी टंचाईग्रस्त भागात टँकरने पाणी पुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती मुरबाड, जिल्हा ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ठेकेदाराने टँकर पुरवठा करतांना टॅकरची 10 मे.टन व 12 मे.टन क्षमता असलेबाबत परिवहन अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असतांना संचिकेत उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा यांचे प्रमाणपत्र संचिकेत दिसून येते.

2) कार्यालयीन टिपण क्रमांक 2 मधील परिच्छेदानुसार पंचायत समितीचे पत्र क्रमांक पसमु/ ग्रापावुवि/वशी-182, दिनांक 04/04/2016 अन्वये इंधनासाठी रक्कम रुपये 7,00,000/- तरतुदीची मागणी करण्यात आलेली आहे. सदर टँकरना इंधन खर्चासाठी सन 2016-2017 या आर्थिक वर्षात डिझेल व इंधन खर्चासाठी शासनाकडून पाणी टंचाई निवारणासाठी लेखाशिर्ष 22450413 खाली शासनाकडून निधी उपलब्ध होईपर्यंत जिल्हा निधीतून 8-अग्रिम सी-डिपॉझिट या लेखाशिर्षामधून तात्पुरत्या स्वरुपात प्रती टँकर रूपये 35,000/- अग्रीम मंजूर करण्यात आले आहे. सदरचे अग्रीम मंजूर झालेनंतर शासनाकडून अनुदान प्राप्त झालेनंतर समायोजन करणे आवश्यक आहे. सदरचे समायोजन झाल्याचे दिसून येत नाही.

3) कार्यालयीन टिपण क्रमांक 3, दिनांक 17/06/2016 अन्वये टंचाईग्रस्त गांवाना/ पाडयांना पाणी पुरवठा करणेसाठी 17 गावे व 34 पाडयांना 7 टँकर मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यापैकी ठेकेदाराने 5 टँकर उपलब्ध करुन दिलेले आहेत. सदर टँकरना स्वरा पेट्रोल पंप शिवळे येथून उधारीवर इंधन खरेदी केल्याचे कार्यालयीन टिपणमध्ये नमूद आहे. सदर देयक रुपये 5,01,000/- एवढे आहे. पंचायत समिती, मुरबाडचे पत्र क्रमांक पसमु/ग्रापापुवि/वशी-182, दिनांक 04/04/2016 अन्वये प्रती टँकर रुपये 35,000/- गटविकास अधिकारी, पंचायत समिती स्तरावर माहे एप्रिल, मे, व जून या तीन महासाठी मे. स्वरा पेट्रोलियमन शिवळे यांनी दिनांक 02/06/2016 रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुरबाड यांचेकडे 5 टँकरचे डिझेल बील मिळणेसाठी रुपये 5,01,000/- मागणी केली आहे. त्यानुसार प्रमाणक क्रमांक 03/20-5-2016 अन्वये रुपये 35,000/- प्रमाणे प्रती टँकरचे 1,75,000/- व प्रमाणक क्रमांक 01/2-6-2016 अन्वये रुपये 5,00,000- अदा 8-अग्रिम सी-डिपॉझिट मधून अदा करण्यात आले आहे. मे.स्वरा पेट्रोलियम शिवळे यांनी मागणी केलेल्या डिझेल बिल पावत्या सादर करणे आवश्यक असतांना सादर केलेले नाही. त्यामुळे डिझेल बिलाची लेखापरीक्षणास खात्री पटत नाही.

4) ठेकेदाराने टँकर क्रमाक एमएच-10-झेड-4212 हा टँकर 12,000 मे.टन नसून 24,000 मे.टन क्षमतेचा आहे. सदर टँकर दिनांक 30/04/2016 ते 27/06/2017 पर्यंत दररोज एक खेप पाणी पुरवठा करणेकामी कार्यरत होता. लोकसंख्येनुसार 12,000 मे.टन पाणी प्रती दिन गरज असतांना 24,000 मे.टन दर्शवून दररोज पाणी पुरवठा करण्यात आल्याचे दिसून येते. सदरचा टँकर एक दिवसाआड पाणी पुरवठा करणे आवश्यक असतांना दररोज एक खेप पाणी पुरवठा करण्यात आला आहे. ठेकेदाराकडून दिनांक 30/04/2016 ते 27/06/2016 कालावधीचे प्रती दिन भाडे रुपये 1,884/- प्रमाणे रुपये 1,07,388/- वसुल करुन शासन खाती भरणा करण्यात यावे.

**4.301 कोर्लई येथे पाईप लाईन टाकणे तालुका मुरुड**

**पंचायत समिती मुरूड, जिल्हा रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** कोर्लई येथे पाईप लाईन टाकणेकरीता रक्कम रूपये 2,57,783/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व लेखा संहिता 1968 चे नियम 197 प्रमाणे पूर्ण कामाच्या नोंदी नमूना नंबर 69 मध्ये घेणे आवश्यक असताना तसे केलेले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67(1) प्रमाणे कामांची प्रगती नोंदवही नमूना नंबर 23 मध्ये नोंदी घेणे आवश्यक असताना तसे केलेले नाही.

3) प्रशासकीय मान्यता अटी व शर्ती नुसार सदर काम इतर कोणत्याही योजने अंतर्गत मंजूर नसल्याचे प्रमाणपत्र नस्तीत तपासणीस उपलब्ध झाले नाही.

4) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, राजपत्र दिनांक 11/05/2015 अन्वये अनुसूची एक नुसार स्वामित्वधनाचे दर प्रती ब्रास रुपये 400/- करण्यात आले आहे. सदर देयकातून जुन्या दराने (रुपये 200/-) वसुली केल्याने कमी वसुली केलेली रक्कम रूपये 731/- वसुली करून अनुपालन दाखवावे.

5) महाराष्ट्र बांधकाम नियमावली 1984 मधील नियम 296 (ब) नुसार माहे फेब्रुवारी / मार्चमध्ये कोणतेही कामाचे आदेश निर्गमित करू नयेत. असे असताना सदर कामाचे आदेश दिनांक 17/03/2016 रोजी देण्यात आलेले आहेत.

6) करारनामा विहित मुद्रांकावर करतेवेळी सर्व अटी व शर्ती करारनाम्यात निर्दिष्ट करून करारनामा आवश्यक होते. करारनाम्यावर व बी -1 नमुन्यावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक असताना तसे केलेले नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व लेखा संहिता 1968 चे नियम 166(4) नुसार मोजमाप पुस्तकातील नोंदी अचूक व सुस्पष्ट करणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तकात शेवटी कामावर वापरलेल्या साहित्याचा एकत्रित गोषवारा काढणे आवश्यक असताना तसे केलेले नाही.

8) महाराष्ट्र उपकर नियम 2007 (रोजगार विनियमन व सेवा शर्ती) व महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009 प्र.क्र.108/ कामगार 7अ, दिनांक 17/06/2010 अन्वये 1 टक्के उपकर वसूल केलेला नाही. रक्कम रूपये 2,973/- ठेकेदाराकडून वसूल करून शासन निधीत जमा होणे आवश्यक आहे.

9) ग्रामपंचायत काम मागणी पत्रावर दिनांक नमूद नाही.

10) मोजमाप पुस्तिका बाब क्रमांक 02 नुसार H D P E पाईप 1215 RMT खरेदी केला आहे. बाब क्रमांक 06 नुसार खोदाई भरणा 810 RMT करून पाईप बसविला आहे. म्हणजेच 405 RMT अनावश्यक जादा पाईप खरेदी करून दर रूपये 168.70 प्रमाणे एकूण रक्कम रूपये 68,328/- चे जादा प्रदान वसुली करून अनुपालन दाखवावे.

**4.302 पाणी टंचाई अंतर्गत टँकरने पाणीपुरवठा करणेकामी केलेल्या खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रुपये 7,21,156/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-2012/प्र.क्र.53/पापु.14, दिनांक 30/04/2012 चे परिच्छेद 02 नुसार पाणीपुरवठा करणा-या टँकर / टँकरवरील टाकीची पाणी वहन क्षमता आर.टी.ओ. मार्फत प्रमाणित करुन घ्यावी. असे असतांना पंचायत समितीकडून अशी कार्यवाही केलेचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर टँकर / टँकरवरील टाकी 5,000 लीटर क्षमतेची होती, याची लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.

2) अधिग्रहीत केलेल्या वाहनाच्या नोंदवहीप्रमाणे नोंदविलेल्या पाण्याचे उद्भव ठिकाण ते पाणी पोहोच करण्याचे गांव म्हणजेच पोहोच ठिकाण हे किलोमीटर अंतर शाखा अभियंता अथवा उपअभियंता यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. असे असतांना जे अंतर नोंदविले आहे, ते मोघम स्वरुपाचे दिसून येते व त्याप्रमाणे इंधन वापर झालेचे दर्शविले आहे. तरी नोंदवहीप्रमाणे नोंदविलेले अंतर प्रमाणित करुन घेऊन त्याप्रमाणे इंधन वापर योग्य झाल्याची खात्री पटवावी.

3) अधिग्रहीत केलेल्या वाहनांचे लॉगबुक लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत. त्यामुळे नोंदवहीत नोंदविलेल्या नोंदी योग्य असल्याबाबत व त्याप्रमाणे योग्य प्रदान झाल्याची खात्री करता आली नाही.

4) प्रमाणकासोबत जोडलेल्या इंधन खर्च पावत्या या माहे एप्रिल 2014 ते जून 2014 या कालावधीतील असलेने जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 44 अन्वये मंजूरी घेणेत आली नाही. तसेच सदर इंधन वापर सन 2014-2015 मध्ये योग्य झाल्याचे दाखविणेत यावे.

5) देयकातून ठेकेदाराकडून आयकर रक्कमा वसूल न केलेने एकूण रक्कम रुपये 4,864/- जादा प्रदान झाले आहे. सदर रक्कम संबंधिताकडून वसूल करावी.

**4.303 नैसर्गिक आपत्ती पाणी टंचाई टँकर खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती सुरगाणा, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती, सुरगाणाचे सन 2016-2017 लेखापरीक्षणामध्ये पाणीटंचाई निवारणार्थ रक्कम रूपये 23,59,180/- इतका खर्च करणेत आलेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई/1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24/01/2006 मधील मुद्दा क्रमांक 7 नुसार प्रत्येक उद्भवाच्या ठिकाणी उद्भव नोंदवही ठेवण्यात येऊन सदर उद्भभव ठिकाणाहून प्रत्येक टँकरमध्ये भरण्यात येणा-या पाण्याच्या प्रत्येक खेपेची नोंद सदर नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. मात्र सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने तशी कार्यवाही केली किंवा कसे, याबाबत तपासणी करता आली नाही.

2) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई/1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24/01/2006 मध्ये दिलेल्या सूचनां नुसार संबंधित गावासाठी मंजूर केलेला संबंधित क्रमांकाचा टँकर वेळच्या वेळी संबंधित गावामध्ये जाऊन त्याद्वारे मंजूर खेपांइतका पाणी पुरवठा नियमितपणे केल्याबाबत, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेल्या समितीमधील 2 महिला सदस्यांच्या स्वाक्ष-या वाहन रोजवहीत (लॉगबुकात) घेण्यात याव्यात, असे सूचित केलेले आहे. संबंधित गावाला / तेथील रहिवासी यांना मंजूर खेपांइतके पाणी नियमितपणे मिळते किंवा नाही, याबाबत खात्री होण्यासाठी पारदर्शकरित्या नोंदी ठेवणे गरजेचे आहे.

3) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील परिपत्रक क्रमांक मंशा/ कार्या-2 / टंचाई / 3/ 22862/6538/2008, दिनांक 17/04/2008 नुसार गटविकास अधिकारी/ तहसिलदार यांनी प्रत्येक महिन्यात सर्व टँकरग्रस्त गावांना भेटी देऊन तपासण्या कराव्यात, अशा सूचना असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) विहिर अधिग्रहण / पाण्याचे उद्भभव ठिकाण ते पाणीपुरवठा करावयाचे गाव, गावातील वाडी किंवा विशिष्ट ठिकाण या प्रत्येक अंतराची गटविकास अधिकारी / तहसिलदार यांनी संयुक्त प्रत्यक्ष पाहणी करून प्रमाणपत्र नमूद करणे आवश्यक होते.

5) पुरवठादाराने मागणी केलेल्या देयकांची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तसेच मागणी करण्यात आलेल्या देयकांपैकी प्रदान केलेल्या देयकांचा स्वतंत्र तपशिल ठेवलेला नाही. त्यामुळे मागील वित्तीय वर्ष सन 2015-2016 मधील अनुदानाअभावी प्रलंबित राहिलेली देयके व त्यांची रक्कम, चालू वित्तीय वर्षात पुरवठादाराने मागणी केलेली एकूण देयके संख्या व त्यांची रक्कम तसेच सन 2016-2017 मध्ये मागील व चालू यापैकी नेमक्या किती देयकांची किती रक्कम प्रदान केली व कोणत्या देयकांची किती रक्कम अद्याप प्रदान करणे बाकी आहे? याची तपासणी करता आली नाही.

6) प्रमाणक क्रमांक 9 दिनांक 29/09/2016 नुसार रक्कम रूपये 2,42,689/- खर्च खाजगी टँकर पुरविणेकामी केला असून सदर 02 खाजगी टँकर लावणेकामी जिल्हाधिकारी कार्यालय टंचाई/7/24/488/16 / नाशिक दिनांक 08/06/2016 नुसार मौजे म्हेसमाळ, मौजे रोघांने पैकी शिरीष पाडा व मौजे गळवड, मौजे वळमाळ येथे पाणी पुरवठा करणे कामी आदेश दिला असतांना श्री संजय श्रीरंग म्हेसेपाटील यांचे 85/2016 दिनांक 16/03/2016 नुसार विनंती अर्ज केला की, सदरचे गांवे हे उंचावट व वळणाचा रस्ता असलेने रूपये 12,000/- लिटर क्षमतेचे टँकर जाणे शक्य नसल्याने 10000 लिटर क्षमताचा टँकर पुरविणेत यावे याबाबतचे पत्र दिले असून त्याप्रमाणे गट विकास अधिकारी यांनी पत्र 86/204 दिनांक 16/03/2016 नुसार मान्यता दिली असून यानुसार 10000 लिटर क्षमतेचा टँकर लावण्यात आले. परंतु, सदरचे टँकर हे जिल्हाधिकारी यांचे पत्रात नमुद गांवाना पुरविण्याच्या फेऱ्या नकरता जामनीमाळ व बुबळी येथे सदर पाणीपुरवठा केल्याचे नोंदवहीत नमुद असल्याचे दिसून आले सदरचे गांवे हे उंचावर

व वळणाची नसून पाणीपुरवठा केला आहे. 12000 लिटर क्षमता साठी प्रती दिवस 8.12 रूपये दर दिला असून व किमी साठी 22.92 दिला आहे. तसेच 10000 लिटर साठी 21.00 रूपये किमी दर व प्रतिदिवसासाठी दर रूपये 1,661/- दिलेला आहे. तरी 10000 लिटर क्षमता चे टँकर करीता रूपये 12,000/- लिटर क्षमताचे टँकरचा दर अदा केला आहे. त्यामुळे रक्कम रूपये 28,631/- जादा प्रदान झालेने संबधीताकडून वसूल करावी.

**4.304 नैसर्गिक आपत्ती पाणी टंचाई टँकर खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती बागलाण, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 37) -** पंचायत समिती बागलाणचे सन 2016-2017 लेखापरीक्षणामध्ये पाणीटंचाई निवारणार्थ रूपये 1,67,51,434/- इतका खर्च करणेत आलेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई/1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24/01/2006 मधील मुद्दा क्रमांक 7 नुसार प्रत्येक उद्भवाच्या ठिकाणी उद्भव नोंदवही ठेवण्यात येऊन सदर उद्भव ठिकाणाहून प्रत्येक टँकरमध्ये भरण्यात येणा-या पाण्याच्या प्रत्येक खेपेची नोंद सदर नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. मात्र सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने तशी कार्यवाही केली किंवा कसे, याबाबत तपासणी करता आली नाही.

2) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई/1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24/01/2006 मध्ये दिलेल्या सूचनांनुसार संबंधित गावासाठी मंजूर केलेला संबंधित क्रमांकाचा टँकर वेळच्या वेळी संबंधित गावामध्ये जाऊन त्याद्वारे मंजूर खेपांइतका पाणी पुरवठा नियमितपणे केल्याबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेल्या समितीमधील 2 महिला सदस्यांच्या स्वाक्ष-या वाहन रोजवहीत (लॉगबुकात) घेण्यात याव्यात, असे सूचित केलेले आहे. संबंधित गावाला / तेथील रहिवासी यांना मंजूर खेपांइतके पाणी नियमितपणे मिळते किंवा नाही, याबाबत खात्री होण्यासाठी पारदर्शकरित्या नोंदी ठेवणे गरजेचे आहे. तथापि, सदर नोंदवहीमध्ये बऱ्याच ठिकाणी संबंधित ग्रामपंचायत कर्मचारी /ग्रामसेवक/ सरपंच यांच्या स्वाक्ष-या दिसून आल्यात. तसेच 2 वा 3 खेपांसाठी एकच स्वाक्षरी केलेली असल्याचे आढळून आले. याचाच अर्थ वरील शासन परिपत्रकानुसार परिपूर्ण कार्यवाही करण्यात आली नाही. ज्या अर्थी पाणी पुरवठा विहीत वेळी विहीत खेपांइतका प्राप्त झाल्याबाबत ग्रामस्थ किंवा 2 महिला सदस्यांच्या स्वाक्ष-या घेतलेल्या नाहीत, त्या अर्थी नियमितपणे विहीत वेळी विहीत खेपांइतका पाणीपुरवठा संबंधित टँकरकडून झाला, असे खात्रीपुर्वक म्हणता येत नाही.

3) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील परिपत्रक क्रमांक मंशा/ कार्या-2 / टंचाई / 3/ 22862/6538/ 2008, दिनांक 17/04/2008 नुसार गटविकास अधिकारी/ तहसिलदार यांनी प्रत्येक महिन्यात सर्व टँकरग्रस्त गावांना भेटी देऊन तपासण्या कराव्यात, अशा सूचना असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) विहिर अधिग्रहण / पाण्याचे उद्भभव ठिकाण ते पाणीपुरवठा करावयाचे गाव, गावातील वाडी किंवा विशिष्ट ठिकाण या प्रत्येक अंतराची गटविकास अधिकारी / तहसिलदार यांनी संयुक्त प्रत्यक्ष पाहणी करुन प्रमाणपत्र नमूद करणे आवश्यक होते.

5) संबंधित टँकरच्या प्रत्यक्ष प्रवासानुसार (स्पिडोमीटर प्रमाणे) धावसंख्या (रनिंग) त्याच्या लॉगबुकात नोंदविण्यात आलेली नाही, तर उपविभागीय अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती, बागलाण यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे कि.मी. अंतराची नोंद लॉगबुकात घेतलेली आहे. त्यामुळे संबंधित टँकरच्या स्पिडोमिटरमधील आकडे आणि प्रत्यक्ष टँकरने केलेल्या प्रवासाचे कि.मी. अंतर याची पडताळणी करणे शक्य होत नाही. त्यात तफावत असल्यामुळेच लॉगबुकात प्रत्यक्ष प्रवासानुसार स्पिडोमिटरप्रमाणे अंतराची नोंद केलेली नाही, असे म्हणण्यास वाव आहे. याबाबत योग्य तो खुलासा होणे आवश्यक आहे.

6) पुरवठादाराने मागणी केलेल्या देयकांची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तसेच मागणी करण्यात आलेल्या देयकांपैकी प्रदान केलेल्या देयकांचा स्वतंत्र तपशिल ठेवलेला नाही. त्यामुळे मागील वित्तीय वर्ष सन 2015-2016 मधील अनुदानाअभावी प्रलंबित राहिलेली देयके व त्यांची रक्कम, चालू वित्तीय वर्षात पुरवठादाराने मागणी केलेली एकूण देयके संख्या व त्यांची रक्कम तसेच सन 2016-2017 मध्ये मागील व चालू यापैकी नेमक्या

किती देयकांची किती रक्कम प्रदान केली व कोणत्या देयकांची किती रक्कम अद्याप प्रदान करणे बाकी आहे, याची तपासणी करता आली नाही.

7) टँकर क्रमांक एम.एच 41 जी 6066 व्दारे दिनांक 26/04/2016 ते 11/07/2016 कालावधीत लोणारवाडी, सुराने, रातीर येथे पाणीपुरवठा केल्याचे लॉग बुक वरून दिसून आले लॉग बुकची तपासणी केली असता दिनांक 11/07/2016 रोजी लॉग बुकमध्ये पाणीपुरवठा केलेबाबत स्वाक्षरी नसल्याचे दिसून आले त्यामुळे 96 कि.मी. x 26.74 दर = 2,567/- चे जादा प्रदान शासकीय अनुदानाकरीता अंतिम अमान्य करणेत येत आहे.

8) टँकर क्रमांक एम.एच 18–8678 व्दारे दिनांक 01/04/2016 ते 30/06/2016 कालावधीत पाणीपुरवठा केल्याचे लॉग बुकवरून दिसून आले. देयकात एकूण 14,952 किमी. दर्शविले आहेत. तथापि, लॉगबुकची तपासणी केली असता त्यामध्ये एकूण 14,596 किमी. नमूद केलेले आहे. त्यामुळे 356 किमी x 22.92 दर = 8,160 चे जादा प्रदान शासकीय अनुदानाकरीता अंतिम अमान्य करणेत येत आहे

9) टँकर क्रमांक एम.एच 18 एम 1831 व्दारे दिनांक 08/04/2016 ते 10/07/2016 कालावधीत पाणीपुरवठा केल्याचे लॉग बुक वरून दिसून आले देयकात एकूण 14,300 किमी. दर्शविले आहेत. तथापि, लॉगबुकची तपासणी केली असता त्यामध्ये एकूण 14,150 किमी. नमूद केलेले आहे. त्यामुळे 150 किमी. x 22.92 दर = 3,438 चे जादा प्रदान शासकीय अनुदानाकरीता अंतिम अमान्य करणेत येत आहे.

10) टँकर क्रमांक एम.एच 04 एफ 9610 व्दारे दिनांक 01/04/2016 ते 11/07/2016 कालावधीत पाणीपुरवठा केल्याचे लॉग बुक वरून दिसून आले देयकात एकूण 13,810 किमी. दर्शविले आहेत. तथापि, लॉगबुकची तपासणी केली असता त्यामध्ये एकूण 13,744 किमी. नमूद केलेले आहे. त्यामुळे 66 किमी. x 22.92 दर = 1,513 चे जादा प्रदान शासकीय अनुदानाकरीता अंतिम अमान्य करणेत येत आहे.

11) टँकर क्रमांक एम.एच 15 जी 4349 व्दारे दिनांक 21/04/2016 ते 10/07/2016 कालावधीत देवळाणे येथे रोज 4 ट्रिपा पाणीपुरवठा केल्याचे लॉग बुक वरून दिसून आले 1 ट्रीप 36 किमी. ची आहे. लॉग बुकची तपासणी केली असता दिनांक 01/07/2016 रोजी लॉग बुक मध्ये पाणीपुरवठा केलेबाबत कोणतीही नोंद नसल्याचे दिसून आले. त्यामुळे 144 किमी x 22.92 दर = 3,300/- जादा प्रदान शासकीय अनुदानाकरीता अंतिम अमान्य करणेत येत आहे.

12) टँकर क्रमांक एम.एच 06 एसी 3296 व्दारे दिनांक 09/04/2016 ते 11/07/2016 कालावधीत नामपूर येथे रोज 2 ट्रिपा पाणीपुरवठा केल्याचे लॉग बुक वरून दिसून आले 1 ट्रीप 92 किमी.ची आहे. लॉग बुकची तपासणी केली असता दिनांक 10/06/2016 रोजी केवळ 1 ट्रिप लॉग बुकमध्ये दर्शविली आहे. परंतु, देयकात 2 ट्रिपा दर्शविलेमुळे 92 किमी x 45.84 दर = 4,217 चे जादा प्रदान शासकीय अनुदानाकरीता अंतिम अमान्य करणेत येत आहे.

**4.305 टंचाईग्रस्त भागात खाजगी टँकरने पाणी पुरवठा योजनेतील अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती येवला, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती, येवला सन 2016-2017 या वित्तीय वर्षात टंचाईग्रस्त गावांना खाजगी टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी रक्कम रुपये 1,66,27,537/- खर्च केलेला आहे. सदर खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समितीने टँकर रुजू नोंदवहीत टँकर आदेशाप्रमाणे नोंद घेतलेली आहे. परंतु, टँकर चालकांना पाणी उदभव ठिकाण, पाणी पुरवठा करण्यांचे ठिकाण व कोणत्या गांवात किती ट्रिपा करावयाच्या आहेत, याबाबत पंचायत समितीने आदेश दिलेले नाही. त्यामुळे टँकर चालकानी लॉगबुकांत नोंदविलेले ठिकाण पाणी टंचाईचे असल्याबाबत व ट्रिपांबाबत लेखापरीक्षणांत खात्री करता येत नाही.

2) टँकरची पाणी धारण करण्याची लिटरमध्ये असलेली क्षमता उपअभियंता यांनी प्रमाणित केलेली नाही. त्यामुळे मंजूर केलेल्या विहीत लिटर्सइतका पाणीपुरवठा झाल्याची खात्री होत नाही तसेच उद्भव ठिकाण ते पाणी टंचाई ठिकाणापर्यंतचे अंतर प्रमाणित केलेले नाही. त्यामुळे दर्शविलेले अंतर योग्य असल्याची खात्री करता येत नाही.

3) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई/1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24/01/2006 मधील मुद्दा क्रमांक 7 नुसार प्रत्येक उद्भवाच्या ठिकाणी उद्भव नोंदवही ठेवण्यात येऊन सदर उद्भव ठिकाणाहून प्रत्येक टँकरमध्ये भरण्यात येणा-या पाण्याच्या प्रत्येक खेपेची नोंद सदर नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. मात्र सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने तशी कार्यवाही केली किंवा कसे, याबाबत तपासणी करता आली नाही.

4) टँकरचे लॉगबुक विहित नमुन्यात ठेवलेले नाही. तसेच लॉगबुक सक्षम प्राधिकारी यांनी स्वाक्षांकित केलेले नाही. टँकर क्षमता आर. टी. ओ. यांचेकडुन प्रमाणित करुन घेतलेली नाही.

5) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई/1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24/01/2006 मध्ये दिलेल्या सूचनांनुसार संबंधित गावासाठी मंजूर केलेला संबंधित क्रमांकाचा टँकर वेळच्या वेळी संबंधित गावामध्ये जाऊन त्याद्वारे मंजूर खेपांइतका पाणी पुरवठा नियमितपणे केल्याबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेल्या समितीमधील 2 महिला सदस्यांच्या स्वाक्ष-या वाहन रोजवहीत (लॉगबुकात) घेण्यात याव्यात, असे सूचित केलेले आहे. त्यामुळे संबंधित गावाला / तेथील रहिवासी यांना मंजूर खेपां इतके पाणी नियमितपणे मिळते किंवा नाही, याबाबत खात्री होण्यासाठी पारदर्शकरित्या नोंदी ठेवणे गरजेचे आहे.

6) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील परिपत्रक क्रमांक मंशा/ कार्या-2 / टंचाई/3/ 22862/6538/2008, दिनांक 17/04/2008 नुसार गटविकास अधिकारी/ तहसिलदार यांनी प्रत्येक महिन्यात सर्व टँकरग्रस्त गावांना भेटी देऊन तपासण्या कराव्यात, अशा सूचना असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) विहिर अधिग्रहण / पाण्याचे उद्भव ठिकाण ते पाणीपुरवठा करावयाचे गाव, गावातील वाडी किंवा विशिष्ट ठिकाण या प्रत्येक अंतराची गटविकास अधिकारी / तहसिलदार यांनी संयुक्त प्रत्यक्ष पाहणी करुन प्रमाणपत्र नमूद केलेले नाही. पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या गावातील जनतेच्या मागणीप्रमाणे संबंधित ग्रामपंचायतीकडून टँकर मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला असतो. सक्षम प्राधिका-यांच्या मंजूरीने टँकर सुरु झाल्यानंतर मंजूर फेऱ्यांप्रमाणे प्रत्यक्षात पाणीपुरवठा त्या ठिकाणी होतो आहे किंवा नाही, यावर नियंत्रण ठेवण्याची, लक्ष देण्याची जबाबदारी शासन यंत्रणेचे घटक म्हणून संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक / सरपंच तसेच महसूल यंत्रणेचा प्रतिनिधी म्हणून संबंधित तलाठी यांची असते. त्यांनी या संदर्भात आवश्यक ती काळजी घेणे आवश्यक असून टँकर मंजूर असलेल्या प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ठिकाणी एक नोंदवही ठेवून मंजूर खेपांइतके पाणी नियमितपणे मिळालेले आहे, याबाबत त्या नोंदवहीत आवश्यक त्या नोंदी करुन संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक / सरपंच तसेच महसूल यंत्रणेचा प्रतिनिधी म्हणून संबंधित तलाठी यापैकी जे कोणी उपस्थित असतील आणि ग्रामस्थांचे प्रतिनिधी म्हणून संबंधित गावातील काही ग्रामस्थ यांच्या स्वाक्ष-या घेऊन मंजूर खेपांइतके पाणी नियमितपणे पुरविण्यात आले आहे याबाबत पारदर्शकरित्या अभिलेखे निर्माण करणे आवश्यक आहे. गटविकास अधिकारी यांनी ठेकेदारास देयके प्रदान करतांना संबंधित गावाची सदर नोंदवही व संबंधित टँकरचे लॉगबुक याचा ताळमेळ घेऊन नंतरच देयकांचे प्रदान करणे क्रम:प्राप्त आहे. मात्र टँकर मंजूर असलेल्या कोणत्याही गावाची अशा प्रकारची नोंदवही ठेवलेली नाही.

8) पंचायत समितीकडून गेल्या अनेक वर्षापासून टिएसपी / ओटीएसपी / विशेष घटक योजना या योजना व इतर अनुदानातून अनेक लाभार्थी यांना विहीर बांधकामासाठी अनुदान देण्यात आलेले आहे सदरच्या विहीरींसाठी जिल्हा परिषद / शासकिय अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले असल्याने टंचाईच्या काळात सदर विहीरींना पाणी उपलब्ध असल्यास विहीर अधिग्रहण करतांना गटविकास अधिकारी यांनी अशा शासकिय अनुदानातून तयार झालेल्या विहीरी प्रथम प्राधान्याने अधिग्रहीत करणे आवश्यक होते. त्यामुळे खाजगी मालकांच्या विहीर अधिग्रहणासाठी केलेल्या खर्चात बचत होऊ शकली असती.

9) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2014/प्र.क्र. 48/ पा.पु.-14, दिनांक 06/05/2014 व जिल्हाधिकारी, नाशिक यांचे आदेश क्रमांक कक्ष13/1/टंचाई 7/24/584/14, दिनांक 22/04/2014 अन्वये अट क्रमांक 7 नुसार जीपीएस प्रणालीनुसार बिले अदा करण्यांत आलेले आहे परंतु, जीपीएस प्रणालीत ठिकाणाची उल्लेख होत नाही.

10) पाणी पुरवठा टँकर दररोज विहित वेळेत ठरवुन दिल्या प्रमाणे ट्रिपा मारतो किंवा कसे, याबाबत तक्रार नोंदवही लेखापरीक्षणांत उपलब्ध झाली नाही. त्यामुळे टँकर चालकांना केलेला पाणी पुरवठा योग्य केला किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही.

11) टँकर मंजुर झाल्यानंतर एक टँकर एका दिवसांत किती कि.मी. चालेल व त्याप्रमाणे टँकरच्या फे-या व ठिकाण निश्चित करणे आवश्यक आहे.

एका दिवसांत चाललेल्या प्रत्येक टँकरचे अंतराचे अवलोकन केले असता एक टँकर कमीत कमी 30 कि.मी. चाललेला आहे व दुसरा टँकर एका दिवसांत जास्तीत जास्ती 310 कि.मी. चाललेला दिसतो. त्यामुळे टँकरचे प्रत्येक दिवसांसाठी कि.मी. चे नियोजन करुन प्रत्येक गांवासाठी टँकरची मागणी करण्याऐवजी टँकच्या फे-यांचे नियोजन करुन टँकरची मागणी केली असती, तर कमी टँकरमध्ये पाणी टंचाईचे काम पारपाडणे शक्य होते. परंतूख् त्या प्रमाणे कार्यवाही न करता जादा टँकरची मागणी करुन टँकर भाडयावरील खर्च विनिकारण वाढविलेला दिसतो. याबाबत संबधितांवर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

12) प्रत्यक्ष पाणी पुरवठा करणा-या टँकर्सचे दिवस व कि.मी. जादा दर्शविल्यामुळे जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदान लेखापरीक्षणांत अंतिम अमान्य करण्यांत येत आहे. तरी जादा प्रदान रक्कम रुपये 16,020/- संबधितांकडुन वसुल करुन शासन निधीत भरणा करुन भरणा चलनाचे प्रतिसह पुर्तता दाखवावी

**4.306 टंचाईग्रस्त भागात खाजगी टँकरने पाणी पुरवठा योजनेतील अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर सन 2016-2017 या वित्तीय वर्षात टंचाईग्रस्त गावांना खाजगी टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी रक्कम रुपये 13,61,171/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समितीने टँकर रुजू नोंदवहीत टँकर आदेशाप्रमाणे नोंद घेतलेली आहे. परंतु, टँकर चालकांना पाणी उदभव ठिकाण, पाणी पुरवठा करण्यांचे ठिकाण व कोणत्या गांवात किती ट्रिपा करावयाच्या आहेत, याबाबत आदेश दिलेले नाही. त्यामुळे टँकर चालकांनी लॉगबुकांत नोंदविलेले ठिकाण पाणी टंचाईचे असल्याबाबत व ट्रिपांबाबत लेखापरीक्षणांत खात्री करता येत नाही.

2) टँकरची पाणी धारण करण्याची लिटरमध्ये असलेली क्षमता उपअभियंता यांनी प्रमाणित केलेली नाही. त्यामुळे मंजूर केलेल्या विहीत लिटर्स इतका पाणीपुरवठा झाल्याची खात्री होत नाही. तसेच उद्भव ठिकाण ते पाणी टंचाई ठिकाणापर्यंतचे अंतर प्रमाणित केलेले नाही. त्यामुळे दर्शविलेले अंतर योग्य असल्याची खात्री करता येत नाही.

3) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई/1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24/01/2006 मधील मुद्दा क्रमांक 7 नुसार प्रत्येक उद्भवाच्या ठिकाणी उद्भव नोंदवही ठेवण्यात येऊन सदर उद्भव ठिकाणाहून प्रत्येक टँकरमध्ये भरण्यात येणा-या पाण्याच्या प्रत्येक खेपेची नोंद सदर नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. मात्र सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने तशी कार्यवाही केली किंवा कसे, याबाबत तपासणी करता आली नाही.

4) टँकरचे लॉगबुक विहित नमुन्यात ठेवलेले नाही. तसेच लॉगबुक सक्षम प्राधिकारी यांनी स्वाक्षांकित केलेले नाही. टँकर क्षमता आर. टी. ओ. यांचेकडुन प्रमाणित करुन घेतलेली नाही.

5) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई/1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24/01/2006 मध्ये दिलेल्या सूचनांनुसार संबंधित गावासाठी मंजूर केलेला संबंधित क्रमांकाचा टँकर वेळच्या वेळी संबंधित गावामध्ये जाऊन त्याद्वारे मंजूर खेपांइतका पाणी पुरवठा नियमितपणे केल्याबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेल्या समितीमधील 2 महिला सदस्यांच्या स्वाक्ष-या वाहन रोजवहीत (लॉगबुकात) घेण्यात याव्यात, असे सूचित केलेले आहे. त्यामुळे संबंधित गावाला / तेथील रहिवासी यांना मंजूर खेपांइतके पाणी नियमितपणे मिळते किंवा नाही, याबाबत खात्री होण्यासाठी पारदर्शकरित्या नोंदी ठेवणे गरजेचे आहे.

6) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील परिपत्रक क्रमांक मंशा/ कार्या-2 / टंचाई/3/ 22862/6538/2008, दिनांक 17/04/2008 नुसार गटविकास अधिकारी/ तहसिलदार यांनी प्रत्येक महिन्यात सर्व टँकरग्रस्त गावांना भेटी देऊन तपासण्या कराव्यात, अशा सूचना असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) विहिर अधिग्रहण / पाण्याचे उद्भव ठिकाण ते पाणीपुरवठा करावयाचे गाव, गावातील वाडी, किंवा विशिष्ट ठिकाण या प्रत्येक अंतराची गटविकास अधिकारी / तहसिलदार यांनी संयुक्त प्रत्यक्ष पाहणी करुन प्रमाणपत्र नमूद केलेले नाही. पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या गावातील जनतेच्या मागणीप्रमाणे संबंधित ग्रामपंचायतीकडून टँकर मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला असतो. सक्षम प्राधिका-यांच्या मंजूरीने टँकर सुरु झाल्यानंतर मंजूर फेऱ्यांप्रमाणे प्रत्यक्षात पाणीपुरवठा त्या ठिकाणी होतो आहे किंवा नाही, यावर नियंत्रण ठेवण्याची, लक्ष देण्याची जबाबदारी शासन यंत्रणेचे घटक म्हणून संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक / सरपंच तसेच महसूल यंत्रणेचा प्रतिनिधी म्हणून संबंधित तलाठी यांची असते. त्यांनी या संदर्भात आवश्यक ती काळजी घेणे आवश्यक असून टँकर मंजूर असलेल्या प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ठिकाणी एक नोंदवही ठेवून मंजूर खेपांइतके पाणी नियमितपणे मिळालेले आहे याबाबत त्या नोंदवहीत आवश्यक त्या नोंदी करुन संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक / सरपंच तसेच महसूल यंत्रणेचा प्रतिनिधी म्हणून संबंधित तलाठी यापैकी जे कोणी उपस्थित असतील आणि ग्रामस्थांचे प्रतिनिधी म्हणून संबंधित गावातील काही ग्रामस्थ यांच्या स्वाक्ष-या घेऊन मंजूर खेपांइतके पाणी नियमितपणे पुरविण्यात आले आहे याबाबत पारदर्शकरित्या अभिलेखे निर्माण करणे आवश्यक आहे. गटविकास अधिकारी यांनी ठेकेदारास देयके प्रदान करतांना संबंधित गावाची सदर नोंदवही व संबंधित टँकरचे लॉगबुक याचा ताळमेळ घेऊन नंतरच देयकांचे प्रदान करणे क्रम:प्राप्त आहे. मात्र टँकर मंजूर असलेल्या कोणत्याही गावाची अशा प्रकारची नोंदवही ठेवलेली नाही.

8) पंचायत समितीकडून गेल्या अनेक वर्षापासून टिएसपी / ओटीएसपी / विशेष घटक योजना या योजना व इतर अनुदानातून अनेक लाभार्थी यांना विहीर बांधकामासाठी अनुदान देण्यात आलेले आहे सदरच्या विहीरींसाठी जिल्हा परिषद / शासकिय अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले असल्याने टंचाईच्या काळात सदर विहीरींना पाणी उपलब्ध असल्यास विहीर अधिग्रहण करतांना गटविकास अधिकारी यांनी अशा शासकिय अनुदानातून तयार झालेल्या विहीरी प्रथम प्राधान्याने अधिग्रहीत करणे आवश्यक होते. त्यामुळे खाजगी मालकांच्या विहीर अधिग्रहणासाठी केलेल्या खर्चात बचत होऊ शकली असती.

9) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2014/प्र.क्र. 48/ पा.पु.-14, दिनांक 06/05/2014 व जिल्हाधिकारी, नाशिक यांचे आदेश क्रमांक कक्ष13/1/टंचाई 7/24/584/14, दिनांक 22/04/2014 अन्वये अट क्रमांक 7 नुसार जीपीएस प्रणालीनुसार बिले अदा करण्यांत आलेले आहे परंतु, जीपीएस प्रणालीत ठिकाणाची उल्लेख होत नाही.

10) टँकर मंजुर झाल्यानंतर एक टँकर एका दिवसांत किती कि.मी. चालेल व त्याप्रमाणे टँकरच्या फे-या व ठिकाण निश्चित करणे आवश्यक आहे.

एका दिवसांत चालेल्या प्रत्येक टँकरचे अंतराचे अवलोकन केले असता एक टँकर कमीत कमी 26 कि.मी. चाललेला आहे व दुसरा टँकर एका दिवसांत जास्तीत जास्ती 232 कि.मी. चाललेला दिसतो. त्यामुळे टँकरचे प्रत्येक दिवसांसाठी कि.मी. चे नियोजन करुन प्रत्येक गांवासाठी टँकरची मागणी करण्याऐवजी टँकरच्या फे-यांचे नियोजन करुन टँकरची मागणी केली असती, तर कमी टँकरमध्ये पाणी टंचाईचे काम पार पाडणे शक्य होते. परंतू, त्याप्रमाणे कार्यवाही न करता जादा टँकरची मागणी करुन टँकर भाडयावरील खर्च विनिकारण वाढविलेला दिसतो. याबाबत संबधितांवर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

**4.307 मौजे रुईखेडा येथे टँकरने पाणी पुरवठा करण्याकामी टँकर भाडे जादा अदा केल्याबाबत.**

**पंचायत समिती मुक्ताईनगर, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** मौजे रुईखेडा येथे टँकरने पाणी पुरवठा करण्याकामी प्रमाणक क्रमांक 6 दिनांक 20/01/2017 अन्वये रूपये 10,08,312/- अदा केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव (टंचाई शाखा) यांचे जा.क्र.टंचाई-2/कावि/2016/7/50/307 दिनांक 03/03/2016 अन्वये रुईखेडा ते पाणी भरण्याचे ठिकाण सारोळा जल शुध्दीकरण केंद्र यामधील प्रती खेपेला 32 किमी अंतर निश्चित करुन दिलेले आहे. तथापि, ठेकेदारास त्याप्रमाणे रक्कम अदा न करता जि.पी.एस.

प्रणालीप्रमाणे रक्कमेची अदायगी केल्याने प्रदान झालेले आहे. जादा प्रदान रक्कम रूपये 1,81,785/- ठेकेदाराकडून वसुल करुन विहीत लेखाशिर्षाखाली भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

**4.308 टंचाईग्रस्त गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्याकरीता केलेल्या खर्चातील अनियमितता**

**पंचायत समिती भडगाव, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** टंचाईग्रस्त गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्याकरीता रक्कम रूपये 8,17,101/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्र.क्र.167 ची पडताळणी केली असता टँकर क्रमांक MH-20 AT-8729 या टँकरने एकुण 7 दिवस पाणी पुरवठा केल्याचे लॉग बुक्मध्ये नोंद आहे. प्रत्यक्ष बीलामध्ये 8 दिवस दर्शवुन 1 दिवसाचे जादा अदा केलेले भाडे रक्क्म रूपये 3,672/- वसुल करुन दर्शवावी. तसेच वाहन लॉग बुकाची पडताळणी केली असता दिनांक 16/06/2016 ते 23/06/2016 या कालावधीत एकुण 560 कि.मी. फिरती केल्याचे लॉग बुकला नोंद आहे. परंतु, प्रत्यक्ष बीलामध्ये 695 कि.मी. दर्शवुन रक्क्म प्रदान केली आहे. तरी जादा कि.मी. रक्कम 135*47.28=6,399 वसुल करुन दर्शवावी.

2) प्र.क्र.168 ची पडताळणी केली असता (टँकर क्रमांक MH-19 AT-1684) बीलामध्ये कि.मी. जादा दर्शवले आहे. जादा प्रदानाची रक्क्म रूपये 18,557.40 वसुल करुन पुर्तता दर्शवावी.

3) प्र.क्र.169 ची पडताळणी केली असता (टँकर क्रमांक MCC-371) बीलामध्ये कि.मी. जादा दर्शवले आहे. जादा प्रदानाची रक्क्म रूपये 35,386.92 वसुल करुन पुर्तता दर्शवावी.

4) वाहन क्रमांक MCC-371 लॉग बुकाची पडताळणी केली असता माहे मार्च-2016 ते जुलै 2016 या कालावधीत एकुण 113 दिवस पाणी पुरवठा केल्याचे लॉग बुकला नोंद आहे परंतु, प्रत्यक्ष बीलामध्ये 116 दिवस दर्शवुन रक्क्म प्रदान केली आहे. तरी जादा प्रदान दिवस 3*1,836=5,508 वसुल करुन दर्शवावी.

5) उपरोक्त नमुद टँकरची भार मर्यादा 4 मे. टन असलेबाबत प्रमाणपत्र नस्तीत आढळले नाही.

6) पाणी पुरवठा करायचे स्थळ, टंचाईगाव व पाणी जिथून भरले तो स्त्रोत (उद्भव) अंतर यामधील अंतर प्रामणित केलेले नाही.

7) तालुक्यापासून गावाचे अंतर ST महामंडळ किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून प्रमाणित करुन घेतलेले नाही. खाजगी कामासाठी टँकर न वापरल्याचे तसेच टँकरने प्रती दिन किती प्रवास केला, याबाबत गट विकास अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

8) गट विकास अधिकारी, तहसिलदार यांचे अचानक तपासणी प्रमाणपत्र उपलब्ध नाही.

**4.309 पाणीटंचाई निवारणार्थ खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती पारोळा, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 43) -** पंचायत समिती, पारोळा यांनी सन 2016-2017 या वित्तीय वर्षात खाजगी व शासकीय टँकरद्वारे पाणीपुरवठा केलेला आहे. प्राप्त अनुदानातून शासकीय टँकरसाठी इंधनाकरिता रक्कम रुपये 1,12,26,477/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खाजगी टँकरचे आर.सी.बुक उपलब्ध न झाल्याने पाण्याच्या टाकीचे क्षमतेबाबत खात्री करता आली नाही. तरी आर.सी.बुक उपलब्ध करुन टँकर क्षमतेची खात्री पटवावी.

2) शासकीय वाहनाचे मूळ लॉगबुक उपलब्ध झाले नाही. लॉगबुकाच्या झेरॉक्स कॉपी लेखापरीक्षणात दाखविण्यात आल्या. त्या प्रमाणित करण्यात आलेल्या नाहीत.

3) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्र.क्र.12/पापं-14, दिनांक 03/02/1999 मधील परि.क्र.7 प्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी एक किंवा आवश्यकतेनुसार अधिक तपासणी पथके गठीत करुन त्याकरीता क्षेत्रीय तपासण्या करुन घ्यावयाच्या आहेत. या तरतूदीनुसार करण्यात आलेल्या तपासणी पथकाचे अहवाल लेखापरीक्षणात उपलब्ध करुन न दिल्यामुळे तपासण्या झाल्या किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही.

4) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक टंचाई शाखा, परिपत्रक क्रमांक मशा/कार्या-2/टंचाई/ 22862 / 6538 / 2008, दिनांक 17/04/2008 मधील परि.क्र.7 नुसार प्रत्येक उद्भवाच्या ठिकाणी उद्भव नोंदवही ठेवण्यात येऊन करण्यात आलेल्या प्रत्येक खेपेची नोंद त्यामध्ये ठेवण्यात आलेली नाही.

5) उपरोक्त नमूद दिनांक 17/04/2008 च्या परिपत्रकातील परि.8 नुसार वेळच्या वेळी टँकर पोहोचला असलेबाबत गावातील पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशन केलेल्या समितीमधील 2 महिला सदस्याच्या स्वाक्षरी रोजवहीमधे घेण्यात याव्यात. याशिवाय तलाठी, ग्रामसेवक, शाळेचे मुख्याध्यापक अथवा शिक्षक, पोलिस पाटील यापैकी कोणत्याही एका अधिकाऱ्याची त्याच्यासोबत स्वाक्षरी घेण्यात यावी. तथापि, तशी कार्यवाही न करता परिपत्रकातील सूचनांचे पालन झालेले नाही.

6) विभागीय आयुक्त, नाशिक यांचे परिपत्रक क्रमांक मशा/कार्या-2/टंचाई-3/22862/6538/2008, दिनांक 17/04/2008 नुसार गटविकास अधिकारी / तहसीलदार यांनी तपासणी करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. परंतु, तशी कार्यवाही केलेली नाही.

7) लोणीसीमची लोकसंख्या 1044 असताना दररोज 10 लिटर प्रमाणे 10,440 लिटर पाणी देणे आवश्यक असताना दररोज 15 लिटर पाणी याप्रमाणे 15,660 लिटर पाणी देण्यात आले. त्यामुळे दररोज 1 खेपऐवजी 2 खेपा केल्याचे नमूद आहे. याबाबत खुलासा करावा.

8) जिल्हाधिकारी यांचे पत्र क्रमांक 7150/844 टंचाई-2/कवि/16 दिनांक 25/04/2016 अन्वये अट क्रमांक 2 अन्वये जीपीएस प्रणालीच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांनी जीपीएस प्रणालीवर नोंदविण्यात येणाऱ्या दैनंदिन खेपेचा अहवाल दररोज सायंकाळी 5 वाजेपर्यंत संबंधीत तालुका तहसीलदार यांनी सादर करावा. तशी कार्यवाही केली नाही.

9) पंचायत समिती, पारोळा यांनी जी.पी.एस.प्रणालीनुसार कि.मी.ची रक्कम अदा केली आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशातील अंतर यात मोठया प्रमाणात अंतराची तफावत दिसून येते व जीपीएसप्रमाणे अंतराची रक्कम अदा करावी. याबाबत कोणतेही आदेश नसताना कोणत्या नियमाने रक्कम अदा केली, याचा खुलासा करावा. नियमानुसार सर्वात कमी अंतराच्या रकमेचे अदा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही. त्यामुळे शासनाची वित्तहानी झाली आहे. याबाबत खुलासा करावा. जादा अंतराची रक्कम झाली असल्यास परिगणना करुन रक्कम संबंधीताकडून वसूल करावी.

**4.310 टंचाईग्रस्त गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्याकरीता केलेल्या खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती अमळनेर, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 39) -** पंचायत समिती, अमळनेर यांचे सन 2016-2017 लेखापरीक्षणादरम्यान ग्रामीण पाणी पुरवठा विभगाकडील 9 पी एच 2245 नैसर्गिक आपत्ती या लेखाशिर्षाखाली लेखापरीक्षण आर्थीक वर्षात रक्कम रुपये 81,38,577/- इतका खर्च नोंदविलेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विहीर अधिग्रहीत मालकाने नियमितरित्या खंड न पाडता पाणीपुरवठा केल्याबाबत संबंधीतांनी स्वाक्षरी निशी प्रमाणित केले. प्रत्याक्षात सदर कालावधीत विद्युत पुरवठा खंडीत झाला नसल्याची खात्री सक्षम प्राधिकरणाने न करता देयके पारीत करणे म्हणजे वित्तीय औचित्याच्या सुत्रांचा भंग होय. याबाबत खुलासा घेणे आवश्यक आहे.

2) टँकरची भार मर्यादा 4 मे टन असलेबाबत प्रमाणपत्र नस्तीत आढळले नाही.

3) पाणी पुरवठा करायचे स्थळ टंचाईगाव व पाणी जिथून भरले तो स्त्रोत (उद्भव) अंतर या मधील अंतर प्रामणित केलेले नाही.

4) तालुक्यात पाणी पुरव्ठयासाठी वापरण्यात आलेल्या खाजगी टँकरची धावपुस्तिका (Logbook) लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न दिल्याने संबंधीत टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा केल्याच्या ट्रीप, खरेदी केलेले डीझेलसाठा नोंदवही गाडी किती दिवस बंद होती किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही.

5) तालुक्यापासून गावाचे अंतर ST महामंडळ किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून प्रमाणित करुन घेतलेले नाही. खाजगी कामासाठी टँकर न वापरल्याचे तसेच टँकरने प्रतिदिन किती प्रवास केला, याबाबत गट विकास अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

6) गट विकास अधिकारी तहसिलदार यांचे अचानक तपासणी प्रमाणपत्र उपलब्ध नाही.

7) जिल्हाधिकारी, जळगांव यांचे टँकर पाणीपुरवठा दराचा प्रस्ताव प्राप्त नाही.

8) विहीर अधिग्रहण नोंदवही ठेवलेली नसुन विहीर अधिग्रहण ठिकाणावर उपअभियंता गट विकास अधिकारी, तहसिलदार यांनी टंचाई अंतराबाबत प्रमाणपत्र दिलेले नाही.

**4.311 खाजगी टँकरनां जादा रक्कम प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती अमळनेर, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 40) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

खाजगी टँकरांना दिनांक 30/06/2016 रोजी गट विकास अधिकारी, अमळनेर यांनी कार्यमुक्त केले आहे. तथापि, त्यांना दिनांक 01/07/2016 पावेतो भाडे रक्कम प्रदान करण्यात आली आहे. त्यामुळे एक दिवसाचे भाडे जादा प्रदान झाले असुन जादा रक्कम रूपये 34,272/- संबधितांकडुन वसुल करावी.

**4.312 पाणी टंचाई खर्चाबाबत.**

**पंचायत समिती नेवासा, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2016-2017 मध्ये जून 2015 ते जूलै-2016 पर्यंत एकुण देयकाची रक्कम रुपये 4,50,35,759/- असून सदर रक्कमेपैकी दिनांक 31/03/2017 अखेर रक्कम रुपये 3,50,52,147/- प्रदान केलेली आहे. उर्वरीत रक्कम रुपये 99,83,612/- जिल्हा परिषद सेस निधीकडे वर्ग करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखासंहिता 1968 चे नियम 27 नुसार प्रत्यक्ष पैसे घेणाऱ्या खेरीज दुसऱ्या कोणत्याही इसमाच्या नावाने धनादेश काढता येणार नाही. तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 1009/प्र.क्र.66/कोषा-प्र-5, दिनांक 15/01/2010 नुसार शासकिय पैसा शासकिय लेख्याबाहेर ठेवण्यास प्रतीबंध केलेला आहे. असे असतांना टँकर टंचाईवरील खर्च रक्कमा पारित करुन त्यापैकी उर्वरीत रक्कम रुपये 99,83,612/-नियमात कोणतीही तरतूद नसतांना नियमबाह्य जिल्हा परिषद सेस निधीमध्ये वर्ग करण्यात आलेल्या आहेत.

2) देयक रक्कमेतुन देय अनुज्ञेय दराने देयकात आयकर कपात केलेली आहे. शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण- 1009/प्र.क्र.40/कोषा-प्र-5, दिनांक 10/03/2010 नुसार विहीत मुदतीत आयकर कपातीची रक्कम शासकीय तिजोरीत जमा केलेबाबतचे आयकर भरणा रक्कमेच्या चलन, आयकर विभागास सादर केलेले तिमाही विवरण लेखापरीक्षणास सादर करुन आयकर भरणा अचुक केले आसल्याचे प्रमाणित करावे.

3) जिल्हाधिकारी यांचे आदेश क्रमांक टंचाई/कार्या-19अ/300/2016 अहमदनगर, दिनांक 22/01/2016 व 27/01/2015 अन्वये अट क्रमांक 5 नुसार तसेच पणी पुरवठा स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक दिनांक 04/01/2014 नुसार टँकरची देयके अदा करतांना जिपीएस प्रणालीवर ज्या टँकरच्या फेऱ्याची नोंद होईल, त्याच फेऱ्या देयकाकरीता अनुज्ञेय राहतील, असे असतांना काही फेऱ्यांची जीपीएस प्रणालीवर नोंद नसतांना रक्कम रुपये 32,468/- अदा करण्यात आलेले आहे. प्रदान रक्कम रुपये 32,468/- वसुल करुन शासन सदरी भरणा करावी.

4) जिल्हाधिकारी यांचे आदेश क्रमांक टंचाई/कार्या19अ/190/2015, दिनांक 27/01/2015 तसेच दिनांक 22/01/2016 अन्वये निविदा धारकास पुरवठा करण्यात येणाऱ्या प्रत्येक टँकरसाठी अनामत रक्कम रुपये 2,000/- टँकर पुरवठा करण्याचे आदेश दिल्यापासुन आठ दिवसाचे आत शासनास अनामत जमा करणे आवश्यक आहे. अनामत जमा न केल्यास ती देयकातुन वजावट करुन घेण्याचे अधिकार संबंधीत तालुक्याचे गटविकास अधिकारी यांना राहतील. तसेच प्रती टँकर रुपये 500/- पर्यंत दंड करण्याचे अधिकारही गटविकास अधिकारी यांना राहील. असे असतांना रक्कम रुपये 2,21,000/- दंडासह संबंधीतांकडून वसुल करण्यात आलेली नाही

5) टँकरांचे उदभव बदलाबाबतचे आदेश नसतांना देयकात उदभव बदल केल्याने जादा कि.मी. अंतराचे वहन अंतर नमूद करुन रक्कम रुपये 92,273/- जादा प्रदान करण्यात आलेली आहे.

6) टँकर नंबर एमएच 16 टी 7997(वहन क्षमता 20950) उदभव एमआयडीसी ते हनूमान वस्ती दिनांक 01/07/2016 ते 28/07/2016 या कालावधीचे लॉग बुकात कि.मी. अंतर नमुद नाही. तसेच उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नेवासा यांनी प्रमाणित केलेल्या अंतराचे दाखल्यामध्ये अंतर नमूद नसतांना देयकात (76.9, 47.7, 45.10) दुहेरी अंतर नमुद करुन एकुण 41 खेपांचे 2786.90 अंतर दर्शवून रक्कम रुपये 1,58,558/- चे देयक पारीत करण्यात आलेले आहे.

7) जिल्हाधिकारी यांचे आदेश क्रमांक टंचाई/कार्या19अ/197/2015 अ.नगर, दिनांक 27/01/2015 मधील अट क्रमांक 21 नुसार कुठल्याही प्रकारचा खंड पडल्यास प्रती दिन रुपये 2,000/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल. असे असतांना टँकर नंबर एमएच 12 ए 7267, दिनांक 27/07/2015 रोजी गैरहजर असल्याने रक्कम रुपये 2,000/- दंड आकारणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर दंडाची रक्कम वसुल करुन शासन सदरी भरणा करावी.

8) दिनांक 04/07/2015 ते 31/07/2015 या कालावधीतील जीपीएस प्रणाली अहवालात दिनांक 04/07/2015 नंतर दिनांक 05/06/2015 नमूद असल्याने सदर कालावधीतील अहवालामध्ये फेराफार केल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरचे जीपीएस अहवाल अचुक असलेबाबत प्रमाणित करता येत नाही.

9) उदभव नोंदवहीत उदभवावर नियुक्त प्रतीनिधी यांची स्वाक्षरी असणे आवश्यक असतांना, सदर नोंदवहीत स्वाक्षरी नसतांना देयक पारीत करण्यात आलेले आहेत.

**4.313 प्रादेशीक नळ पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्तीबाबत**

**पंचायत समिती नेवासा, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** गटविकास अधिकारी, पंचायत समीती, नेवासा यांनी मे.संकेत एन्टरप्रायजेस, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहदमनगर यांना क्र.जा.क्र. व.शि.चि.शा./119(I)/2015, दिनांक 28/07/2015 अन्वये उपरोक्त पत्राचे संदर्भान्वये प्रादेशीक नळ पाणी पुरवठा योजना गळनिंब शिरसगांव व 18 गावे तालुका नेवासा या योजनेकरिता दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणेकामी कार्यारंभ आदेश दिनांक 01/08/2015 पासून पुढील 12 महिन्यांसाठी देणेत आलेले आहे. सदर निवीदेची मुदत दिनांक 31/07/2016 रोजी संपत असल्याने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नेवासा यांचे आदेशाची कार्यालयीन टिपणी दिनांक 25/07/2016 अन्वये लाभार्थी गावांमध्ये पुरेसा पाऊस नाही. तसेच पाणी टंचाई आहे म्हणुन सध्या काम करीत असलेल्या एजन्सीकडूनच त्याच अस्तित्वातील निवीदेच्या दराने पुढे योजना चालविणेस मुदतवाढीस मान्यता देणेत आलेली असून सदर योजनेकरीता सन 2016-2017 मध्ये रक्कम रुपये 6,39,000/- खर्च करणेत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेकडील दिनांक 14/07/2015 चे पत्रानुसार गटविकास अधिकारी, नेवासा यांनी निविदा धारकास दिनांक 28/07/2015 चे पत्रान्वये कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असुन सदर योजना राबविण्याची मुदत 12 महिने असल्याने दिनांक 31/07/2016 रोजी योजना राबविण्याची मुदत संपत असल्याने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नेवासा यांचे दिनांक 25/07/2016 आदेशाची कार्यालयीन टिपणीनुसार सध्या कार्यरत असलेल्या एजन्सीकडूनच त्याच अस्तित्वातील निविदेच्या दराने पुढे योजना चालविणेस कोणतेही संयुक्तीक कारण नसताना मुदतवाढीस मान्यता देणेत आलेली आहे. एकच वर्षाची निविदा मंजूर असताना पुढील अर्थिक वर्षात ई - निविदा प्रसिध्द करणे व नवीन निविदेप्रमाणे दर मंजूर करुन त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

**4.314 शेवगांव पाथर्डी 48 गावे प्रादेशीक नळ पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापन करणे**

**पंचायत समिती शेवगाव, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** शेवगांव पाथर्डी 48 गावे प्रादेशीक नळ पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापन करणेकरिता रककम रूपये 25,61,010/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे पत्र क्रमांक ग्रापापु/कार्य/निविदा/ 261/ 2015, दिनांक 15/04/2015 अन्वये गट विकास अधिकारी यांनी प्रादेशीक नळ पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती देयके अदा करणेची कार्यवाही करणेत येईल, असे नमूद आहे. तथापि, या निवीदेबाबतची सर्व प्रक्रीया ही जिल्हा परीषद स्तरावर आहे. प्रत्येक वर्षी निविदा प्रकीया न राबविता त्याच निविदा धारकास वाढीव मुदत देवून त्याच्याकडून योजना राबविणेत येत आहे. निविदा न मागविता जुन्या निविदाधारकास मुदतवाढ देणेबाबत खुलासा करावा.

**4.315 नैसर्गिक आपत्ती आणि निकडीचा पाणीपुरवठा योजनेबाबत (टंचाई)**

**पंचायत समिती पाथर्डी, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** लेखापरीक्षण कालावधीत जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडून सन 2016-2017 या आर्थिक वर्षात पाणी टंचाई अनुदान मागील अनुदान सह रक्कम रूपये 13,42,45,170/- प्राप्त आहे. तसेच खाजगी टँकरने पाणीपुरवठा करणे व विहीर अधिग्रहण याकरीता रक्कम रूपये 13,39,52,689/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विहिर अधिग्रहण / पाण्याचे उदभव ठिकाण ते पाणीपुरवठा करावयाचे गाव, गावातील वाडी किंवा विशिष्ट ठिकाण या प्रत्येक अंतराची गटविकास अधिकारी / तहसिलदार यांनी संयुक्त प्रत्यक्ष पाहणी करून प्रमाणपत्र नमूद केलेले नाही.

2) संबंधित टँकरच्या प्रत्यक्ष प्रवासानुसार (स्पिडोमीटर प्रमाणे) धावसंख्या (रनिंग) त्याच्या लॉगबुकात नोंदविण्यात आलेली नाही, तर उपविभागीय अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती, पाथर्डी यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे कि.मी. अंतराची नोंद मध्ये लॉगबुकात घेतलेली आहे. त्यामुळे संबंधित टँकरच्या स्पिडोमिटरमधील आकडे आणि प्रत्यक्ष टँकरने केलेल्या प्रवासाचे कि.मी. अंतर याची पडताळणी करता आली नाही.

3) प्रमाणक क्रमांक 395 दिनांक 31/03/2017 रक्कम रूपये 2,72,63,892/- रक्कम खर्च दर्शविला आहे. तथापि, सदर रक्कमेवर रूपये 6,27,070/- इतकी आयकर कपात करणे आवश्यक असतांना तो केला नाही. तरी संबंधिताकडून आयकर रक्कम वसूल करून शासन सदरी भरणा करून अनुपालन दर्शवावे

4) प्रमाणक क्रमांक 16 दिनांक 09/09/2016 रूपये 2,79,75,355/- अन्वये पाणी टँकर वाहतुकीच्या रकमा अदा केलेल्या आहेत. लेखापरीक्षण अहवालातील परिशिष्टानुसार देय असलेल्या कि.मी. पेक्षा जादा कि.मी दर्शवून तसेच जीपीएसनुसार खेपा दर्शविलेल्या नाहीत. तरी एकूण रक्कम रुपये 2,30,191/- वसुल करून अनुपालन दर्शवावे.

5) प्रमाणक क्रमांक 373 दिनांक 31/03/2017 रूपये 3,31,81,862/- अन्वये पाणी टँकर वाहतुकीच्या रकमा अदा केलेल्या आहेत. लेखापरीक्षण अहवालातील परिशिष्टानुसार देय असलेल्या कि.मी.पेक्षा जादा कि.मी दर्शवून तसेच जीपीएसनुसार खेपा दर्शविलेल्या नाहीत. तरी एकूण रक्कम रुपये 9,93,832/- वसुल करून अनुपालन दर्शवावे.

6) प्रमाणक क्रमांक 374 दिनांक 31/03/2017 रूपये 23,58,460/- अन्वये पाणी टँकर वाहतुकीच्या रकमा अदा केलेल्या आहेत. लेखापरीक्षण अहवालातील परिशिष्टानुसार देय असलेल्या कि.मी.पेक्षा जादा कि.मी दर्शवून तसेच जीपीएसनुसार खेपा दर्शविलेल्या नाहीत. तरी एकूण रकम रुपये 5,054/- वसुल करावे.

7) जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडून सन 2016-2017 या आर्थिक वर्षात पाणी टंचाई अनुदान मागील अनुदानसह रक्कम रूपये 13,42,45,170/- प्राप्त असून खाजगी टॅकरने पाणीपुरवठा करणे व विहीर अधिग्रहण याकरीता रक्कम रूपये 13,39,52,689/- खर्च केलेला आहे. प्राप्त अनुदान पैकी रक्कम रूपये 2,92,481/- अखर्चित असून सदरची रक्कम शासन सादरी भरणा करून पूर्तता दर्शवावी.

8) पाणी वाहतूक वाहनाचे लॉग बुकची पडताळणी केली असता पाणी टँकर क्रमांक MH-12/4789 दिनांक 23/05/2016 ते 23/06/2016 या कालावधीत ग्रामसेवक यांचे स्वाक्षरी नाहीत व लॉग बुक प्रमाणित नाही. MH-20/9333 दिनांक 01/06/2016 ते 30/06/2016 या कालावधीचे गटविकास अधिकारी यांचे आदेश लॉग बुकला नाहीत. MH-20/AA7911 व MH-14/9090 चे लॉगबुकवर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

**4.316 टंचाईग्रस्त ग्रामीण भागात (नैसर्गीक आपत्ती 2245) टँकरने पाणी पुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती पारनेर, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती, पारनेरकडे सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील टंचाईग्रस्त गावांना शासकीय व खाजगी टँकरणे पाणी पुरवठा केलेला आहे. पंचायत समिती कडील उपलब्ध अभिलेख्यावरुन लेखापरीक्षण करून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पिण्याचे पाण्याचा पुरवठा करणारे टँकरवर देखरेख करण्यासाठी गाव/ वाडया येथे महिला कमिटी गठीत केलेबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही.

2) प्रमाणक क्रमांक 449 दिनांक 31/03/2017 अन्वये रुपये 5,65,275/- हर्षवर्धन पाटील मोटार वाहतूक संस्था, इंदापू,र जिल्हा पुणे खाजगी टँकर भाडे कालावधी दिनांक01/12/12 ते 31/12/12 व दिनांक 01/11/12 ते 15/02/13 या कालावधीचे देयक पास करून रक्कम पुन्हा उपकर निधीमध्ये जमा घेतलेली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 27 अन्वये कार्यवाही झालेली नाही.

3) प्रमाणक क्रमांक 57 दिनांक 22/02/2017 रूपये 5,47,096/- पैकी उपप्रमाणक क्रमांक 37,295 दिनांक 06/10/2016 पंन्नास लि. डिझेल रूपये 2,863/-, ऑईल 1 लीटर रूपये 275/- असे एकुण रूपये 3,138/- चे नोंद शासकीय टँकर क्रमांक MH16T 274 वाहन लेख्यात नसल्याने सदर रक्कम रूपये 3,138/- वसुल पात्र आहे. तसेच उपप्रमाणक क्रमांक 37291, दिनांक 03/10/2016 डिझेल 50 लीटर रूपये 2,862/- गेअर ऑईल 1 लीटर रूपये 254/- एकुण रूपये 3,116/- ची नोंद शासकीय टँकर क्रमांक MH 16 T 275 च्या वाहन लेख्यात नसल्याने सदर रक्कम रूपये 3,116/- वसुलपात्र आहे.

4) प्रमाणक क्रमांक 11 दिनांक 01/09/2016 रूपये 3,06,097/- पैकी उपप्रमाणक क्रमांक 32167 दिनांक 10/06/2016 डिझेल 150 लीटर रूपये 8,737/- चे नोंद शासकीय टँकर क्रमांक MH-16-T-276 चे वाहन लेख्यात नसल्याने सदर रक्कम रूपये 8,737/- वसुलपात्र आहे. तसेच उपप्रमाणक क्रमांक 32166 दिनांक 10/06/2016 डिझेल 140 लीटर रूपये 8,155/- ची नोंद शासकीय टँकर क्रमांक MTD 3571 च्या वाहन लेख्यात नसल्याने सदर रक्कम रूपये 8,155/- वसुलपात्र आहे.

इंधन व पाणी पुरवठा उध्दभव व अधिग्रहणावर रूपये 8,78,51,940/- खर्च नोंदविलेला आहे.

5) गटविकास अधीकारी / तहसीलदार यांनी लॉगबुकाचे अचानक तपासणी करून खेपा व प्रत्यक्ष अंतर तपासुन लॉगबुकावर तसे प्रमाणपत्र नोंदवणे आवश्यक आहे.

6) महसुल यंत्रणेचा टँकरच्या कीती खेपा टाकावयाच्या या बाबतचा आदेश उपलब्ध झालेला नाही.

7) विहीर व पाणी पुरवठा उध्दभव अधिग्रहणाबाबत विहीत केलेले नमुना नोंदवही उपलबध झालेली नाही.

8) विहीर व पाणी पुरवठा उध्दभव अधिग्रहण ठिकाणापासुन प्रत्यक्ष टंचाई अंतर उपअभियंता यांनी तपासुन प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

9) विहीर व पाणी पुरवठा उध्दभव अधिग्रहण ठिकाणापासुन प्रत्यक्ष टंचाई अंतर गटविकास अधिकारी/ तहसीलदार यांनी प्रत्यक्ष पाहणी करून प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

प्रवास भत्ता / अतीकालीक भत्ता देयकाबाबत.

**4.317 नैर्सगिक आपत्ती आणि निकडीचा पाणीपुरवठा योजनेबाबत (टंचाई)**

**पंचायत समिती संगमनेर, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** लेखापरीक्षण कालावधीत जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडून सन 2016-2017 या आर्थिक वर्षात आलेले टंचाई अनुदान खाजगी टॅकरने पाणीपुरवठा करणे याकरीता रक्कम रूपये 4,81,12,632/- अदा केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विहिर अधिग्रहण / पाण्याचे उदभव ठिकाण ते पाणीपुरवठा करावयाचे गाव, गावातील वाडी किंवा विशिष्ट ठिकाण या प्रत्येक अंतराची गटविकास अधिकारी / तहसिलदार यांनी संयुक्त प्रत्यक्ष पाहणी करून प्रमाणपत्र नमूद केलेले नाही.

2) संबंधित टँकरच्या प्रत्यक्ष प्रवासानुसार (स्पिडोमीटरप्रमाणे) धावसंख्या (रनिंग) त्याच्या लॉगबुकात नोंदविण्यात आलेली नाही तर, उपविभागीय अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती, संगमनेर यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे कि.मी. अंतराची नोंद मध्ये लॉगबुकात घेतलेली आहे. त्यामुळे संबंधित टँकरच्या स्पिडोमिटर मधील आकडे आणि प्रत्यक्ष टँकरने केलेल्या प्रवासाचे कि.मी. अंतर याची पडताळणी करणे शक्य होत नाही. त्यात तफावत असल्यामुळेच लॉगबुकात प्रत्यक्ष प्रवासानुसार स्पिडोमिटरप्रमाणे अंतराची नोंद केलेली नाही, असे म्हणण्यास वाव आहे. याबाबत योग्य तो खुलासा होणे आवश्यक आहे.

3) प्रमाणक क्रमांक 277 दिनांक 31/03/2017 रक्कम रूपये 1,16,28,943/- रक्कम खर्च दर्शविला आहे. तथापि, सदर रक्कमेवर रूपये 2,67,466/- इतकी आयकर कपात करणे आवश्यक असतांना तो केला नाही. तरी संबंधिताकडून आयकर रक्कम वसूल करावी व शासन सदरी भरणा करावा.

**4.318 ग्रामपंचायतींना दिलेल्या दिवाबत्ती व ग्रामीण पाणीपुरवठा योजनेचे वीज देयक विहीत मुदतीत भरलेल्या विज देयकावर 50 टक्के प्रोत्साहन अनुदानात झालेल्या अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती संगमनेर, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती संगमनेर यांचेकडील सन 2016-2017 निवडक महिन्याचे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडील प्रमाणकाचे लेखापरीक्षणात (माहे फेब्रुवारी 2016 व मार्च 2017) ग्रामपंचायतींना महावितरण कंपनीचे विज बिलांवर 50 टक्के अनुदान दिले असुन ते बिले पारीत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस -2085/सी आर /1940/22, दिनांक 29/07/1986 प्रमाणे ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यावर दिवाबत्तीसाठी ग्रामपंचायतींना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस भराव्या लागणा-या वीजेच्या बिलापोटी शासनाकडुन 50 टक्के अनुदान देण्याची तरतूद आहे. तसेच पिण्याच्या पाण्याच्या पुरवठयासाठी ग्रामपंचायतीस भराव्या लागणा-या वीजेच्या बिलापोटी 50 टक्के अनुदान देण्याची तरतूद आहे. म्हणजेच ग्रामपंचायतीने जिल्हा परिषदेकडे विहीत मुदतीत वीजेची देयके भरल्यानंतर ती सादर करुन प्रतिपूर्ती अनुदानाची रक्कम ग्रामपंचायतीने प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तथापि, ग्रामपंचायतीने विहीत मुदतीत विज बिले न भरता दंडाचे रक्कमांचे बिले सादर करून लेखापरिक्षण वर्षात प्रोत्साहन अनुदान रूपये 1,84,419/- प्राप्त केले आहे. ते लेखापरीक्षणाला मान्य करता येत नाही.

2) ग्रामपंचायत चिखली व प्रादेशिक नळ पाणीपुरवठा तळेगाव दिघे व इतर 20 गावे प्रमाणकाला ग्रामपंचायतीचे विज बिले रक्कम रूपये 18,97,821/- लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही अथवा छायांकीत प्रती उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे सदर बिले विहीत मुदतीत भरलेबाबत पडताळणी करता आली नाही. सदर देयकांचा मुदतीत भरणा केला नसल्यास ते वसुलास पात्र राहतील. तरी बिले उपलब्ध करण्यात यावी व दिलेले अनुदान योग्य दिले असल्याची लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

3) लेखापरिक्षण वर्षात अशा वीजेच्या बिलाची किती आकारणी झाली किंवा वीजेची देयके भरण्यात आली तसेच किती रक्कम अद्याप थकीत आहे, याबाबतची नोंदवही ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने ठेवलेली नसल्याने वीज बिल मागणी रक्कम, भरणा रक्कम व थकबाकीबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही.

**4.319 टँकरने पाणी पुरवठा केलेबाबतच्या अनियमिततेबाबत**

**पंचायत समिती भोर, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती, भोर यांचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात टँकरने पाणी पुरवठा केलेबाबतच्या अनियमिततेबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 5,49,872/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक 3099/प्र.क्रं.14/पापु-14, दिनांक 01/02/1999 अन्वये टँकर मंजूरीचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असून सदर विभागाचे दिनांक 31/03/2006 च्या शासन निर्णयान्वये टँकर मंजूरीचे अधिकार तहसिलदार यांना पुर्नप्रदान करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सदर विभागाचे शासन निर्णय क्रमांक टंचाई-1003/प्र.क्रं.364/पापु-14, दिनांक 23/12/2003 अन्वये

उपविभागीय अधिका-यांनी टंचाईसाठी लावलेल्या टँकरला 10 दिवसाचे आत कार्योत्तर मंजूरी घ्यावयाची आहे. मात्र याप्रमाणे कार्यवाही झालेली दिसून येत नाही. खाजगी टँकरचे अधिग्रहण आदेश दप्तरी नसल्याचे दिसून आले असून तरीही रककम अदा केली आहे.

2) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक -टंचाई2012/प्र.क्रं.53/पापु-14 दिनांक 30/04/2012 या आदेशातील अट क्रमांक 2 अन्वये खाजगी टँकर्स वरील टाकीची वहन क्षमता आर.टी.ओ. मार्फत प्रमाणित करणे आवश्यक आहे. तरी उपाभियंता यांनी प्रमाणित केलेल्या टँकर्सची साठवण क्षमता ग्राह्य धरून रक्कम आदा केली. हे नियमबाहय आहे.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1008/प्र.क्रं.05/पापु-14 दिनांक 25/03/2008 मधील अट-2 विहीर मालकाशी कायदेशीर करार करण्यात आलेला नाही.

4) खाजगी टँकरचे लॉगबुक, खेपाबाबत प्रमाणपत्रावर महिला सदस्यांच्या स्वाक्ष-या घेणे आवश्यक आहे. असे असताना टँकर क्रमांक एम.एच.`12-एच.डी.504 च्या खेपांच्या प्रमाणपत्रावर महिला ग्रामस्थ, तपासणी अधिकारी, सरपंच, गटविकास अधिकारी यांच्या सहया नाहीत.

5) वरील देयकातुन सेवाकर अधिसुचना 2/94 एसटी दिनांक 28/06/1994 व अधिसूचना 47/2012 एसटी दिनांक 28/09/2012 अन्वये सेवा पुरवठा करणा-या संस्थाच्या देयकावरील 70 टक्के रक्कमेवर सन 2016-2017 करीता 14.50 टक्के दराने सेवाकर वसुल करणे आवश्यक असतांना सेवा कर कपात केलेला नाही. तरी रक्कम रूपये 4,61,472/- च्या 70 टक्के रक्कम रूपये 3,23,030/- वर 14.50 टक्के नुसार 46,839/- सेवाकर वसूल करून शासन सदरी भरणा केलेचे दाखवावे.

6) टँकरने पाणी पुरवठा करताना लेखापरीक्षणास उपलब्ध केलेल्या छायांकित प्रतीतील अभिलेख्यात उणीवा आढळल्या असून भाड्यापोटी पुरवठादाराला जादा रक्कम आदा केली आहे.

**4.320 मौजे कोंडेश्वर येथे वाढीव नापापू लाईन टाकणे**

**पंचायत समिती मावळ, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती, वडगाव मावळ कडील सन 2016-2017 चे कामाची नस्ती, अंदाजपत्रक, दरपृथक्करण:, मोजपाम पुस्तकातील नोंदी व प्रमाणकाची नस्तीतील प्रत यांचे लेखापरीक्षण केले असता प्रमाणक क्रमांक 35, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 2,64,573/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, अधिसूचना क्रमांक 67 दिनांक 15/05/2015 अनुसार गौण खनिजाच्या वापराची स्वामित्वधनाची रक्कम भरणा केलेली आहे. परंतु, वापरापैकी काही बाबीतील स्वामित्वधनाची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. सबब गौण खनिजाच्या वापराची स्वामित्वधनाची रक्कम वसूल करुन शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे. (स्वामित्वधनाची प्रती क्यु.मी.चा दर रुपये 141.34)

2) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम क्रमांक 180 अनुसार बिल संमत करणेत आले. त्याचा प्रमाणक क्रमांक मोजमाप पुस्तिकेच्या गोषवा-याखाली लाल शाईने नमूद करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही. मोजमाप पुस्तीकेची तपासणी केली असता देयक आदा केलेनंतर लाल शाईने त्यावर कर्ण रेषा ओढणेत आलेली नाही. सदरची बाब नियमबाहय असुन त्यामुळे दुबार देयक अदा होणेची शक्यता नाकारता येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपरं-200/प्र.क्र.180/ पंरा-5 दिनांक 31/12/2009 अन्वये कामाचे आदेश देताना दोष / उणिवा दायित्व कालावधी नमूद करणे आवश्यक असताना त्यानुसार कार्यवाही झालेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास-2011/प्र.क्र.217/ पं.रा.8, दिनांक 15/11/2011 मधील परिच्छेद क्रमांक 5 क अन्वये गुणवत्ता तपासणी होऊन दर्जाबाबत प्रमाणित केल्याशिवाय कंत्राटदाराची बिले अदा करु नये. असे असताना चाचणी केलेली नाही. सदरील साहित्याची गुणवत्ता प्रमाणित होत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा असंहिता 1968 चे नियम 147 नुसार मंजूर करण्यात आलेला प्रत्येक करारनामा नमुना नंबर 48 मधील नोंदवहीत नोंदवून नियम 148 नुसार बांधकामाच्या प्रारंभाचा व ते पूर्ण केल्याच्या वेळेचा तसेच इतर आवश्यक अटी शर्तीचा करारनाम्यात उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच नियम 146 व 148 नुसार करारनाम्यात संपूर्ण तपशिल देणे आवश्यक असताना तसेच नियम 116 (2) नुसार सदर करारनामा पंचायत समितीच्या सामान्य मुद्रेने मोहोरबंद करणे आवश्यक आहे अन्यथा सदर करारनामा जिल्हा परिषद बंधनकारक ठरत नाही. त्यामुळे करारनामे करताना वरील तरतुदीचे योग्य पालन केलेले नाही

9) कामाच्या फलकासाठी रक्कम प्रदान केली आहे. परंतु, सदरील कामाचे फोटो नस्तीसोबत नाहीत.

**4.321 वाहन उपलब्ध नसतांना वाहन चालकास वेतन व भत्त्यावर खर्च केलेबाबत.**

**पंचायत समिती फलटण, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती, फलटण सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात पाणी पुरवठा विभागाकडील वेतन देयकांची तपासणी करता वाहन चालकाच्या वेतनावर रुपये 3,14,421/- इतका खर्च नोंदविण्यात आलेला आहे. विभागाकडे शासकीय वाहन उपलब्ध नसून खाजगी भाडेतत्वावरील वाहन चालकासह वाहन उपलब्ध असतांना वाहन चालक पदाचे वेतन व भत्ते अदा करणे नियमबाहय आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील आदेश जा.क्र. 451/2014/सामान्य प्रशासन विभाग, दिनांक 02/09/2014 अन्वये संबंधित वाहन चालकांची बदली प्राथमिक आरोग्य केंद्र, बरड येथे झालेली असतांना अद्यापपर्यंत संबंधितांस कार्यमुक्त करण्यात न आलेने वाहन चालकाच्या वेतन व भत्त्यावर नाहक खर्च शासन निधीतून झालेला आहे.

**4.322 मंजूरी आदेश नसतांना टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेबाबत.**

**पंचायत समिती माण, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 26 दिनांक 24/08/2016 अन्वये रक्कम रुपये 19,20,931/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अनुक्रमांक 1 जाधववाडी (निंबाळकरवस्ती 1 व 2), जाधववस्ती, चव्हाणवस्ती यासाठी पाणी पुरवठा करणेकरीता नियुकत वाहन क्रमांक एमएच 12 एक्यु 1238 प्रदान रुपये 1,34,527/-, लॉगबुक पाहता मार्च 2016 - 30 दिवसांकरीता प्रदान केले आहे. मात्र सोबतचे मंजूर आदेश क्रमांक उपविभागीय अधिकारी, माण क्रमांक दहिवडी/टंचाईकावि/1149/2015, दिनांक 31/05/2015 हे मे 2015 मधील आहेत. यात शेवरी या गावाचा अनुक्रमांक 5 अन्वये समावेश आहे. तथापि, मार्च 2016 मधील अन्य गावांकरीताचे आदेश जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक रोहयो/पाणी टंचाई/कावि/498/16, दिनांक 19/01/2016 अन्वये तहसिल कार्यालय कावि/एस.आर./टंचाई/33/22016 दिनांक 22/02/2016 शेवरी या गावाचा नव्याने समावेश आहे. सदर आदेशामध्ये मौजे शेवरी व वाडया व वस्त्या येथे शासकीय टँकर उपलब्ध नसलेने नवीन खाजगी टँकर एमएच 04 एक्यु 6180 यास दिनांक 23/03/2016 पासून मान्यता दिली. शेवरी गावास एमएच 43 एफ 1499 द्वारे देखील पुरवठा केला आहे. म्हणजे दिनांक 31/05/2015 चे आदेश हे शासन निर्देशानुसार टंचाई कालावधीअखेर म्हणजे दिनांक 30/06/2015 पर्यंतच अस्तित्वात असल्याने त्यानंतर रद्दबातल झाले आहेत. असे असता त्याचा आधार घेऊन केलेले मार्च 2016 मधील प्रदान मान्य करता येत नाहीत. सबब रक्कम रुपये 1,34,527/- अंतिम अमान्य करणेत येत आहे.

2) टँकर कमांक एम.एच. 15 सी.के. 78 यास तहसिलदार, माण यांचे आदेश क्रमांक, टंचाई/बि.अधि/ एस.आर./11/16, दिनांक 23/02/2016 चे अनुषंगाने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माण यांचे आदेश क्रमांक पंसमा/टंचाई/300/2016, दिनांक 26/02/2016 अन्वये वडगांव येथे प्रतिदिन 2 खेपा करणेचे आदेशित केले. तथापि, दिनांक 01/03/2016 ते 09/03/2016 पर्यंत वडगांव येथे 1 खेप केलेचे नोंदले आहे. दिनांक 19/03/2016 ते 31/03/2016 अखेर बिजवडी येथे परस्पर कोणताही आदेश नसतांना प्रतिदिन 2 खेपा केल्याचे नोंदले आहे. तसेच सदर नोंदी उपरीलेखनाने (पांढरी शाई लावून) केल्या आहेत. त्यामुळे दिनांक 09/03/2016 ते 31/03/2016 अखेर

एकुण 2,088 किमी साठी अदा रुपये 1,29,942.89/- एवढे प्रदान कोणत्याही मान्यतेशिवाय केले असल्याने नियमबाहय झाले आहे. त्यामुळे सदर प्रदान वसूलपात्र असलेने अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

3) वाहन क्रमांक एम.12 क्यु 9501 यांचे माहे मार्च 2016 पासूनचे नवीन लॉगबुक पाहता, पृष्ठ क्रमांक 1 ते 11 अन्वये शिंदी खुर्द (F.P.) ते टाकेवाडी गावठाण व वस्त्या ठिकाणी दिनांक 12/03/2016 ते 31/03/2016 या कालावधीकरीता पाणी पुरवठा केला आहे. मात्र तहसिलदार, माण यांचे आदेश क्रमांक कावि/ एसआर/टंचाई/50/2016, दिनांक 11/04/2016 अन्वये दिनांक 12/04/2016 पासून पाणी पुरवठा करणेचे आदेश दिले. याखालील टीपनुसार टाकेवाडी येथील पूर्वीच्या दोन खेपा करुन सदरची वाढीव खेप करण्याचे आदेशित केले आहे. मात्र लॉगबुक व जीपीएस अहवाल पहाता दिनांक 12, 14, 18, 25, 27, 30, 31 रोजी फक्त 1 खेप तर दिनांक 12, 15, 16, 17, 19 ते 24, 26, 28 रोजी 2 खेपा व दिनांक 29/03/2016 रोजी एकही खेप केली नाही. म्हणजे 3 खेपा एकाही दिनांकास केल्या नाहीत. नस्तीसोबत दिनांक 12/03/2016 ते 31/03/2016 या कालावधीतील पुरवठयाचे तहसिलदार यांचे आदेश उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे उपरोक्त दिनांकाच्या एकूण 703.80 किमी धाव करीता अदा रुपये 44,664/- एवढे प्रदान योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

4) जीपीएस च्या ROUTE DEVIATION REPORT पाहता दिनांक 12/03/2016 रोजीची प्रत जोडली नाही. त्यामुळे करारनामा अट क्रमांक 29 चे पालन झाले नाही. सबब त्या रोजीचे फक्त लॉगबुकनुसार केलेली प्रदान रुपये 1,415.80/- मान्य करता येत नाही.

5) वाहन क्रमांक एम.एच.43 इ. 1277 या वाहनास तहसिलदार, माण व वाहन क्रमांक एम.एच. 43 इ. 1462 या वाहनास तहसिलदार, माण यांचे आदेश क्रमांक कावि/एसआर/टंचाई/30/2016, दिनांक 14/03/2016 अन्वये वावरहिरे वस्त्यांना पाणी पुरवठा करणेचे आदेशित केले. या कालावधीचा पाणी पुरवठा करण्याचा ठेका हा ठेकेदार अल्ताफ नुरमहंम्मद तांबोळी, मु.पो. कडा, ता. आष्टी यांना मंजूर असून देयक यांचे नावे नोंद केले. मात्र नस्तीसोबत GPS UNSCHEDULED DEVIATION REPORT पहाता दिनांक 01/04/2016 ते 03/05/2016 या कालावधीकरीता या वाहनाचा रकाना क्रमांक 3 नुसार वाहतुकदार (TRANSPORTER) सदरी SATPUTE ALL VEHICLES असे नमूद केले आहे. श्री. सातपुते यांचा वाहतुक ठेका निविदा जिल्हाधिकारी यांनी दिनांक 27/04/2016 रोजी मंजूर करुन करारनामा दिनांक 02/05/2016 रोजी केला आहे. असे असता तत्पुर्वी त्यांचे नांवे जीपीएस नोंदीनुसार असलेल्या वाहनाद्वारे नोंदलेले लॉगबुक व त्यांचे प्रदान दिनांक 01/04/2016 ते 30/04/2016 करीता रुपये 63,369.76/- व दिनांक 01/05/2016 ते 03/05/2016 करीता रुपये 6,371.36/- एकुण रुपये 69,741/- नियमबाहय असलेने अंतिम अमान्य करणेत येत आहे.

**4.323 पाणी टंचाई निवारणासाठी विहीर अधिग्रहरण व टँकर भाडे खर्चाबाबत.**

**पंचायत समिती जावली, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती, जावली यांनी पाणी टंचाई निवारणासाठी विहीर अधिग्रहण व टँकर भाडे इत्यादींसाठी रुपये 8,69,204/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खाजगी टँकर पाणी पुरवठयासाठी प्रथम हजर होणेपूर्वी वाहतुक ठेकेदारांनी उपप्रादेशिक कार्यालय, सातारा यांचेकडून वाहन क्षमता प्रमाणपत्र घेतल्याची प्रत सादर केलेली नाही.

2) करारनाम्यातील अटींनुसार नादुरुस्त अथवा विनाकारण आकारणी केली जाणार नाही, याची हमी अथवा टँकरनिहाय नोंदवही ठेवल्याचे आढळले नाही.

3) टँकर वापरणाऱ्यांची वाहन चालकाच्या स्वाक्षऱ्या नाहीत. तसेच कार्यालय प्रमुख उपअभियंता व गटविकास अधिकारी यांनी वारंवार तपासणी केलेबाबत स्वाक्षऱ्या नाहीत. लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की, केवळ नोंदी (लॉगबुकावर) घेण्याच्या उद्देशाने नोंदी घेतलेल्या आहेत.

4) विहीत नमुन्यात लॉगबुक ठेवलेले आहे. परंतु, प्रत्येक टँकरसाठी स्वतंत्र लॉगबुक ठेवलेले नाही. इंधन वापराचा कोठेही नोंद घेतल्याचे दिसून येत नाही.

5) टँकरमध्ये नमूद केलेली धावसंख्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणित केलेली नाही.

6) ज्या ठिकाणी पाणी टँकर भरले जातात, त्या फिडींग पॉईंटवर शासकीय कर्मचारी नेमणुक करणे आवश्यक आहे. ती केल्याचे दिसून येत नाही.

7) ज्या ठिकाणी पाणी भरले जाते, त्या ठिकाणी पाण्याचे मोजमाप किती लिटर पाणी भरले? याची नोंद टँकर बुकवर घेतलेली नाही.

8) गावोगावी वाटप करतेवेळी वाया गेलेल्या पाण्याची तुट, त्यापोटी देयकातून रक्कम वसुल केल्याचे दिसून येत नाही.

9) ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील उपअभियंता फिडींग पॉईंटवर प्रत्यक्षात ज्या ज्या गावांना पाणी पुरवठा केला जातो, त्या त्या गावांना पाणी पुरवठा केला जातो का? याबाबत वारंवार भेटी दिलेबाबत कोठेही अभिप्राय दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर पाणी पुरवठयावर केलेल्या खर्चाच्या देयकावर नियंत्रण ठेवल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त प्रमाणकाचा तपशिल पाहता पंचायतीने विहीर अधिग्रहण व पाणी टँकर भाडेपोटी प्रत्यक्ष पाणी पुरवठा केल्याबाबत उपअभियंता यांच्या कोणत्याही ठिकाणी स्वाक्षऱ्या नसल्याने साशंकता वाटते.

### 4.324 खाजगी टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी केलेल्या अदायगीतील उणिवांबाबत.

**पंचायत समिती आटपाडी, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** ग्रामीण पाणी पुरवठा खर्चाचे रजिस्टर महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहितेतील नमुना नंबर 14 मधील निवड महिन्यातील खर्च प्रमाणकांची तपासणी केली असता रक्कम रुपये 52,33,343/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाणी पुरवठा करण्यासाठी वापरात आणलेल्या कोणत्याही टँकर/ ट्रॅक्टरचे विहीत नमुन्यात लॉगबुक ठेवण्यात आलेले नाहीत. त्यामुळे कोणत्या ठिकाणी पाणी पुरवठा केला? कोणत्या ठिकाणाहून पाणी भरण्यात आले? अंतर किती किलोमीटर झाले? कोणकोणत्या ठिकाणी पाणी पुरवठा केला आहे? पाणी भरताना विजपंप अथवा डिझेल इंजिनचा वापर केला? याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) टँकरची क्षमता 12,000 लिटर असल्याचे प्रमाणपत्र प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे घेण्यात आलेले नाही.

3) जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडील आदेश क्रमांक गृह/१ कार्या-6/नै.आ./पाणीटंचाई/आर आर/39/2017 दिनांक 14/02/2017 मधील अट क्रमांक 13 नुसार प्रती दिन करण्यात आलेल्या खेपांपैकी एका खेपेसाठी तलाठी/ग्रामसेवक/सरपंच/पोलीस पाटील/ ग्रामीण पाणी पुरवठा सदस्य यांचेपैकी 2 व्यक्तींचे स्वाक्षरी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र गावातील 9 प्रतिष्ठीत व्यक्तींच्या सदस्यांपैकी एकाही व्यक्तीची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

4) जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडील आदेश क्रमांक गृह/1 कार्या-6/नै.आ./पाणीटंचाई/आर आर/39/2017 दिनांक 14/02/2017 मधील अट क्रमांक 14 नुसार पाणी पुरवठ्यासाठी केलेल्या प्रवासाच्या नोंदी लॉगबुकात नोंदवुन संबंधित गट विकास अधिकारी किंवा संबंधित उपअभियंता, पंचायत समिती यांचेकडून साक्षांकित करुन घेणेचे आहेत. सदरचे लॉगबुकचे उतारे किंवा प्रमाणपत्र हजर केलेशिवाय पेमेंट (बिल) अदा केले जाणार नाही. असे असताना सादर केलेल्या काही लॉगबुकवर गट विकास अधिकारी किंवा संबंधित उपअभियंता यांची स्वाक्षरी नाही

5) कोणत्याही वाहनाचे वाहन यांत्रिकदृष्ट्या चांगल्या स्थितीत असून पाणी पुरवठा/पाणी वाहतुक कामासाठी वापरण्यास योग्य असल्याबाबतचे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सांगली यांचे प्रमाणपत्र (फिटनेस सर्टीफिकेट) सादर केलेले दिसून आले नाही.

6) सदर देयकातुन आयकर कपात करणेत आला आहे. तथापि, आयकर शासन खाती भरणा केल्याचे कोषागार प्रमाणीत चलन लेखापरीक्षणास सादर करावे.

7) टँकरने गावात ट्रीप केलेबाबत ट्रीपनिहाय वेळ कि.मी. नोंदविणे आवश्यक असताना, प्रतिदिन एकत्रित कि.मी. ची नोंद नमूद केली आहे.

8) गटविकास अधिकारी / तहसिलदार यांनी लॉगबुकाची अचानक तपासणी करून खेपा व अंतर प्रत्यक्ष तपासून लॉगबुकावर तसे प्रमाणपत्र नोंदविलेले नाही.

9) जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडील आदेश क्रमांक गृह/1 कार्या-6/नै.आ./पाणीटंचाई/आर आर/39/2017 दिनांक 14/02/2017 मधील अट क्रमांक 27 नुसार आदेशातील एक किंवा एकापेक्षा जास्त अटी व शर्तीचा भंग केलेस संबधिताकडुन प्रति टँकर प्रति दिन रुपये 5,000/- दंड आकारण्यात यावे, असे असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

10) प्रमाणक क्रमांक 32 दिनांक 31/03/2017 रक्कम रुपये 4,88,841/- या प्रत्येक्ष देयकामध्ये 27 खेपा दर्शिवण्यात आल्या असून जी.पी.एस. प्रणालीमध्ये एकूण 26 खेपा दिसून येतात. त्यामुळे परिगणना केली असता एकूण रक्कम रुपये 2,202/- इतकी रक्कम वसूल पात्र होते.

**4.325 ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाकडील ब्लिचिंग पावडर खरेदीवर झालेल्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती पलूस, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाकडील ब्लिचिंग पावडर खरेदीवर रक्कम रूपये 4,82,680/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाने ब्लिचिंग पावडर रक्कम रुपये 4,82,680/- इतकी खरेदी एकाच वर्षात एकाच बाबीवर केली असून महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णयानुसार रुपये 3 लक्ष वरील खर्चास ई-टेडरिंग पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही. तथापि, प्रत्येक महिन्यात दरपत्रके मागवून खरेदी केली असून शासन निर्णयानुसार खरेदी करणे आवश्यक होते

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/ भाग III / उद्योग-4, दिनांक 01/12/2016 मधील 3.2.1 नुसार ई-टेडरिंग पद्धतीने निविदा मागवून खर्च करणे आवश्यक होते.

3) उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III /उधोग-4 दिनांक 01/12/2016 मधील 3.2.3 मधील (ड) नुसार मक्तेदाराचे पॅन कार्ड घेणे बंधनकारक असताना तशी कार्यवाही केली नाही.

**4.326 मौजे गादेगाव तालुका पंढरपूर येथील लक्ष्मीनगर येथे पाणीपुरवठा योजना करणे**

**पंचायत समिती पंढरपूर, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती, पंढरपूर सन 2016-2017 या कालावधीतील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील मौजे गादेगाव तालुका पंढरपूर येथील लक्ष्मीनगर येथे पाणीपुरवठा योजना करणे कामावर एकूण रक्कम रूपये 2,99,399/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 168 नुसार कामाचे मोजमापे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांनी कामाची 5 टक्के तपासणी करुन मोजमाप नोंदवहीमध्ये दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 153(3) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करुन घेणे आवश्यक आहे.

अंदाजपत्रकातील 4 बाबींवर एकूण रक्कम रुपये 50,314/- एवढा जादा खर्च केलेला आहे. सदर जादा खर्चाबाबत सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

3) सदर कामावरील साहित्य सिमेंट व स्टील यांचे चाचणी अहवाल श्री. विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इन्स्टीटयुट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर यांचेकडून घेण्यात आलेले आहे. तरी सदर संस्था ही शासनमान्य असलेबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

4) सदर कामासाठी वापरण्यात आलेली जागेचे बक्षीसपत्र दिनांक 27/10/2016 रोजी रूपये 100/- चे स्टॅम्पवर करण्यात आलेले आहे. सदरचे बक्षीसपत्र हे शासनाचे नोंदणी कार्यालयाकडून नोंद केलेले नाही. याबाबत खुलासा करावा. तसेच कामासाठी वापरण्यात आलेली जागा ग्रामपंचायत मालकीची नसताना प्रशासकीय मान्यता दिनांक 31/03/2016 रोजी कोणत्या आधारे दिली? याबाबत लेखापरीक्षणास समर्पक खुलासा करावा.

**4.327 पाणी टंचाई अंतर्गत ग्राम पंचायतीना ट्रॅकरने पाणी पुरवठा खर्चातील अनियमितता**

**पंचायत समिती अकोला, जिल्हा अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 26) -** पंचायत समिती, अकोला अंतर्गत सन 2016-2017 चे लेखापरिक्षणाचे वेळी नैसर्गिक आपत्ती पाणी टंचाईमध्ये अकोलाचे पाणी टंचाई ग्रस्त गावांना टँकरद्वारे जिल्हाधिकारी, अकोला यांचे आदेशानुसार पाणीपुरवठा केल्याबाबत रक्कम रुपये 1,27,10,582/- कंत्राटदारास प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गटविकास अधिकारी, पंयायत समिती, अकोला तथा तहसिलदार, अकोला यांचा जावक क्रंमाक पंसअ/ पाटं /कावी /283/ दिनांक 23/05/2016 नुसार जिल्हाधिकारी, अकोला यांना अहवाल सादर करण्यात आला असुन यामध्ये पंचायत समितीमार्फत टँकरमध्ये डिजेल पुरवठा केला असुन सबंधीत कंत्राटदाराने डिजेल दिलेले नाही, असे कळविले असून शासनाची दिशाभुल केल्याचा यामध्ये उल्लेख केलेला आहे. उलटपक्षी सदर कंत्राटदाराकडुन टँकर वेळेवर उपलब्ध न करणे, नादुरुस्त टँकर उपलब्ध करुन देणे, इंधनाचे टँकर उपलब्ध करून दिल्यामुळे पाण्यात तेलाचे प्रमाण जास्त असल्यामुळे गावकरी पाणी घेत नसल्याचेसुध्दा यामध्ये नमुद असू सदर कंत्राटदार या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करीत असून सदर कंत्राटदाराविरुध्द विधीयोग्य कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येत असल्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु, गटविकास अधिकारी यांनी सदर बाबीकडे पुर्णत: दुर्लक्ष करुन दंडात्मक कार्यवाही न करता देयकाची अदायगी केली आहे.

2) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला यांचे पत्र क्रंमाक जाक्रं /पंसअ/पाट/ बांध/कावी/574 / 2016, दिनांक 09/06/2016 नुसार सबंधीत कंत्राटदारास पत्र दिले असून पत्रामध्ये कंत्राटदारास पाणी पुरवठयामध्ये अनियमितता, टँकरमध्ये ऑईलचे प्रमाण असलेले पाणी पुरवठा करणे, टॅकर क्षमतेचे प्रमाणपत्र महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, अकोला यांचेकडुन प्रमाणपत्र, टँकरसबंधी आरटीओचे कागदपत्रे, टॅकर 20,000 लिटरचे आहे. परंतु, 30,000 लिटर दर्शविणे, लॉगबुक नियमीत न भरणे, फे-याची नोंद तथा महिला स्वाक्षरी ई - पुर्तता करुन GPS प्रणालीबाबत माहिती न देणे तथा वेळवर टँकरचा पुरवठा करणे याबाबत पत्र दिलेले आहे. म्हणजेच पाणीपुरवठा कालावधीमध्ये कंत्राटदाराकडुन पाणी पुरवठयामध्ये अनियमितता असतांना गटविकास अधिकारी यांनी सदर बाबीकडे दुर्लक्ष करुन दंडात्मक कार्यवाही करण्यात आली नाही.

3) जिल्हाधिकारी, अकोला यांचे सुधारीत टँकर आदेश क्रंमाक कक्ष 6(4)/ कली/ पाटं/ कावी 430/ 2016 दिनांक 22/05/2016 नुसार कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभाग, अकोला यांनी टँकर क्षमतेचे प्रमाणपत्र देण्यात यावे, असे आदेश आहेत. परंतु, याबाबत गटविकास अधिकारी यांनी क्षमता प्रमाणित केले असल्याचे दिसुन येत आहे. जिल्हाधिकारी, अकोला यांचे आदेश असंतांना कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचेकडून प्रमाणित न करता गटविकास अधिकारी यांनी प्रमाणीत करणे ही बाब अचुक नसल्यामुळे पाणी टँकर क्षमतेबाबत साशंकता व्यक्त करण्यात येत आहे. सदर बाबीकडे दुर्लक्ष करुन या प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही.

4) गटविकास अधिकारी, अकोला यांचे पत्र क्रंमाक पंसअ/ बांध/ पाटं /3275/ 2017, दिनांक 07/02/2017 नुसार टंचाईग्रस्त गावात पाणी पुरवठा केल्याबाबतचा अहवाल सबंधीत सचिव ग्रामपंचायत यांचेकडून त्यांनी ठेवण्यात आलेल्या रेकार्डच्याआधारे अहवाल मागविण्यात आला होता तथा सदर पत्रामध्ये ग्रामपंयायत स्तरावर सुध्दा नोंदवही ठेवुन यासबंधी सविस्तर माहीती ठेवण्याचे सुचना दिलेल्या असल्याचे नमुद आहे व त्यानुसार तात्काळ अहवाल सादर करण्याचे सुचना दिलेल्या आहेत. परंतु, असे अहवाल सबंधीताकडुन प्राप्त झालेले नसल्याचे दिसुन आले. त्यामुळे सदर बाबीची परिपुर्ण शहानीशा नसतांना देयके अदा करण्याची कार्यवाही झालेली असल्याचे दिसुन येत आहे.

5) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला यांचे पत्र क्रमाक जाक्रं /पंसअ /पाट/ बांध /कावी /630 / 2016, दिनांक 14/06/2016 नुसार सबंधीत कंत्राटदार श्री. अमरसिंह यांना दिनांक 14/06/2016 रोजी पाणीपुरवठा बंद केलेला असुन कार्यवाहीचेसुध्दा नमुद केल्याचे पत्रामध्ये नमुद आहे परंतु, देयक अदा करतेवेळी या सबंधी कोणत्याच प्रकारची दंडात्मक कार्यवाही दिसुन येत नाही.

6) सबंधीत कंत्राटदाराने पाणी पुरवठा करण्याचे दरम्यान पाणी पुरवठाबाबतचे लॉगबुक GPS प्रणाली, टँकर क्षमता प्रमाणपत्र इत्यादी दिलेले नसतांना सुध्दा पाणी पुरवठा कालावधीमध्ये कोणत्या प्रकारची व कशा पध्दतीने तपासणी झाली, याबाबत सांशकता येत आहे. सबंधीत कंत्राटदाराने दिनांक 27/03/2017 पावेतो कोणतेच कागदपत्रे कार्यालयाला दिलेले नसतांना व वर्षाअखेर शेवटच्या तारखेस दिनांक 31/03/2017 रोजी संपूर्ण कागदपत्रे कंत्राटदाराकडुन मिळाल्याचे दर्शवून जिल्हाधिकारी, अकोला यांचे आदेशातील अटी व शर्तीचे पालन झाल्याबाबत दर्शवुन गटविकास अधिकारी यांनी प्रमाणीत केले आहे तथा GPS प्रणाली अहवाल व लॉग बुकमधील नोंदी याबाबत सुध्दा खात्री केली असल्याचे सुध्दा गटविकास अधिकारी यांनी प्रमाणीत केले आहे तथा पाणी पुरवठा केलेल्या गावामधुन कोणतीही तक्रार विभागास प्राप्त नसल्याचे गटविकास अधिकारी यांनी प्रमाणीत करुन देयक बरोबर असल्याचा अभिप्राय नमुद करुन देयकाची अदायगीस मंजुरी देण्यात आल्याचे दिसुन येत आहे. वरील नमुद केल्याप्रमाणे जिल्हाधिकारी आदेशामधील अटी व शर्तीचे उल्लंघन तथा नमुद केल्याप्रमाणे फे-याबाबत सुध्दा उल्लंघन, पाणी पुरवठा सबंधी तक्रारी, क्षेत्रीय अधिकारी यांचा तपासणी अहवाल /खुलासा, क्षमता प्रमाणपत्र, GPS प्रणाली तपासणी करण्याचे दृष्टीने कंत्राटदाराकडुन शेवटपावेतो कार्यालयाला माहिती न देणे इत्यादी सर्व बाबी नजर अंदाज करुन तथा महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाकडून कोणत्या दिनांकास व कोणत्या वॉटर पॉइंटवरुन किती क्षमतेचे कोणकोणते टँकर भरुन दिल्याचे आधारे तपासणी न करता तथा टँकर क्षमता व फे-यासबंधी अचुक कार्यवाही / परीपुर्ण शहानीशा न करता तसेच काही लॉगबुकमध्ये एकच महिलेची सही असतांना अशा सर्व बाबींची पुर्तता नसतांना देयके अदा करण्याची कार्यवाही झालेली असल्याचे दिसुन येत आहे. नमुद बाबीची पुर्तेता करुन यामधील अनियमितता जादा प्रदानाची रक्कम दंडात्मक कार्यवाहीसह वसुल करणे गरजेचे आहे.

7) सबंधीत नस्तीबाबत कोणताच लिपीक तथा प्रभारी अधिकारी यांना माहिती नसल्याचे सांगण्यात आले. सदर प्रकरणी रेकार्ड दयावयाचे दृष्टीने केलेली टाळाटाळ तथा कोणत्याच प्रकारचा खुलासा तथा माहिती सबंधीतास माहिती नसल्यामुळे उपलब्ध नस्तीच्या व कागदपत्राचे आधारे तपासणी करण्यात आली असुन अभिप्राय नमुद केले आहेत.

**4.328 हातपंप व विजपंप देखभाल दुरुस्तीवर केलेल्या खर्चातील अनियमितताबाबत**

**पंचायत समिती पुसद, जिल्हा यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रुपये 12,47,427/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(क) नुसार एकावेळी रुपये 10,000/- किंवा एका वर्षात रुपये 75,000/- चे प्रदान एकाच पुरवठाधारकास होत असल्यास सदर पुरवठाधारकाकडून 2 टक्के आयकर व विक्री कर कपात करणे आवश्यक असतांना पांडे व सेवादास इलेक्ट्रीकल्स याच्या देयकातून आयकर व विक्रीकराची रक्कम कपात करण्यात आली नाही. तरी याबाबत संबधितावर जबाबदारी निश्चित करून रक्कम वसुल करण्यात यावी.

2) मोटर पंप रिपेअरचे वेळेस नवीन साहित्याचा वापर केल्याचे दाखवीले आहे. तसेच जूने साहित्य कंत्राटदाराकडून प्राप्त करून त्याची नोदं साठा पंजीवर घेवून ऱ्हास करणे आवश्यक होते. परंतू, जूने साहित्याचा ऱ्हास करुन रक्कम शासन खाती जमा केली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नूसार कामाकरीता वापरलेले साहित्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक होते. परंतू, वापरलेले साहित्याचा चाचणी अहवाल नसल्यामूळे योग्य दर्जाचे साहित्य वापरले किंवा कसे, याची खात्री करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास/1098/प्र.क्र.29/98, दिनांक 19/08/1998 तसेच विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 30/07/2002 च्या पत्रान्वये झालेल्या कामाच्या

किंमतीचे 1 टकके रककम विमा म्हणून बिलातून कपात करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. परंतू, त्याप्रमाणे रककम कपात केली नाही. सबब सदर रककमेची जबाबदारी निश्चित करून वसूल करून शासन खाती जमा करून अनूपालन दर्शवावे.

5) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक भुजल -1098/प्र.क्र 465 / पापु15, दिनांक 16/10/1998 चे परिशिष्ट-1 चे नियम 8 ब नुसार तालुका पातळीवर गटविकास अधिकारी यांचे कार्यालयात तालुक्यात एकूण खोदलेल्या विंधन विहिरी व त्यावर बसविण्यात आलेले पंप याबाबतची सविस्तर माहिती असलेली नोंदवही विहित नमून्यात ठेवणेचे आदेश आहेत. परंतू, त्याप्रकारे नोंदवही ठेवल्याचे आढळले नाही. सबब सदरचे कोणते पंप रीपेअर केले, याबाबत खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जल संधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भूजल1094/सीआर75/43, दिनांक 17/09/1994 अन्वये ग्रामीण भागातील हातपंपाची देखभाल दूरूस्तीस येणारा खर्च भागविण्यासाठी विहीत दराने ग्रामपंचायतीकडून वार्षिक वर्गणी वसूल करणे आवश्यक आहे. परंतू, त्याप्रमाणे ग्रामपंचायतीकडून वार्षिक वर्गणीची रक्कम वसूल केली नाही.

**4.329 पाणी टंचाई निवारणार्थ शासकीय व खाजगी टँकर वरील इंधन व वंगण खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती आर्णि, जिल्हा यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** शासकिय व खाजगी टँकरकरीता इंधन व वंगणवर 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 6,60,442/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचे आदेशान्वये श्री. मोतीलाल काबरा, रा. कुरमागडा, सईदाबाद. जिल्हा हैद्राबाद यांना आर्णी तालुक्यातील पाणी टंचाईग्रस्त गावात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याकरीता सुचित केले व तहसिलदार, आर्णी यांनी विहीर अधिग्रहणासह टँकरने पाणी पुरवठ्याचा कालावधीचे आदेश दिले. परंतू, आदेशामध्ये नमुद पाणी पुरवठा करण्याचा कालावधी संपल्यानंतर व प्रत्यक्ष टँकर बंद झाल्यानंतर सुद्धा सदर टँकरकरीता इंधन व वंगणवर उपबिजकाद्वारे खर्च नोंदविल्यामुळे शासनाचे निधीची हानी झाली आहे.

टँकर बंद झाल्यानंतर इंधन व वंगणवर नोंदविलेला खर्च लेखापरिक्षणात मान्य करता येत नाही. सबब, चौकशीअंती सबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन जादा प्रदानाची रक्कम रुपये 65,998/- वसुल करण्यात यावे.

2) जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सबंधीत ठेकेदारासोबत केलेला करारनामा दिनांक 04/02/2016 नुसार टँकरमध्ये जीपीएस यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. जीपीएस यंत्रणा बसविल्याबाबतचे अहवाल / अभिलेखे लेखापरिक्षणात आढळले नाही. परंतू, Ecocare Technologies चे अहवालामध्ये दिनांकनिहाय टँकरचे फक्त किलोमिटर दर्शविले आहे. तसेच खाजगी टँकरचे लॉगबुक लेखापरिक्षणात उपलब्ध न झाल्यामुळे ते सबंधीत गावात पोहचले अगर कसे, याची खात्री लेखापरिक्षणास पटली नाही. त्यासाठी सबंधित पाणी टंचाई गावाचे तलाठी, सचिव, सरपंच व महिला सदस्य यांचे स्वाक्षरीसह पाणी टंचाई सबंधित गावात पोहोचल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतू, तसे प्रमाणपत्र लेखापरिक्षणात आढळले नाही.

3) शासकीय टँकर क्रमांक MWY-9232 करीता इंधन व वंगण वर एकूण रक्कम रूपये 92,145/- एवढा खर्च झाल्याचे दिसुन येते. परंतू, सदर वाहनाचे लॉगबुक लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे खर्चाची सत्यता पडताळणी करता आली नाही. खर्चाची खात्री करावी तोपावेतो खर्चाची रक्कम तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

4) सार्वजनिक बांधकाम (यांत्रिकी) उपविभाग, यवतमाळ यांचे शासकिय टँकर क्रमांक MTV-3516 जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे अधिग्रहण आदेश क्रमांक 990-99/2016 नुसार पाणी टंचाईचे कामाकरीता पंचायत समिती, आर्णी यांचेकडे दिनांक 05/04/2016 रोजी पाठविण्यात आले आहे. सदर वाहनाचे वाहन चालक श्री. आर. एस. चिंचोरे यांना अतिकालीक भत्ता प्रदान केले असल्यामुळे वाहनाच्या फेऱ्या तरोडा ते जांबपर्यंत करणे आवश्यक होते. परंतू, आर्णी येथे परत आल्यामुळे जादा किलोमीटरमुळे इंधनावर रक्कम रूपये 1,976/- एवढा जादा खर्च झालेला आहे. (105 कि.मी./ 3 कि.मी. प्रती लिटर = 35 लिटर x रुपये 56.45 सरासरी दर = रुपये 1,976/-).

**4.330 विहीर अधीग्रहण मोबदल्याचे जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती संग्रामपूर, जिल्हा बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 24) -** विहीर अधीग्रहण धारकांना रक्कम रुपये 2,05,600/- मोबदला देण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अट क्रमांक 1 तहसिलदार, संग्रामपुर यांचे आदेश क्रमांक 116/16 दिनांक 04/06/2016 नुसार दिनांक 01/10/2015 ते 30/06/2016 पर्यंत विहीर अधीग्रहीत केली असुन त्या कालावधीचे प्रदान झाले. प्रत्यक्षात सरपंच, अध्यक्ष, पाणी पुरवठा समिती, सचिव यांनी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार दिनांक 09/10/2015 ते 30/06/2016 पर्यंत पाणी पुरवठा केल्याचे नमुद आहे. त्यामुळे 8 दिवसाचे 8 X 400 = रूपये 3,200/- जादा प्रदान झाले.

2) अट क्रमांक 2 तहसिलदार, संग्रामपुर यांचे आदेश क्रमांक 326/16 दिनांक 26/06/2016 नुसार दिनांक 03/04/2016 ते 30/06/2016 पर्यंत विहीर अधीग्रहीत केली असुन त्या कालावधीचे प्रदान करण्यात आले. प्रत्यक्षात सरपंच, पोलीस पाटील, सदस्य, सचिव यांनी पाणी पुरवठा करणेबाबत दिलेल्या प्रमाणपत्रानुसार दिनांक 21/04/2016 ते 30/06/2016 पर्यंत पाणी पुरवठा केल्याचे नमुद आहे. त्यामळे दिनांक 03/04/2016 ते 20/04/2016 पर्यंतचे 18 दिवसाचे 400 X 18 = रूपये 7,200/- चे जादा प्रदान झाले.

3) अट क्रमांक 3 अंबादास शंकर खोंड यांची विहीर दिनांक 01/10/2015 ते 15/03/2016 पर्यंत अधीग्रहीत करण्यात आली असुन रकमेचे प्रदान करण्यात आले. प्रत्यक्षात सरपंच, पोलीस पाटील, सदस्य, सचिव यांनी पाणी पुरवठा करणेबाबत तसेच पाणी पुरवठा केल्याबाबत सरपंच सचिव यांनी पाणी पुरवठा केलेल्या दिवसाची प्रत्यक्ष तपासणी खात्री करुन घेतली आहे. याबाबतचे प्रमाणपत्र नुसार दिनांक 01/11/2015 ते 15/03/2016 पर्यंत पाणी पुरवठा केल्याचे नमुद आहे. त्यामुळे प्रत्यक्ष पाणी पुरवठा न केलेल्या दिनांक 01/10/2015 ते 31/10/2015 म्हणजे 31 X 400 = रूपये 12,400/- चे जादा प्रदान झाले आहे. जादा प्रदान रकमेची वसुली करुन रक्कम जमा दर्शवावी.

**4.331 नैसर्गिक आपत्तीचे वेळी आरेगाव येथे पाणीपुरवठा करणाऱ्या वाहनास ज्यादा प्रदान रकमेबाबत.**

**पंचायत समिती मेहकर, जिल्हा बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** नैसर्गिक आपत्तीचे वेळी आरेगाव येथे पाणीपुरवठा करणाऱ्या वाहनाकरीता रक्कम रूपये 2,23,992/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर 24 टन वाहनाने लॉगबुकनुसार प्रत्यक्षात 29 दिवस पाणीपुरवठा केला असून 29 दिवसाचे वाहन भाडे प्रत्यक्षात रूपये 1,03,704/- एवढे देय होते. त्यामुळे ज्यादा प्रदान रूपये 28,608/- वसूलपात्र आहे.

2) प्रत्यक्षात लॉगबुकनुसार आरेगाव ते पाणी उद्‌गम ठिकाण अंतर (जाणे येणे प्रती फेरी 48 Km) 1,677 Km. दिसून येते. त्यामुळे एकूण Km प्रमाणे देय रक्कम रूपये 76,874/- एवढी येते. त्यामुळे प्रमाणकात ज्यादा दर्शविलेली कि.मी. ची रक्कम रूपये 14,806/- वसूलपात्र आहे.

**4.332 मौजे मलकापुर ग्रामीण येथील टँकरची क्षमता जादा दर्शवुन देयकाचे जादा प्रदान खर्चाबाबत.**

**पंचायत समिती मलकापूर, जिल्हा बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पाणी टंचाई अंतर्गत टँकर अधिग्रहण नस्तीची तपासणी केली असता यावर रक्कम रूपये 5,30,602/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) टँकर क्रमांक एम.एच.43 सी.जी.2138 देयक नस्तीची तपासणी केली असता उपप्रादेशीक परीवहन अधिकारी, बुलडाणा यांचे पत्र क्रमांक 010, दिनांक 12/04/2013 अन्वये सदर टँकरची क्षमता 16,880 कि.जी. (16.58 मे.टन) असल्याचे प्रमाणीत केले आहे. परंतु, वरील देयकाची तपासणी केली असता वरील देयकामध्ये क्षमता प्रमाणपत्र हे उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नागरी व ग्रामीण योजना उपविभाग, बुलडाणा यांच्या आदेशानुसार टँकरची क्षमता ही 2,400 कि.जी. (24 मे.टन) दर्शविली आहे. त्यामुळे एकाच टँकरची क्षमता ही वेगळी येणे अपेक्षीत नाही. केवळ कंत्राटदाराचे हीत जोपासण्यासाठी क्षमता जादा दर्शवुन देयकामध्ये रक्कम रूपये 1,93,908/- चे जादा प्रदान झाले आहे.

2) वाहनाचे मूळ क्षमता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर केले नाही. तसेच क्षमता प्रमाणपत्रावर एकच जावक क्रमांक आढळतो. त्यामुळे सदर अहवाल बनावट असल्याची शक्यतां नाकारता येत नाही. तसेच सदर क्षमतापत्र हे टँकर सुरू असल्याच्या कालावधीचे आढळते.

**4.333 मौजे सोनोशी येथील टँकर देयकामध्ये झालेल्या नियमबाहय जादा प्रदान खर्चाबाबत.**

**पंचायत समिती सिंदखेड राजा, जिल्हा बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** पाणी टंचाई अंतर्गत विहीर अधिग्रहण नस्तीची तपासणी केली असता यावर रक्कम रूपये 3,01,051/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) टँकर अधिग्रहण आदेश क्रमांक 47/16 दिनांक 04/02/2016 नुसार श्री.अमर राजनारायण सिंह यांचे टँकर अधिग्रहीत करून पाणी पुरवठा करण्यासाठी आदेशीत करण्यात आले. परंतु, श्री अमर राजनारायण सिंह यांचा करारनामा हा दिनांक 06/03/2016 रोजी संपुष्टात येवुन जिल्हधिकारी, बुलडाणा यांचे आदेश क्रमांक 96/16 दिनांक 01/03/2016 नूसार श्री. रमेशकुमार मनियार यांच्याशी पुढील 1 वर्षापर्यत करारनामा करून त्यांना आदेशीत करण्यात आले. उपरोक्तं टँकर नस्ती देयकाची तपासणी केली असता नस्ती देयकाला सुधारीत टँकर अधिग्रहीत आदेश आढळत नाही. तसेच मागील टँकर पुरवठाधारक श्री. अमर राजनारायण यांचे टँकर क्रमांक एम.एच.43 ई-350 चे धावपुस्तंक देयकासोबत आढळते. त्यामुळे सदर बाब ही नियमबाहय असुन सदर बाब लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

2) गट विकास अधिकारी, उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, चिखली यांचे विहीर अधिग्रहण स्थळ पाहणी अहवालानुसार मौजे राहेरी बु. येथील श्री. अशोक मार्तडराव देशमुख यांचे गट क्रमांक 615 मधील विहीराला मुबलक पाणी असुन विहीर ते टंचाईग्रस्तं गावाचे अंतर 11 कि.मी. असल्याचे प्रस्तावात नमुद केले आहे. तसेच सदर विहीरीवरून 20,000 लिटर्स क्षमता असलेल्या टँकरने 3 खेपा टंचाईग्रस्तं गावाला पुरविण्यात याव्यात, असे नमुद केले आहे. परंतु, देयक तसेच धावपुस्तंकाची तपासणी केली. टँकरचे क्षमता तसेच गावाचे अंतर जादा घेउन देयकाममध्ये रक्कम रूपये 50,175/- जादा प्रदान झाले आहे. सबब जादा प्रदान रूपये 50,175/- संबधीताकडून वसुल करण्यात यावे.

3) मोका पाहणी अहवालानुसार अंतर हे 11 कि.मी असतांना देयक व धावपुस्तंकात सदर अंतर हे 30 कि.मी दर्शवुन जादा प्रदान झाले आहे. याची परीगणना करून सदर रक्कंम वसुल करण्यात यावी.

4) करारनामा अट क्रमांक 10 नुसार पुरविलेल्या प्रत्येक टँकरला जीपी.एस यंत्रणा बसविणे आवश्यंक असतांना त्याप्रमाणे जे अंतर होईल त्याप्रमाणे देयक अदा करण्यात येईल, अशी अट असंताना संबधीताने जी.पी.एस यंत्रण बसविले नाही. तसेच विभागाने कोणतीही शहानीशा न करता नियमबाहयपणे देयक संबधीताला प्रदान केले आहे. याबाबत सप्रमाण खुलासा करावा. उपरोक्त अनियितिता विचार करता देयकाची तपासणी न करताच देयके प्रदान केल्याचे दिसून येते. सदर बाब अत्यंत गंभीर असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांचे लक्ष सदर बाबीकडे वेधण्यात येत आहे. उपरोक्त प्रमाणे रक्कम रुपये 50,175/- शासन खाती भरणा करुन चलानच्या प्रतीसह अनुपालन दर्शवावे.

**4.334 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी विहीर/बोअर अधिग्रहण प्रदानातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती औरंगाबादचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी विहीर/बोअर अधिग्रहण या बाबीवर एकूण रुपये 20,04,200/- एवढा खर्च नोंदवला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अधिग्रहण केलेल्या विहिरी तलाठी, मंडळ निरीक्षकामार्फत विहीर गावांच्या सर्वात जवळ अंतरावर असल्याचे प्रमाणित करावयाचे आहे. त्यानंतर तहसिलदार यांनी स्वत: विहीर गावाच्या जवळ असल्याची व

पाणीपुरवठा होऊ शकेल, याची खात्री करून तसे आदेशात नमूद करणे आवश्यक आहे. परंतु, तसे प्रमाणपत्र दिलेले नाही. त्यामुळे गावाजवळची विहीर अधिग्रहण करून त्यांनाच रक्कम प्रदान केल्याची पडताळणी करता आली नाही.

2) ऑक्टोबर 2016 व मार्च 2017 मध्ये तपासण्यात आलेल्या प्रमाणकाची तपासणी केली असता विहिरी अधिग्रहण केलेल्या कालावधीतील तहसिलदार यांचे आदेशाची तपासणी केली असता विहीर अधिग्रहणाचे आदेश प्रत्यक्ष पाणी पुरवठा सुरु केल्यानंतर आहेत त्यामुळे सदरील देयकांची एकूण रूपये 3,52,800/- अदायगीबाबत समर्पक खुलासा होणे आवश्यक आहे.

3) ग्रामपंचायती / गावांमधील ग्रामस्थांना अधिग्रहण केलेल्या विहिरीमधून योग्य पाणीपुरवठा केल्याबाबतचे कोणतेही अभिलेखे/प्रमाणपत्र देयकासोबत संलग्न केलेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1008/प्र.क्र.5/पापु-14 दिनांक 25/03/2008 अन्वये खाजगी विहीर अधिग्रहित केल्यानंतर त्या विहीर मालकाने पाणी काढण्यास विद्युत पंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामग्री उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तरच सुधारित आदेशानुसार रुपये 400/- प्रतिदिन मोबदला अनुज्ञेय आहे. तथापि, लेखापरीक्षणात सादर केलेल्या संचिकांमध्ये अशी साधन सामग्री विद्युत देयके विहीर मालकाचे नावे असल्याबाबत आढळून आले नाहीत. असे असतांनाही सरसकट रुपये 400/- प्रती दिन मोबदला प्रदान करण्यात आला आहे. श्री.ताहेर खान, बाळापुर याचे नावे रूपये 42,800/- देयक देण्यात आले. परंतु, संबंधीताच्या नावे विद्युत देयक नसल्याचे दिसून आले तरी सदर देयकातील एकूण रक्कम 107 x 100 = 10,700/- कपात करून वसूल करणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही झाली नाही.

5) उपरोक्त शासन निर्णयानुसार संबधित विहीर मालकांशी मोबदल्या संदर्भात करारनामे करणे आवश्यक असतांना काही प्रकरणी अशी कारवाई केल्याचे आढळून आले नाही.

### 4.335 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकरने पाणीपुरवठा केलेल्या प्रदानातील अनियमितताबाबत.

**पंचायत समिती औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती औरंगाबाद सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकर वाहतुक गुत्तेदार यांना रकमा प्रदान केल्याचे दिसुन आले लेखापरीक्षणाचे वेळी उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यांची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रदानाच्या संदर्भात सादर संचीकेची तपासणी केली असता सदरील टँकर्स 12,000 व 24,000 लिटरचे असल्याचे दर्शवुन प्रदान केले आहे. तथापि, सदरील खाजगी वाहनाचे आर.सी. बुक लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्यामुळे टँकर पाणी क्षमतेची खात्री करता आली नाही. याबाबत आर.सी.बुक/ ईतर अभिलेखे दर्शवुन खात्री पटवणे आवश्ययक आहे. करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या टँकर्सला आर.टी.ओ.ची मान्यता असणे आवश्यक आहे.

2) लेखापरीक्षणात उक्त टँकर्सच्या लॉगबुकांची तपासणी केली असता त्यात गाडी निघाल्याची व पोहोचल्याची वेळ व किलोमीटर रिडींग नमुद न करता केवळ खेपांची संख्या नमुद करुन त्याप्रमाणे परिगणना करून रकमा प्रदान केल्याचे आढळुन आले आहे. वाहनाचे स्पिडोमिटर चालु न ठेवता स्पिडोमिटरप्रमाणे अंतर दर्शविले नसुन गावाचे प्रमाणीत अंतर नमुद केले आहे. सक्षम प्राधिकाऱ्याने अंतरे प्रमाणित केलेली नाहीत. पूर्तता करून अनुपालन दर्शवावे.

3) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्र.क्र.12/पापु-14, दिनांक 03/02/1999 नुसार तपासणी पथक गठीत करून क्षेत्रीय तपासणी करण्यात आल्याचे आढळुन आले नाही.

4) नियोजीत खेपा होत आहेत किंवा नाही व प्रत्येक खेपेच्या वेळी त्या गावातील पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नियुक्त केलेल्या दोन महिला सदस्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. तथापि, अशी नियुक्तीबाबत अभिलेखे व काही प्रकरणी स्वाक्षऱ्या आढळुन आल्या नाहीत.

5) जिल्हाधिकारीख् औरंगाबाद यांनी उपरोक्त आदेशानुसार टँकर भाडे प्रतिदिन प्रती मे.टन व डीझेल / वंगण खर्च प्रती कि.मी. प्रती मे.टन दर निश्चित केले असतांना देयके अदा करतांना टँकर भाडे प्रती दिन प्रती लिटर्स व डीझेल / वंगण खर्च प्रती कि.मी. प्रती लिटर्सप्रमाणे अदा केली आहेत. लिटर्सचे मे. टनात रूपांतरण करून देयके अदा करणे आवश्यक होते.

6) जिल्हाधिकारी यांचे मंजुरी आदेशानुसार अनुदेय असलेल्या खेपाची लॉग बुक मधून तपासणी केली असताना लॉग बुक वर WHITENER लावून खाडाखोडी करून अतिरिक्त खेपांची रुपये 42,567/- ज्यादा अदाई झाली आहे. ती संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

7) संबंधित विभागाच्या उप अभियंता (पाणी पुरवठा) यांनी गावनिहाय किमी व वाहन क्रमांक निहाय वाहनाची क्षमता प्रमाणित केलेली यादी सार व सदरील वाहनाचे लॉग बुकनुसार तपसणी केली असता अनुक्रमांक 01 ते 03 मध्ये अतिरिक्त किलो मीटर दर्शवून देयकांची अदायगी केली असून तपासणी महिन्यामध्ये एकूण रूपये 45,904/- वसुली निघते.

8) करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार टँकरची टाकी पूर्ण क्षमतेने भरून नेऊन योग्य पाणीपुरवठा केल्याबाबत तसेच केलेल्या एकूण फेऱ्याचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी तसेच गावातील सरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य किंवा ग्रामसेवक यांचेकडून घेणे बंधनकारक आहे. तथापि, बहुतांशी प्रकरणी असे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

**4.336 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकरने पाणीपुरवठा केलेल्या प्रदानातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती वैजापूर, जिल्हा औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती वैजापूर सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकर वाहतुक गुत्तेदार यांना एकुण रक्कम रुपये 14,21,86,188/- प्रदान केल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रदानाच्या संदर्भात सादर संचिकेची तपासणी केली असता बहुतांश टँकर्स 12,000 लिटरचे असल्याचे दर्शवुन प्रदान केले आहे. तथापि, सदरील खाजगी वाहनाचे आर.सी. बुक लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्यामुळे टँकर पाणी क्षमतेची खात्री करता आली नाही. याबाबत आर.सी.बुक/ ईतर अभिलेखे दर्शवुन खात्री पटवणे आवश्यक आहे. करारनाम्यातील अटी/शर्ती नुसार पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या टँकर्सला आरटी.ओ.ची मान्यता असणे आवश्यक आहे.

2) लेखापरीक्षणात उक्त टँकर्सच्या लॉगबुकांची तपासणी केली असता त्यात गाडी निघाल्याची व पोहोचल्याची वेळ व किलोमीटर रिडींग नमुद न करता केवळ खेपांची संख्या व एकत्रित जाण्या-येण्याची कि.मी. संख्या नमुद करुन त्याप्रमाणे परिगणना करुन रकमा प्रदान केल्याचे आढळुन आले आहे. वाहनाचे स्पिडोमिटर चालु न ठेवता स्पिडोमिटरप्रमाणे अंतर दर्शविले नसुन गावाचे प्रमाणीत अंतर नमुद केले आहे. सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेली अंतरे व प्रत्यक्ष अंतरात 1 ते 5 कि.मी.ची तफावत आहे.

3) जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी उपरोक्त आदेशानुसार टँकर भाडे प्रती दिन प्रती मे.टन निश्चित केले असतांना देयके अदा करतांना काही टँकरचे भाडे प्रती दिन प्रती लिटर्सप्रमाणे अदा केली आहेत. लिटर्सचे मे. टनात रूपांतरण करून देयके अदा करणे आवश्यक होते.

4) खाली नमूद तपशिलानुसार देयाकांसोबत संलग्न केलेल्या लॉगबुक/टँकर मंजुरी आदेशाची पडताळणी केली असता मंजुरी आदेशापूर्वीची व टँकर बंद असल्याचे कालावधीची देखील अदाई केल्याचे दिसून येते.

अ) प्र.क्र.114/03-2017 रुपये 1,88,825/- अन्वये धोंदलगावास टँकर क्रमांक MH-20/A-3071 द्वारे दिनांक 01/05/2016 ते 30/06/2016 एकूण 61 दिवस पाणीपुरवठा केल्याबाबतचे देयकाचे प्रदानात दिनांक 16/05/2016 ते 29/05/2016 या कालावधीचे लॉग बुक तसेच देयकासोबत लॉग बुकची झेरॉक्स देखील लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे सदर कालावधीत टँकरद्वारे पाणीपुरवठा झाल्याची खात्री

लेखापरीक्षणास झालेली नाही. सदरील कालावधीत टँकर बंद असल्याची शक्यता नाकारता येत नाही. खात्री पटवावी अथवा सदरील कालावधीचे टँकर भाडे रुपये 24,864/- व कि.मी.भाडे रुपये 19,790/- एकूण रुपये 44,654/- वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावेत.

ब) प्र.क्र.116/03-2017 रुपये 2,11,887/- अन्वये धोंदलगावास टँकर क्रमांक MH-20/A-9176 द्वारे दिनांक 01/05/2016 ते 13/07/2016 एकूण 74 दिवस पाणीपुरवठा केल्याबाबतचे देयकाचे प्रदान केले आहे. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे आदेश क्रमांक 1,764 दिनांक 12/09/2016 अन्वये दिनांक 12/07/2016 पर्यंत अन्वये धोंदलगावास टँकर मंजूर असून दिनांक 13/07/2016 चे नियमबाहय प्रदान झालेले आहे. तथापि, दिनांक 13/07/2016 चे टँकर भाडे रुपये 1,776/- व कि.मी. इंधन भाडे रुपये 365/- असे एकूण रुपये 2,141/- वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावेत.

क) प्र.क्र. 117/03-2017 रुपये 18,84,691/- अन्वये भादली गावास टँकर क्रमांक MH-15/AG-2413 द्वारे दिनांक 01/05/2016 ते 30/06/2016 एकूण 61 दिवस पाणीपुरवठा केल्याबाबतचे देयकाचे प्रदान केले आहे. लॉग बुकमधील सदरील कालावधीची कि.मी.ची पडताळणी केली असता प्रत्यक्ष टँकर 3,592 कि.मी. चाललेले आहे. परंतु, देयक 3704 कि.मी.ची परिगणना करून रुपये 84,451/- प्रदान केलेली आहे. त्यामुळे 112 कि.मी.चे रुपये 2,554/- ची वसुली करून शासन खाती भरणा करण्यात यावेत.

ड) प्र.क्र.134/03-2017 रुपये 3,17,020/- अन्वये माळीसागज गावास टँकर क्रमांक MH-12/6963 द्वारे दिनांक 01/09/2015 ते 04/01/2016 एकूण 134 दिवस पाणीपुरवठा केल्याबाबतचे देयकाचे प्रदान केले आहे. देयक सोबतच्या लॉगबुकची तपासणी केली असता दिनांक 01/09/2015 ते 28/09/2015 या कालावधीचे लॉग बुक उपलब्ध केलेले नाही. सोबत जोडलेल्या GPS अहवाल व देयकावर नमूद टँकर क्रमांक MH-12/6963 असा असून देयकासोबत दिनांक 29/09/2015 पुढील कालावधीचे टँकर क्रमांक MH-18/7182 लॉग बुकची झेरॉक्स प्रत जोडलेली आहे. टँकरच्या तफावतीबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. माहे 09/2015 चे लॉग बुकची दिनांक 29/09/2015 ते 30/09/2015 या कालावधीचे लॉग बुकचे झेरॉक्स प्रतीवर खाडाखोड व व्हाईटनरने दुरुस्ती करून माहे 09/2015 चे गोषवाऱ्यात पाणीपुवठा केल्याचे दिवस 30 व कि.मी.1404 नोंद केली आहे. लॉग बुकची मुळ प्रत दर्शविली नसल्याने प्रत्यक्ष दिनांक 01/09/2015 ते 28/09/2015 पर्यंतचे कालावधीत पाणीपुरवठा केलेला असल्याची खात्री लेखापरीक्षणात होत नाही. करिता 28 दिवसाचे टँकर भाडे रुपये 45,584/- व कि.मी.भाडे रुपये 28,829/- असे एकूण रूपये 74,413/- वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

इ) प्र.क्र.143/03-2017 रुपये 5,60,851/-/- अन्वये भायेगाव वैजापूर या गावास टँकर क्रमांक MH-18/C-7166 द्वारे दिनांक 08/09/2015 ते 31/09/2015 एकूण 114 दिवस पाणीपुरवठा केल्याबाबतचे देयकाचे प्रदान केले आहे. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे आदेश क्रमांक 173 दिनांक 09/09/2015 अन्वये दिनांक 30/06/2016 पर्यंत पाणीपुरवठा करण्यास दररोज एका टँकरने दोन खेपा पुविण्यास मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार दिनांक 09/09/2015 पासून टँकर भाडे व टँकर साठी कि.मी.भाडे देय होते. परंतु, सदरील देयाकान्वये दिनांक 01/09/2015 पासून प्रती दिन दोन खेपाचे 136 कि.मी.प्रमाणे दिलेले दिनांक 01/09/2015 ते दिनांक 08/09/2015 चे एकूण 1088 कि.मी.चे भाडे प्रती कि.मी. रुपये 21.60 पैसे नुसार रुपये 23,500/- चे अतिप्रदान झालेले आहे. सदरील रक्कम वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी.

फ) प्र.क्र.172/03-2017 रुपये 2,05,692/- अन्वये पाणवी खु. या गावास टँकर क्रमांक mhb-5468 द्वारे दिनांक 01/05/2016 ते 30/06/2016 पर्यंत एकूण 61 दिवस पाणीपुरवठा केल्याबाबतचे देयकाचे प्रदान केले आहे. मूळलॉग बुक लेखापरीक्षणात दर्शविले नाही. देयकासोबत जोडलेली लॉग बुकची झेरॉक्स प्रत तपासली असता दिनांक 01/05/2016 ते 03/06/2016 या कालावधीचे लॉग बुकवर मात्र ग्रामसेवक यांची स्वाक्षरी आहेत. सरपंच, दोन महिला सदस्य यांच्या स्वाक्षऱ्या नाही. तसेच महिना अखेरीस प्रमाणपत्र नोंदवून पाणीपुरवठा झाल्याचे सरपंच ग्रामसेवक व त्या अनुषंगाने गटविकास अधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक असतानाही अशी कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे नियमाप्रमाणे मंजुरी नुसार खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा झाला असल्याची खात्री लेखापरीक्षणास होत नाही. तरी अभिलेखे दर्शवून खात्री पटवावी. तोपावेतो रुपये 2,05,692/- आक्षेपाधीन ठेवण्यात येतात.

5) करारनाम्यातील अटी/शर्ती नुसार टँकरची टाकी पूर्ण क्षमतेने भरून नेवून योग्य पाणीपुरवठा केल्याबाबत तसेच केलेल्या एकूण फेऱ्याचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी तसेच गावातील सरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य किंवा ग्रामसेवक यांचेकडून घेणे बंधनकारक आहे. तथापि, बहुतांशी प्रकरणी असे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही

6) दिनांक 01/05/2015 ते 30/04/2016 या कालावधीसाठी श्री.चांगदेव कातकडे यांचेशी व दिनांक 01/05/2016 ते 30/04/2017 या कालावधीसाठी श्री.रमेशकुमार मणियार यांचेशी टँकरद्वारे पाणी पुरवठा करणेसाठी करार करणेत आला होता. या दोन वित्तीय वर्षात वेगवेगळ्या ठेकेदाराबरोबर करारनामा केला असतांना दोन्ही ठेकेदारांनी तेच / एकच टँकर पाणी पुरवठ्यासाठी वापरले आहेत. (उदा. खंडाळा MH-26/8808, धोंदलगाव MH-12/QA-9176, MH20/A-3071 ई.)

**4.337 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी विहीर अधिग्रहन प्रदानातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती सिल्लोड सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी विहीर अधिग्रहण या बाबीवर एकूण रुपये 37,87,000/- एवढा खर्च नोंदवला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विहिरी अधिग्रहण केलेल्या कालावधीतील तहसिलदार यांचे आदेशाची तपासणी केली असता 1. प्र.क्र. 03 माहे-फेब्रुवारी 2017 श्री.त्रिंबक पाटील यांना दिनांक 18/03/2016 ते 30/06/2016 या कालावधीचे 105 दिवसांचे रुपये 400/- प्रमाणे रुपये 42,000/- अदा केले आहेत. तथापि, तहसीलदार यांचे आदेश क्रमांक 33/2016 दिनांक 18/03/2016 नुसार दिनांक 18/03/2016 ते 30/04/2016 या कालावधीत विहीर अधिग्रहण केली असल्याने 44 दिवसांचे रुपये 17,600/- अनुज्ञेय होतात. रुपये 24,400/- जादा अदाई संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे. 2. प्र.क्र.289 माहे-मार्च 2017 श्री.गंगाधर डापके यांना दिनांक 24/02/2016 ते 30/06/2016 या कालावधीतील 117 दिवसांसाठी रुपये 50,800/- अदा करण्यात आलेले आहेत. तथापि, देयकासोबत संलग्न हजेरी पत्रकानुसार 124 दिवसांचे रुपये 49,600/- अनुज्ञेय ठरतात. त्यामुळे रुपये 1,200/- जादा अदाई संबधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे. 3. प्र.क्र.09 माहे-फेब्रुवारी 2017 नुसार श्री.नारायण जाधव रुपये 41,600/- अदा करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 18 व नियम 25 नुसार “प्रदानार्थ मंजूर” आदेशावर व बिलावरील “पैसे देण्याबाबतचा आदेश” गट विकास अधिकारी याजकडून संमत करण्यात आल्यावर रक्कम देण्याकरिता धनादेश काढण्यात येतील. तथापि, सदर प्रकरणी अशी कारवाई न करताच रक्कम / धनादेश अदा करण्यात आलेला आहे.

2) महाराष्ट्र पाणीपुरवठा अधिनियम 1983 चे कलम 11(2)(ब) प्रमाणे प्रत्येक व्यक्ती अथवा कुटुंब यांना किती पाण्याची आवश्यकता आहे, याची परिगणना करून याबाबतच्या अहवालानुसार पाण्याचे स्रोत निश्चित करणे आवश्यक आहे. परंतु, अशा प्रकारचा अहवाल लेखापरीक्षणात उपलब्ध झाला नाही. त्यामुळे अधिग्रहण केलेल्या विहिरीतून गावास योग्य प्रमाणात पाणीपुरवठा झाल्याबाबतची पडताळणी उक्त अहवालाशिवाय करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1008/प्र.क्र.5/पापु-14 दिनांक 25/03/2008 अन्वये खाजगी विहीर अधिग्रहित केल्यानंतर त्या विहीर मालकाने पाणी काढण्यास विद्युत पंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामग्री उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तरच सुधारित आदेशानुसार रुपये 400/- प्रती दिन मोबदला अनुज्ञेय आहे. तथापि, लेखापरीक्षणात सादर केलेल्या संचिकांमध्ये अशी साधन सामग्री विद्युत देयके विहीर मालकाचे नावे असल्याबाबत आढळून आले नाहीत. असे असतांनाही सरसकट रुपये 400/- प्रती दिन मोबदला प्रदान करण्यात आला आहे.

4) उपरोक्त शासन निर्णयानुसार संबंधित विहीर मालकांशी मोबदल्या संदर्भात करारनामे करणे आवश्यक असतांना काही प्रकरणी अशी कारवाई केल्याचे आढळून आले नाही.

**4.338 खाजगी विहिर अधिग्रहाणावरील विहीर अधिग्रहणाचे देयकांचे अनियमितते बाबत.**

**पंचायत समिती सोयगाव, जिल्हा औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती सोयगांव अंतर्गत सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात निवड महिन्यात एकूण रक्कम रुपये 2,84,000/- एवढा खाजगी विहिर अधिग्रहणावर खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, निर्णय रोजगार हमी योजना क्रमांक 2191/प्र.क्र.-28/रोहयो-6, दिनांक 24/12/1991 नुसार शासकीय अनुदानातुन पुर्ण केलेल्या विहिरीवर शासनाचा प्रथम हक्क असुन पाणी टंचाई कालावधीत पिण्याचे पाण्यासाठी सदर विहिरी प्रथम अधिग्रहित करणे आवश्यक होते. परंतू, तशी कार्यवाही झालेली नाही. अशा विहिरी अधिग्रहित केल्या असत्या तर शासन खर्चामध्ये बचत झाली असती.

2) विहिर अधिग्रहणाचे आदेश महाराष्ट्र पिण्याचे पाणीपुरवठा अधिग्रहण कायदा 1983 नुसार त्याचे निर्गमन दिनांकापासून परिणामी ठरत असल्याने पुर्वलक्षी प्रभावाने काढलेले आदेश ग्राहय धरता येत नाही तरी यासंबधी शासन निर्देश / आदेश दर्शवून विहिर अधिग्रहण आदेश पुर्वलक्षी प्रभावाने काढण्याबाबत केलेली कार्यवाही योग्य असल्याची खात्री पटवावी.

3) महाराष्ट्र भुजल अधिनियम 1993 अन्वये सतत तीन वर्षापेक्षा जास्त एकाच विहिरीचे अधिग्रहण झाल्यास उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी विहिरीची पाहणी करणे आवश्यक आहे. अधिग्रहित केलेल्या विहिरी तीन वर्षापेक्षा जुन्या नसल्याचे माहिती उपलब्ध न केल्याने याबाबत खात्री करता आली नाही.

4) शासन निर्णय क्रमांक टंचाई/1099/प्र.क्र.-2/पापु-14, दिनांक 03/02/1999 तसेच शासन निर्णय क्रमांक टंचाई/008/प्र.क्र.89/पापु-14, दिनांक 27/08/2008 अन्वये तहसिलदार व गट विकास अधिकारी यांनी टंचाईग्रस्त गावांची पाहणी करून अहवाल जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवून त्यांनी महाराष्ट्र भुजल अधिनियम 1993 च्या कलम 4 अन्वये संबधित गाव टंचाईग्रस्त म्हणून जाहीर करावयाचे आहे. परंतु, याप्रमाणे कार्यवाही झालेली दिसून आलेली नाही.

5) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्र.क्र.53/पा.पु.14, दिनांक 30/04/2012 विहिर अधिग्रहित केल्यानंतर त्या विहिर मालकाने पाणी काढण्यासाठी विद्युत / डिझेल पंप / विद्युत कनेक्शनसह साधन सामुग्री उपलब्ध करून दिल्यास रुपये 400/- प्रती दिन व उपलब्ध करून दिले नसल्यास रुपये 300/- प्रती दिन मोबदला देण्यात यावा, असे स्पष्ट निर्देश आहेत. परंतू, शेतक-यांना सरसकट रुपये 400/- प्रमाणे प्रदान केल्याचे दिसून येते. विहिर अधिग्रहणाबाबत कायदेशिर करार विहिर मालकासोबत करणे आवश्यक असतांना तसा करार केल्याबाबतची पुर्ण संचिका लेखापरीक्षणास न दर्शविल्याने त्याबाबत खात्री करता आलेली नाही. तसेच सर्व शेतक-यांची साधनसामग्री उपलब्ध करून दिली किंवा कसे, याबाबत संचिका / अभिलेखे अभावी खात्री करता आली नाही.

6) प्रमाणकाद्वारे अदा करण्यात आलेल्या देयकांच्या संचिकेची तपासणी केली असता विस्तार अधिकारी / क्षेत्रीय अधिकारी यांनी दौ-याचे वेळी स्थळ पाहणी केलेली दिसून येत नाही. तसेच विस्तार अधिकारी (आरोग्य) यांनी किंवा ग्रामपंचायतीने पाणी प्रयोगशाळेमार्फत पिण्यायोग्य असलेबाबत तपासणी केल्याचे दिसून येत नाही. विहिर अधिग्रहण केलेल्या विहिरीत नियमित ब्लिचींग पावडर टाकल्याच्या नोंदी, ग्रामसेवकाचे दररोज गावास पाणी मिळालेबाबतचे प्रमाणपत्र, स्थळ पाहणी अहवाल, पाणी उपलब्धतेचा गोषवारा, गावापासून उद्भवापर्यंतचे प्रमाणपत्र, विहिर अंतर प्रमाणपत्र इत्यादी व इतर अनुषंगिक अभिलेखे संचिकेत संलग्न केलेले नाहीत त्यामुळे विहिर अधिग्रहण आवश्यक होते काय, याबाबत खात्री करता आली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 20 व 21 अन्वये प्रत्येक प्रदानाची पोच घेण्यात येईल. परंतु, ब-याच लाभार्थीकडून पोंच घेण्यात आलेली नाही.

8) वरील प्रमाणक क्रमांक 11/32017 रुपये 34,800/- चे तहसिलदार सोयगांवचे आदेश देयकासोबत असलेल्या आदेश क्रमांक 24 दिंनाक 31/05/2016 मध्ये खाडाखोड वर तहसलिदार यांची सही नाही व गट विकास अधिकारी पंचायत समिती, सोयगांव यांनी सांक्षकिंत केलेले नाही. खुलासा सादर करावा.

**4.339 2245 नैसर्गिक आपत्ती पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी विहीर / बोअर अधिग्रहण प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती जालना, जिल्हा जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 32) -** नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकर वाहतुक गुत्तेदार यांना एकुण रक्कम रूपये 3,51,87,879/- प्रदान केल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर प्रकारे पाणीपुरवठा करण्यासाठी जिल्हाधिकारी, जालना यांनी दिनांक 25/01/2016 व 28/02/2017 रोजी संबंधीत पुरवठादाराबरोबर करारनामा केला आहे. मंजुर दराची निविदा प्रक्रीया जिल्हाधिकारी, जालना यांचे स्तरावर झाली असल्यामुळे दर निविदा मंजुरीवर अभिप्राय देता येत नाही.

2) उपरोक्त प्रदानाच्या संदर्भात सादर संचीकेची तपासणी केली असता सदरील टँकर्स 10, 11 व 12,000 लिटरचे असल्याचे दर्शवुन प्रदान केले आहे. तथापि, सदरील खाजगी वाहनाचे आर.सी. बुक लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्यामुळे टँकर पाणी क्षमतेची खात्री करता आली नाही. याबाबत आर.सी.बुक/ ईतर अभिलेखे दर्शवुन खात्री पटवणे आवश्ययक आहे. करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या टँकर्सला आर.टी.ओ.ची मान्यता असणे आवश्यक आहे.

3) लेखापरीक्षणात उक्त टँकर्सच्या लॉगबुक लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने प्रत्यक्ष अंतराचे खात्री करता आली नाही.

4) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्रक्र.12/पापु-14, दिनांक 03/02/1999 नुसार तपासणी पथक गठीत करून क्षेत्रीय तपासण्या करण्यात आल्याचे आढळुन आले नाही.

5) शासन परिपत्रक टंचाई -1005/प्र.क्र.305-पापु/14, दिनांक 24/01/2006 नुसार टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या गावास प्रत्यक्षात पाणीपुरवठा होतो किंवा कसे, हे पाहणे आवश्यक असल्याने संबंधीत गावाला टँकर उपलब्ध करून दिल्यानंतर वेळच्या वेळी टँकर पोहचला असल्याबाबत टँकर गावात पोहचल्याची तारीख व वेळ याची लॉगबुकमध्ये नोंद करणे आवश्यक आहे. तसेच नियोजीत खेपा होत आहेत किंवा नाही व प्रत्येक खेपेच्या वेळी त्या गावातील पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नियुक्त केलेल्या दोन महिला सदस्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. तथापि, अशी नियुक्तीबाबत अभिलेखे व काही प्रकरणी स्वाक्ष-या आढळुन आल्या नाहीत.

6) नमूद अंतर सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणीत केलेले नाही.

7) GPS प्रणाली कोणी लावली व केव्हा लावण्यात आली, याबाबत अभिलेखे उपलब्ध करण्यात आले नाही.

8) टँकर मंजुरीच्या आदेशामध्ये किती लोकसंख्येसाठी, कोणत्या नगरासाठी / भागासाठी खाजगी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे, याबाबत उल्लेख केलेला नाही. त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य पाणीपुरवठा झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

9) जिल्हाधिकारी, जालना यांनी उपरोक्त आदेशानुसार टँकर भाडे प्रती दिन प्रती मे.टन व डिझेल / वंगण खर्च प्रती कि.मी. प्रती मे.टन दर निश्चित केले असतांना देयके अदा करतांना टँकर भाडे प्रती दिन प्रती लिटर्स व डिझेल / वंगण खर्च प्रती कि.मी. प्रती लिटर्सप्रमाणे अदा केली आहेत. लिटर्सचे मे. टनात रूपांतरण करून देयके अदा करणे आवश्यक होते.

10) करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार टँकरची टाकी पूर्ण क्षमतेने भरून नेऊन योग्य पाणीपुरवठा केल्याबाबत तसेच केलेल्या एकूण फेऱ्याचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी तसेच गावातील सरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य किंवा ग्रामसेवक यांचेकडून घेणे बंधनकारक आहे. तथापि, असे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

12) करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार सक्षम अधिकाऱ्याने मान्य केलेल्या उदभवातून पाणी व सूचित केलेल्या गावांत पाणी शुध्द करून घेऊन टाकणे ठेकेदारास बंधनकारक असतांना पाणी शुध्द केलेबाबत नोंदी / अभिलेखे दिसून येत नाही.

13) वरखेड सेवली येथे पाणीपुरवठा करतांना 8,100 कि.मी. चे देयक अदा केले आहे. परंतू, प्रत्यक्ष कि.मी. 7,200 कि.मी. आहे. यावरुन 900 कि.मी. चे देयक जादा अदा करण्यात आले आहे. त्याची रक्कम रूपये 31,053/- वसूल करणे आवश्यक आहे.

**4.340 2245 नैसर्गिक आपत्ती खाजगी टँकरने पाणीपुरवठा केलेबाबत प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती अंबड, जिल्हा जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 37) -** नैसर्गिक आपत्ती या लेखाशिर्षाखाली अंबड तालुक्यातील गावाना पाणी पुरवठा करण्यासाठी खाजगी टँकरने पाणीपुरवठा करणेसाठी 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 3,79,17,316/- खर्च नोंदवला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक डब्ल्यू क्यू एम/2010/प्र.क्र.149/पा पु -12, दिनांक 30/10/2010 मधील उपपरिच्छेद क्रमांक 4 मधील तरतूदीनूसार प्रत्यक्ष स्त्रोताजवळ जाऊन स्त्रोताची माहिती संकलीत करण्याची तरतूद आहे. तथापि, अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. ज्या गावात पाणीपुरवठा करण्यात आला आहे, त्या ठिकाणापासून उदभवाचे अंतर निश्चित करणे शक्य होत नाही. संबंधित गावास टँकर लावणेबाबतचे ग्रामपंचायतीचे प्रस्ताव त्यासोबतचे अभिलेखे सक्षम प्राधिकाऱ्याचे विहीर अंतर प्रमाणपत्र इत्यादी अभिलेखे लेखापरिक्षणात अपूर्ण दर्शवले आहेत. त्यामूळे संबंधित गावची लोकसंख्या किती, त्यानूसार किती टँकरची आवश्यकता होती, नेमून दिलेल्या उदभवावरुन पाणीपुरवठा झाला किंवा नाही, उदभवाचे अंतर योग्य घेतले किंवा नाही, याबाबत अधिकृतता दिसून आली नाही.

2) उपरोक्तप्रमाणे प्रमाणक क्रमांक 30 माहे सप्टेंबर 2016 या देयकातून रुपये 2,16,619/- व प्रमाणक क्रमांक 4 माहे जानेवारी 2017 या देयकातून रुपये 6,55,480/- असे एकूण रूपये 8,72,099/- आयकर कपात केलेला आहे. परंतू, याबाबत आयकर भरलेबाबतचे पोंच चलान लेखापरिक्षणामध्ये संचिकेत दिसून आले नाही. अनूपालन दर्शवावे.

3) पंचायत समिती, अंबड यांनी तालुक्यातील गावांना टंचाई काळात खाजगी टँकरव्दारे पाणीपुरवठा केल्याचे वरीलप्रमाणे देयक अदा केले आहे. याबाबत लॉगबुक लेखापरिक्षणात उपलब्ध झाले नाही. त्यामूळे उपरोक्त देयकाप्रमाणे प्रत्यक्ष देयक व गटविकास अधिकारी पंचायत समिती, अंबड यांनी त्यांचे स्वाक्षरीने प्रमाणित केलेला गोषवारा व GPS फाईल यांची तपासणी केली असता देयकात जास्त दिवस दर्शवून अतिप्रदान केले आहे.

पाणीपुरवठा केलेल्या प्रत्यक्ष दिवसांऐवजी जास्तीचे दिवस दर्शवून केलेल्या रक्कम रूपये 28,328/- अतिप्रदान संबंधिताची जबाबदारी निश्चित करुन वसूल करावी.

4) अंबड तालुक्यातील गावांना खाजगी टँकरव्दारे पाणीपुरवठा केल्याच्या उपरोक्तप्रमाणे देयक अदा करण्यात आले आहे. याबाबत प्रत्यक्ष देयक व पंचायत समिती, अंबड गट विकास अधिकारी यांनी त्यांचे स्वाक्षरीने प्रमाणित केलेला गोषवारा व GPS फाईल यांची तपासणी केली असता देयकात उदभव बदलण्यात आलेला आहे.

उद्दभव बदलामूळे किलोमीटरमध्ये वाढ झाली आहे. त्यामूळे वरीलप्रमाणे संबंधित टँकर ठेकेदार मे. परफेक्ट रोडलाईन्स, जालना यांना अतिप्रदान झालेले आहे. उपरोक्तबाबत उद्दभव बदलाचे सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिकृत अभिलेखे लेखापरिक्षणात दर्शवावे अन्यथा रक्कम रुपये 6,59,026/- संबंधिताकडून वसूल करावे.

5) शासन निर्णय दिनांक 27/02/2008 मधील तरतूद तसेच जिल्हाधिकारी यांचे आदेशानूसार सदरील गावामध्ये पुढील वर्षी पिण्याची पाण्याची टंचाई निर्माण होवू नये म्हणून ग्रामपंचायतीकडून टंचाई प्रतिबंधात्मक आराखडे तयार करुन घेण्यात येवून त्यात पेयजल स्त्रोत बळकटीकरण व भुजल संपत्तीच्या उपलब्धतेत सातत्य राहण्यासाठी राबवावयाच्या जलसंधारण व पुनर्भवन योजनाचा समावेश करण्यात यावा. याबाबतची सर्व जबाबदारी तहसिलदार व गटविकास अधिकारी यांची राहील. असे असतांना वारंवार गावामध्ये पाणीटंचाई निर्माण होवून मोठया प्रमाणात पाणीपुरवठा कामी खर्च होत असल्याने ठोस अशा योजनांची अंमलबजावणी वरील अधिकारी यांनी केलेली दिसून येत नाही. राष्ट्रीय पेयजल योजना, शिवकालीन पाणीपुरवठा योजना, जलसंधारण योजना इत्यादी अशा प्रकारे पाण्याचा स्त्रोत उपलब्ध होण्यासाठी विविध योजना राबवून भूजल साठा वाढविण्याबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न होणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 20 अन्वये संबंधित गुत्तेदारांना रक्कम प्रदान केल्यानंतर संबंधिताकडून पोंच पावती घेणे आवश्यक असतांना अशा प्रकारे पोंचपावती लेखापरिक्षणात प्रमाणित करण्यात आल्याचे दिसून आले नाही.

**4.341 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकरने पाणीपुरवठा केलेल्या प्रदानातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती भोकरदन, जिल्हा जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकर वाहतुक गुत्तेदार यांना एकुण रक्कम रूपये 6,23,13,113/- प्रदान केल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर प्रकारे पाणीपुरवठा करण्यासाठी जिल्हाधिकारी, जालना दिनांक 25/01/2016 नुसार दिनांक 01/03/2016 ते 28/02/2017 या कालावधीसाठी संबंधीत पुरवठादाराबरोबर करारनामा केला आहे. मंजुर दराची निविदा प्रक्रीया जिल्हाधिकारी जालना यांचे स्तरावर झाली असल्यामुळे दर निविदा मंजुरीवर अभिप्राय देता येत नाही.

2) उपरोक्त प्रदानाच्या संदर्भात सादर संचीकेची तपासणी केली असता सदरील टँकर्स 10,000, 11,000 व 12,000 लिटरचे असल्याचे दर्शवुन प्रदान केले आहे. तथापि, सदरील खाजगी वाहनाचे आर.सी. बुक लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्यामुळे टँकर पाणी क्षमतेची खात्री करता आली नाही. सदर वाहनाचे क्षमता आर टी ओ कार्यालयाने टनामध्ये / वजनामध्ये प्रमाणीत केलेली आहे.

3) लेखापरीक्षणात उक्त टँकर्सच्या लॉगबुकांची तपासणी केली असता त्यात गाडी निघाल्याची व पोहोचल्याची वेळ व किलोमीटर रिडींग नमुद न करता केवळ खेपांची संख्या नमुद करुन त्याप्रमाणे परिगणना करुन रक्कमा प्रदान केल्याचे आढळुन आले आहे. वाहनाचे स्पिडोमिटर चालु न ठेवता स्पिडोमिटर प्रमाणे अंतर दर्शविले नसुन गावाचे प्रमाणीत अंतर नमुद केले आहे.

4) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्रक्र.12/पापु-14, दिनांक 03/02/1999 नुसार तपासणी पथक गठीत करून क्षेत्रीय तपासण्या करण्यात आल्याचे आढळुन आले नाही.

5) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई -1005/प्र.क्र.305-पापु/14, दिनांक 24/01/2006 नुसार टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या गावास प्रत्यक्षात पाणीपुरवठा होतो किंवा कसे, हे पाहणे आवश्यक असल्याने संबंधीत गावाला टँकर उपलब्ध करून दिल्यानंतर वेळच्या वेळी टँकर पोहचला असल्याबाबत टँकर गावात पोहचल्याची तारीख व वेळ याची लॉगबुकमध्ये नोंद करणे आवश्यक आहे. तसेच नियोजीत खेपा होत आहेत किंवा नाही व प्रत्येक खेपेच्या वेळी त्या गावातील पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नियुक्त केलेल्या दोन महिला सदस्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.

6) प्रत्येक गावासाठी स्वतंत्र टँकर असून त्यांची लॉगबुक सरपंच / ग्रामसेवक / महिला प्रतिनिधी यांच्या स्वाक्षऱ्या असलेले लॉगबुकच्या प्रती नियमित दैनंदिन मंजूर खेपाप्रमाणे टँकरद्वारे पाणीपुरवठा झाल्याचे प्रमाणपत्र सरपंच / ग्रामसेवक यांचे घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे विहिर उदभवापासून पाणीपुरवठा करण्यात आलेल्या गावाचे अंतर प्रती गाव किती खेपा पोहचविल्या याचे आदेश / प्रमाणपत्र देयकासोबत जोडलेले आहेत. मात्र संगणकिय अंतर विवरणपत्र (डिस्टंट समरी रिपोर्ट) अहवाल प्रत्येक गावाचा जोडून त्यावर देयकाची मागणी करणारे पुरवठादार व गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी आहे. सदरील अंतर गटविकास अधिकारी यांनी ज्या लेख्याद्वारे प्रमाणित केले, त्याचा तपशिल लेखापरिक्षणास उपलब्ध केलेला नाही. सदरील देयकान्वये सन 2016-2017 पर्यंतचे मागणीच्या देयकाचे प्रदान केले आहे.

7) टँकर मंजुरीच्या आदेशामध्ये किती लोकसंख्येसाठी, कोणत्या नगरासाठी / भागासाठी खाजगी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे, याबाबत उल्लेख केलेला नाही. त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य पाणीपुरवठा झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

8) जिल्हाधिकारी, जालना यांनी उपरोक्त आदेशानुसार टँकर भाडे प्रती दिन प्रती मे.टन व डिझेल / वंगण खर्च प्रती कि.मी. प्रती मे.टन दर निश्चित केले असतांना देयके अदा करतांना टँकर भाडे प्रती दिन प्रती लिटर्स व डिझेल / वंगण खर्च प्रती कि.मी. प्रती लिटर्सप्रमाणे अदा केली आहेत. लिटर्सचे मे. टनात रूपांतरण करून देयके अदा करणे आवश्यक होते.

9) करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार टँकरची टाकी पूर्ण क्षमतेने भरून नेऊन योग्य पाणीपुरवठा केल्याबाबत तसेच केलेल्या एकूण फेऱ्याचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी तसेच गावातील सरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य किंवा ग्रामसेवक यांचेकडून घेणे बंधनकारक आहे.

**4.342 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी विहीर अधिग्रहण प्रदानातील अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती जाफ्राबाद, जिल्हा जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी विहीर अधिग्रहण या बाबीवर एकूण रूपये 1,48,10,933/- एवढा खर्च नोंदवला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्र.क्र.12/पापु-14, दिनांक 03/02/1999 अन्वये तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी टंचाईग्रस्त गावांची पाहणी करून अहवाल जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावयाचा आहे.

2) महाराष्ट्र भुजल अधिनियम 1993 अन्वये सतत तीन वर्षापेक्षा जास्त एकाच विहिरीचे अधिग्रहण झाले असेल, तर उपविभागीय अधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी यांनी विहिरीची पाहणी करावयाची आहे. पंचायत समिती, औरंगाबाद यांनी अधिग्रहण केलेल्या विहिरी तीन वर्षापेक्षा जुन्या अधिग्रहित असल्याची माहिती दर्शविली नाही. त्यामुळे अधिग्रहण केलेल्या अशा विहिरींची पडताळणी करता आली नाही.

3) अधिग्रहण केलेल्या विहिरी तलाठी, मंडळ निरीक्षकामार्फत विहीर गावांच्या सर्वात जवळ अंतरावर असल्याचे प्रमाणित करावयाचे आहे. त्यानंतर तहसिलदार यांनी स्वत: विहीर गावाच्या जवळ असल्याची व पाणीपुरवठा होऊ शकेल, याची खात्री करून तसे आदेशात नमूद करणे आवश्यक आहे. परंतु, तसे प्रमाणपत्र दिलेले नाही. त्यामुळे गावाजवळची विहीर अधिग्रहण करून त्यांनाच रक्कम प्रदान केल्याची पडताळणी करता आली नाही.

4) बहुतेक विहिरी अधिग्रहण केलेल्या कालावधीतील तहसिलदार यांचे आदेशाची तपासणी केली असता विहीर अधिग्रहणाचे आदेश प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरु केल्यानंतर आहेत. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र पाणीपुरवठा अधिनियम 1983 चे कलम 11(2)(ब) प्रमाणे प्रत्येक व्यक्ती अथवा कुटुंब यांना किती पाण्याची आवश्यकता आहे. याची परिगणना करून याबाबतच्या अहवालानुसार पाण्याचे स्रोत निश्चित करणे आवश्यक आहे. परंतु, अशा प्रकारचा अहवाल लेखापरीक्षणात उपलब्ध झाला नाही. त्यामुळे अधिग्रहण केलेल्या विहिरीतून गावास योग्य प्रमाणात पाणीपुरवठा झाल्याबाबतची पडताळणी उक्त अहवालाशिवाय करता आली नाही.

6) ग्रामपंचायती / गावांमधील ग्रामस्थांना अधिग्रहण केलेल्या विहिरीमधून योग्य पाणीपुरवठा केल्याबाबतचे कोणतेही अभिलेखे / प्रमाणपत्र देयकासोबत संलग्न केलेले नाही.

7) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1008/प्र.क्र.5/पापु-14, दिनांक 25/03/2008 अन्वये खाजगी विहीर अधिग्रहित केल्यानंतर त्या विहीर मालकाने पाणी काढण्यास विद्युत पंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामग्री उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तरच सुधारित आदेशानुसार रूपये 400/- प्रती दिन मोबदला अनुज्ञेय आहे. तथापि, लेखापरीक्षणात सादर केलेल्या संचिकांमध्ये अशी साधन सामग्री विद्युत देयके विहीर मालकाचे नावे असल्याबाबत आढळून आले नाहीत.

8) उपरोक्त शासन निर्णयानुसार संबधित विहीर मालकांशी मोबदल्या संदर्भात करारनामे करणे आवश्यक असतांना काही करारनामे अपूर्ण असल्याचे आढळून आले.

**4.343 नैसर्गीक आपत्ती अंतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मंठा, जिल्हा जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती, मंठा ने सन 2016-2017 मध्ये 2245 नैसर्गीक आपत्ती व्यवस्थापन या लेखाशिर्षाखाली वर्षभरात रक्कम रुपये 4,07,74,285/- खर्च टँकरदवारे पाणी पुरवठा व विहीर अधिग्रहणासाठी नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक लेखाप-2013/(7/13)/ वित्त-8, दिनांक 19/02/2013 अन्वये वारंवार लेखी व मौखिक मागणी करुनही लेखे/अभिलेखे न दर्शविणेबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित करण्यांत यावी व संबंधीत जबाबदारावर नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यांत यावी.

2) प्रमाणक क्रमांक 12 दिनांक 09/2016 रक्कम रुपये 2,48,094/- अन्वये पाणी पुरवठा न करताच उभ्या असलेल्या टँकरचे भाडे अदा केलेले आहे. जिल्हाधिकारी, जालना यांनी मे. परफेक्ट रोडलाईन्स, जालना यांच्याशी दिनांक 09/02/2015 रोजी जो करारनामा केला आहे, त्यानुसार जी.पी.एस. प्रणालीवर ज्या टँकरच्या फे-याची नोंद येईल, त्याच फे-या देयकाकरीता अनुज्ञेय राहील, असे नमुद केले आहे. तसेच कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी जिल्हाधिकारी, जालना यांच्याशी झालेल्या करारामधील अटी व शर्थीनुसार कार्यवाही करणेबाबतचे दिनांक 27/09/2016 चे पत्रात नमुद केलेले आहेत. असे असतांनाही गट विकास अधिकारी, मंठा यांनी पाणी पुरवठा न करताच उभ्या असलेल्या टँकरचे भाडे अदा केलेले आहे. याबाबत समर्थनिय खुलासा करावा.

3) ज्या गावांत टँकर लावण्यांत आलेले आहेत, त्याच गावातील विहीरी पाणी पुरवठयासाठी अधिग्रहीत केल्याचे प्रमाणकांवरुन दिसुन येते. महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई/ 3059/प्र.क्र.13/पापु.-14, दिनांक 01/02/1999 अन्वये ज्या गावांत दीड किलोमीटर परिघाच्या आंतमध्ये पाण्याचे स्त्रोत उपलब्ध आहेत, त्या ठिकाणी टँकर लावता येत नाही. असे असतांनाही ज्या गावांत विहीर अधिग्रहीत केली, त्याच गावांत टँकर लावल्याचे दिसून येते.

4) ग्रामपंचायत रानमळा या गावांसाठी श्री. मनोहर दत्तराव कांगणे रा. रानमळा यांचे दिनांक 01/04/2016 ते 25/05/2016 या कालावधीसाठी विहीर अधिग्रहण करण्यांत आली होती. 55 दिवसाचे रुपये 400/- प्रमाणे रुपये 22,000/- देय असतांना रुपये 34,400/- चे देयक अदा करण्यांत आले आहे. जादा अदाई रुपये 12,400/- संबंधीत जबाबदाराकडून वसुल करण्यांत यावी.

5) लेखापरीक्षणासाठी सादर केलेल्या प्रमाणकांची तपासणी केली असता एकच टँकर दोन ग्रामपंचायतींना लावले आणि दोन वेळेस टँकरभाडे अदा केल्याचे दिसून येते. जिल्हाधिकारी, जालना यांनी संबंधीत ठेकेदाराशी केलेल्या दरकरारानुसार एका टँकरचे संपुर्ण दिवसाचे भाडे त्याच्या क्षमतेनुसार ठरविण्यांत आलेले आहे. एका टँकरदवारे एकापेक्षा अधिक ग्रामपंचायतीला पाणी पुरवठा असला तरीही दिवसाचे भाडे हे एकदाच देता येते, (एका दिवासासाठी) परंतु, दोन ग्रामपंचायतीला एकाच दिवशी पाणी पुरवठा केला असतांना दोन वेगवेगळे भाडे अदा करण्यांत आलेले आहे.

**4.344 खाजगी टँकरने पाणीपुरवठा अदायगीमधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती घनसावंगी, जिल्हा जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती, घनसावंगीच्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणामध्ये गट विकास अधिकारी यांनी वरीलप्रमाणे माहे डिसेंबर 2016 मध्ये खाजगी टँकरने पाणीपुरवठा करणेवर रक्कम रूपये 3,10,38,521/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सबंधित देयकावर आयकर रक्कम रूपये 7,13,886/- स्टेंटबँक ऑफ हैद्राबाद, अंबड येथे भरणा केलेला आहे. पोंच दर्शवुन खात्री दर्शवावी.

2) टँकर क्रमांक एम.एच.46-2133 राजेगांव ते गुरुपिंप्री 2 खेपा रोज 45 कि.मी. प्रती खेप प्रमाणे दिनांक 04/04/2016 ते 10/07/2016 पर्यंत रक्कम रूपये 9,40,570/- मे.परफेक्ट रोडलाईन्स, जालना यांना प्रदान केलेले आहे. दिनांक 20/04/2016 रोजी राजेगांव उद्भव बदलुन अंबड जलशुध्दीकरण कैंद्र केला. त्यामुळे उद्भव 45 कि.मी. ऐवजी 90 कि.मी. प्रवास एका दिवसासाठी 45 कि.मी. प्रमाणे 2 खेपेचे 90 कि.मी. जास्त वाढले. त्यामुळे दिनांक 20/04/2016 ते 10/07/2016 साठी 78 दिवसाचे 47.48 किमी प्रमाणे 7020 किमीचे जास्तीचे प्रदान करावे लागले. संबधित उदभव बदलणेबाबत आदेश दर्शवावे अन्यथा रक्कम रूपये 47.48 प्रती किमी प्रमाणे 7,020 किमीसाठी रुपये 3,33,309/- संबधिताकडुन वसुल करुन पुर्तता करावी.

3) वाहन क्रमांक एमएच-21-5903 राजाटाकळी ते कुंभार पिंपळगांव अंतर 20 कि.मी. जाणे-येणे दिनांक 20/03/2016 ते 19/04/2016 दिनांक 20/04/2016 ते 30/05/2016 उदभव पिंपरखेड शिवार ते कुंभार पिंपळगांव बदलुन दररोज 30 कि.मी. जाणे-येणे त्यामुळे 3 खेपा रोजसाठी 30 कि.मी. रोज अंतर वाढले. संबंधित उदभव बदलणेबाबत आदेश दर्शवावे अन्यथा रक्कम रूपये 25.17 प्रती किमी प्रमाणे 72 दिवसासाठी 2,160 किमीसाठी रुपये 54,367/- संबधिताकडुन वसुल करुन पुर्तता करावी.

4) वाहन क्रमांक एमएच-16अेइ-612 पिंपरखेडा ते लिंबोणी अंतर 60 कि.मी. जाणे-येणे दिनांक 14/04/2016 ते 30/04/2016 दिनांक 01/05/2016 ते 10/07/2016 उदभव राणीऊंचेगांव ते लिंबोणी बदलुन दररोज 110 कि.मी. जाणे-येणे त्यामुळे 3 खेपा रोजसाठी 150 कि.मी. रोज अंतर वाढले. संबधित उदभव बदलणेबाबत आदेश दर्शवावे अन्यथा रक्कम रूपये 25.75 प्रती किमी प्रमाणे 69 दिवसासाठी 10,350 किमीसाठी रूपये 2,66,512/- संबधिताकडुन वसुल करुन पुर्तता करावी.

5) वाहन क्रमांक एमएच-12-अेक्यु-1851 वाघमारे यांचे शेत ते वडीरामसगांव अंतर 20 कि.मी. जाणे-येणे दिनांक 01/04/2016 ते 03/04/2016 दिनांक 04/04/2016 ते 10/07/2016 उदभव रामसगांव ते वडीरासमगांव बदलुन दररोज 70 कि.मी. जाणे-येणे त्यामुळे 3 खेपा रोजसाठी 150 कि.मी. रोज अंतर वाढले. संबधित उदभव बदलणेबाबत आदेश दर्शवावे अन्यथा रक्कम रूपये 25.89 प्रती किमी प्रमाणे 96 दिवसासाठी 14,400 किमीसाठी रूपये 3,72,816/- संबधिताकडुन वसुल करुन पुर्तता करावी.

6) वाहन क्रमांक एमएच-04-बीजी-6664 घनसावंगी ते जांबसमर्थ अंतर 56 कि.मी. जाणे-येणे दिनांक 01/04/2016 ते 30/04/2016 दिनांक 01/05/2016 ते 10/07/2016 उदभव रोहीणा बु. ते जांबसमर्थ बदलुन दररोज 88 कि.मी. जाणे-येणे त्यामुळे 3 खेपा रोजसाठी 96 कि.मी. रोज अंतर वाढले. संबधित उदभव बदलणेबाबत आदेश दर्शवावे अन्यथा रक्कम रूपये 24.08 प्रती किमी प्रमाणे 69 दिवसासाठी 6,624 किमीसाठी रूपये 1,59,506/- संबधिताकडुन वसुल करुन पुर्तता करावी

7) वाहन क्रमांक एमएच-04-टीए-2502 घनसावंगी ते जांबसमर्थ अंतर 56 कि.मी. जाणे-येणे दिनांक 01/04/2016 ते 30/04/2016 दिनांक 01/05/2016 ते 10/07/2016 उदभव रोहीणा बु. ते जांबसमर्थ बदलुन दररोज 88 कि.मी. जाणे-येणे त्यामुळे 3 खेपा रोजसाठी 96 कि.मी. रोज अंतर वाढले. संबधित उदभव बदलणेबाबत आदेश दर्शवावे अन्यथा रक्कम रूपये 24.14 प्रती किमी प्रमाणे 69 दिवसासाठी 6,624 किमीसाठी रूपये1,59,903/- संबधिताकडुन वसुल करून पुर्तता करावी.

8) वाहन क्रमांक एमएच-12-टीए-3377 उक्कडगांव ते विरगांवतांडा अंतर 52 कि.मी. जाणे-येणे दिनांक 01/04/2016 ते 31/05/2016 दिनांक 01/06/2016 ते 10/07/2016 उदभव रोहीणा बु. ते विरेगांवतांडा बदलुन दररोज 102 कि.मी. जाणे-येणे त्यामुळे 3 खेपा रोजसाठी 150 कि.मी. रोज अंतर वाढले. संबधित उदभव बदलणेबाबत आदेश दर्शवावे अन्यथा रक्कम रूपये 24.52 प्रती किमी प्रमाणे 38 दिवसासाठी 5,700 किमीसाठी रूपये1,39,764/- संबधिताकडुन वसुल करुन पुर्तता करावी

9) वाहन क्रमांक एमएच-12-7659 तळेगांव ते राणिउंचेगांव अंतर 36 कि.मी. जाणे-येणे दिनांक 19/04/2016 ते 15/06/2016 दिनांक 15/06/2016 ते 10/07/2016 उदभव अंबड ते राणीउंचेगांव बदलुन दररोज 86 कि.मी. जाणे-येणे त्यामुळे 3 खेपा रोजसाठी 150 कि.मी. रोज अंतर वाढले. संबधित उदभव बदलणेबाबत अनूपालन दर्शवावे.

10) वाहन क्रमांक एमएच-17-7664 विहिर ते राणिउंचेगांव अंतर 38 कि.मी. जाणे-येणे दिनांक 15/04/2016 ते 14/06/2016 व दिनांक 15/06/2016 ते 10/07/2016 उदभव अंबड ते राणीउंचेगांव बदलुन दररोज 70 कि.मी. जाणे-येणे त्यामुळे 3 खेपा रोजसाठी 96  कि.मी. रोज अंतर वाढले. संबधित उदभव बदलणेबाबत आदेश दर्शवावे अन्यथा रक्कम रूपये 24.64 प्रती किमी प्रमाणे 24 दिवसासाठी 2,304 किमीसाठी रूपये 56,770/- संबधिताकडुन वसुल करुन पुर्तता करावी

11) वाहन क्रमांक एमएच-04-5373 घनसावंगी ते बोरगांव अंतर 50 कि.मी. जाणे-येणे 2 ट्रीपसाठी दररोज 100 किमी जाणे-येणे दिनांक 15/05/2016 ते 21/05/2016 पर्यंत व दिनांक 22/05/2016 ते 05/07/2016 उदभव

अंबडफिल्टर ते बोरगांव बदलुन दररोज 110 कि.मी. जाणे-येणे त्यामुळे 3 खेपा रोजसाठी 230 कि.मी. रोज अंतर वाढले. संबधित उदभव बदलणेबाबत आदेश दर्शवावे अन्यथा रक्कम रूपये 23.62 प्रती किमी प्रमाणे 10 दिवसासाठी 2,300 किमीसाठी रूपये 54,326/- संबधिताकडुन वसुल करून पुर्तता करावी.

12) वाहन क्रमांक एमएच-31-3709 चंद्रकला सुरेश शिंदे यांच विहिर ते सरफगव्हाण अंतर 68 कि.मी. जाणे-येणे दिनांक 01/04/2016 ते 30/04/2016 व दिनांक 01/05/2016 ते 10/06/2016 उदभव रोहिणा ते सरफगव्हाण बदलुन दररोज 90 कि.मी. जाणे-येणे त्यामुळे 3 खेपा रोजसाठी 66 कि.मी. रोज अंतर वाढले. संबधित उदभव बदलणेबाबत आदेश दर्शवावे अन्यथा रक्कम रूपये 24/- प्रती किमी. प्रमाणे 23 दिवसासाठी 3,450 किमीसाठी रूपये 82,800/- संबधिताकडुन वसुल करून पुर्तता करावी.

13) वाहन क्रमांक एमडब्ल्युपी-8660 दिनांक 25/05/2016 ते 10/07/2016 लामणवाडी एका फेरीचे अंतर 74 कि.मी. प्रती दिवस प्रमाणे 44 दिवसाचे 3,256 कि.मी. अनुज्ञेय आहे. परंतु, प्रत्यक्षात 6,512 कि.मी.चे प्रती कि.मी. रूपये 25.7705 प्रमाणे रूपये 1,67,818/- अदा केले आहेत. जास्तीचे रक्कम रूपये 83,909/- अदाईबाबत खुलासा करावा, अन्यथा रक्कम रूपये 83,909/- संबधिताकडुन वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

14) पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टब्ल्यु क्यु एम /2010/प्र.क्रं.149/पापु-12, दिनांक 30/10/2010 मधील उपपरिच्छेद क्रमांक 4 मधील तरतुदीनुसार प्रत्यक्ष स्त्रोताजवळ जावुन स्त्रोताची माहिती संकलित करण्याची तरतुद आहे. तथापि, अशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही. सबब ज्या गावात पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे, त्या ठिकाणापासुन उद्भवाचे अंतर निश्चित करणे शक्य होत नाही. संबधित गावास पाणी टंचाईमुळे टँकर लावणेबाबतचे ग्रामपंचायतचे प्रस्ताव, त्यासोबतचे अभिलेखे, सक्षम प्राधिका-यांचे विहिर अंतर प्रमाणपत्र इत्यादी अभिलेखे लेखापरिक्षणास दर्शविलेले नाहीत. त्यामुळे संबधित गावाची लोकसंख्या किती, त्यानुसार किती टँकरची आवश्यकता होती, नेमुन दिलेल्या उद्भवावरुनच पाणी पुरवठा झाला किंवा नाही, उद्भवाचे अंतर योग्य घेतले किंवा नाही, याबाबत खात्री करता आली नाही.

15) शासन निर्णय दिनांक 27/02/2008 मधील तरतुदी तसेच जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार सद्रील गावांमध्ये पुढील वर्षी पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये म्हणुन ग्रामपांचायतीकडुन टंचाई प्रतिबंधात्मक आराखडे तयार करुन घेण्यात येऊन त्यात पेयजल स्त्रोत बळकटीकरण व भुजल संपत्तीच्या उपलब्धतेत सातत्य राहण्यासाठी राबवावयाच्या जलसंधारण व पुनर्भरण योजनाचा समावेश करण्यात यावा, याबाबतची सर्व जबाबदारी तहसिलदार व गट विकास अधिकारी यांची राहिल. असे असतांना वारंवार त्याच गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण होऊन मोठया प्रमाणात पाणीपुरवठा कामी खर्च होत असल्याने ठोस अशा योजनांची अंमलबजावणी वरील अधिकाऱ्यांनी केल्याचे दिसुन येत नाही. राष्ट्रीय पेयजल योजना, शिवकालीन पाणी पुरवठा योजना, जलसंधारण योजना इत्यादी अशा प्रकारे पाण्याचा स्त्रोत उपलब्ध होण्यासाठी विविध योजना राबवुन भुजल साठा वाढविण्याबाबत जाणीवपुर्वक प्रयत्न होणे आवश्यक आहेत.

16) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 20 50 नुसार संबधित गुत्तेदारांना रक्कम प्रदान केल्यानंतर संबधिताकडुन पोंच पावती घेणे आवश्यक असतांना अशा पोचपावत्या लेखापरिक्षणास न दर्शविल्याने संबधितांना रक्कम प्रदान झाली किंवा कसे, याची खात्री करता आली नाही.

**4.345 नैसर्गिक आपत्ती अंतर्गत इंजिन भाडे, विहीर / बोअर अधिग्रहण प्रदानातील अनिमितता.**

**पंचायत समिती बीड, जिल्हा बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती, बीड सन 2015-2016 व 2016-2017 मध्ये इंजिन भाडे, विहीर / बोअर अधिग्रहणाचा मोबदला प्रदान करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्र.क्र.53 / पापु-14, दिनांक 30/04/2012 व शासन निर्णय क्रमांक टंचाई 1008/प्र.क्र.05/पापु-14, दिनांक 25/03/2008 अन्वये महाराष्ट्र पिण्याच्या पाणी पुरवठयाचे अधिग्रहण अधिनियम 1983 मधील कलम 8 मध्ये 1992 मध्ये केलेल्या सुधारणेनुसार पाणी टंचाईच्या कालावधीमध्ये अधिगहीत केलेल्या विहिरीच्या मोबदल्याचे सुधारित दर मंजूर केलेले

आहेत. त्यानुसार “खाजगी विहिर अधिग्रहीत केल्यानंतर त्या विहिर मालकाने पाणी काढण्यासाठी विदयुत / डिझेल पंप व विदयुत कनेक्शनसह साधन सामुग्री उपलब्ध करुन दिली नसल्यास प्रती दिन रक्कम रुपये रक्कम रुपये 300/- या कमाल मर्यादेत व विहिर मालकाने पाणी काढण्यासाठी विदयुत पंप / डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामुग्री उपलब्ध्द करुन दिली असल्यास प्रतिदिन रक्कम रुपये 400/- कमाल मर्यादेत विहिर अधिग्रहण मोबदला दयावयाचा असून वरीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेला मोबदल्या संदर्भात विहिर मालकांशी कायदेशीर करार करण्यात येवून विहीर अधिग्रहण मोबदल्याची रक्कम दर तीन महिन्यांनी वेळच्या वेळी संबंधितांना अदा करणेबाबत शासन आदेशात सूचना आहेत. सदर मोबदला रक्कम रुपये 400/- देणेबाबत प्राधिकार उपलब्ध झालेला नाही.

2) सोबतचे विवरणपत्रातील प्रमाणकान्वये केलेल्या प्रदानामध्ये गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांच्या आदेशान्वये मौजे पाली, उखंडा, उपळी आणि लिंबारुई इत्यादी येथील तलावावर इंजिन भाडयाने लावण्यांत आलेली असून त्याची प्रती दिन रक्कम रुपये 400/- नुसार भाडे अदाई करण्यांत आलेली आहे. तलावावर लावलेल्या इंजिन भाडेची अदाई रक्कम रुपये 8,11,400/- करण्यांत आलेली आहे. संबंधिताचे तलावावर इंजिन भाडयाने लावल्यानंतर त्यांना रक्कम रुपये 400/- प्रती दिन भाडे अनुज्ञेय नसतांना अदाई केलेली आहे. त्यामुळे रक्कम रुपये 6,09,300/- अतिप्रदान झालेले आहे. सन 2016-2017 मध्ये अशा प्रकारच्या इंजिनभाडे प्रदान केलेल्या सर्व प्रकरणांचा गटविकास अधिकारी यांनी आढावा घेणे आवश्यक आहे.

3) वर नमूद केलेल्या विहीर / बोअर अधिग्रहणाबाबत विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या संबंधित विहीर मालकाचा अधिग्रहण प्रस्तावात विदयुत कनेक्शन असल्याबाबत महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीचे प्रमाणपत्र किंवा देयकासोबत प्रदान कालावधीचे विदयुत देयके न जोडल्याने किंवा विभागाच्या उपअभियंताच्या किंवा सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्थळ पाहणी अहवालात विदयुत कनेक्शन किंवा डिझेल पंप असल्याचे नमुद नाही त्यामुळे त्यांना करण्यात आलेले सरसकट रक्कम रुपये 400/- दराने प्रदान नियमबाहय ठरते.

4) सन 2016-2017 मध्ये पाणी पुरवठा करण्यात आलेल्या अधिग्रहण आदेशामध्ये प्रत्यक्षात पाणी पुरवठयाच्या कालावधी हा सुरुवातीचा / अगोदरचा असताना तहसील कार्यालय बीड यांचे विहीर / बोअर अधिग्रहणाचे आदेशानंतरच्या तारखेचे आहेत. तर काही आदेश अधिग्रहण कालावधी संपल्यानंतरचे आहेत. तसेच देयकासोबत जोडण्यात आलेले आदेश झेरॉक्स प्रती आहेत. त्यामुळे सदरचे आदेश तहसिल कार्यालयाने निर्गमित केल्याबाबत साशंकता निर्माण होते.

अधिग्रहणाचे आदेशानंतर प्राप्त झालेले असताना आदेशापुर्वीच विहीर/बोअर अधिग्रहण केल्याचे दिसुन येते. म्हणजेच तहसील कार्यालयाच्या आदेशापुर्वीच पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

**4.346 खाजगी पाणी टँकरने पाणी टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा देयकातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती बीड, जिल्हा बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समितीने सन 2016-2017 मध्ये वरील ठेकेदाराने टँकरव्दारे पिण्याचे पाणी पुरवठा केलेल्या देयकाचे प्रमाणक क्रमांक 40, दिनांक 26/08/2016 अन्वये रक्कम रुपये 52,54,296/- प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी यांचे आदेशातील अट क्रमांक 13 व 14 नुसार टँकर ज्या दिवशी पाणी वाहतुकीचे कामी हजर करण्यात येईल, त्यावेळी त्याच्या क्षमतेबाबतची प्रमाणे सादर करण्याची जबाबदारी वहातुक ठेकेदाराची राहील. तसेच पंचायत समितीकडे आर.सी. बुकची झेरॉक्स प्रत, गाडीमालकाचे पॅनकार्ड जमा करणे तसेच टँकर कोणत्या गांवी पाणी पुरवठा करीत आहे, याबाबत टँकरच्या काचावर गांव नमूद करणे आवश्यक असतांनाही पंचायत समितीकडे प्राप्त आर.सी.बुकच्या झेरॉक्स प्रती अथवा आर.सी.बुक लेखापरीक्षणास मागणी करुनही उपलब्ध करुन देण्यांत आल्या नाहीत.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी तसेच उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी आर.सी.बुक प्रमाणे टँकरची भारवाहन क्षमता प्रमाणित केलेली यादीच्या आधारे टँकरचे लॉगबुक्स, संचिका इत्यादी अभिलेख्यावरुन टँकर देयकाच्या प्रदानाची तपासणी केली असता संबंधित ठेकेदारास टँकरच्या प्रमाणित भार वाहन

क्षमतेपेक्षा जादा भार क्षमतेने टँकरचे प्रतिदिन भाडे व प्रती कि.मी. भाडे आदा करण्यात आल्याने निवड महिन्यांमध्ये रक्कम रुपये 4,52,281/- एवढया रकमेचे अतिप्रदान झालेले आहे. तसेच देयकातील टँकर क्रमांक MRL-3672, MH-23-6003, MH-23-0254, MH-43-E-6927, MH-23-4594, MH-23-1955, MH-12-UA-1191, MH-16-B-2770, MH-21-5266, MH-06-AC-472, MH-23-5502 या सर्व टँकरचे आर.सी.बुक प्रमाणे वाहन क्षमतेबाबतचे अभिलेख उपलब्ध झाले नसल्याने सदरील टँकरचे प्रदान सुयोग्य झाले असल्याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

सदर बाब उदाहरणादाखल असुन सर्व प्रदानांचा आढावा घेण्यात येवुन सुयोग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्च्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 2013/प्र.क्रं.41/पापु-14 दिनांक 04/01/2014 व महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे पत्र जा.क्रं.टंचाई/ प्र.क्र.20/पापु-14/ दिनांक 15/03/2014 मध्ये निर्देशित केल्यानुसार टँकरवर जीपीएस प्रणाली बसवुन त्याचे नियंत्रक उपकरण जी.पी.एस. प्रणालीचे नोडल अधिकार यांचेकडे बसवुन घेवून सदर संगणकीय प्रणालीव्दारे टँकर फेऱ्यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. जी.पी.एस. प्रणालीवरुन टँकर फेऱ्याच्या अंतराबाबतच्या अहवालावर संबंधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

4) समितीने पाणी पुरवठा झाल्याचे प्रत्येक आठवडयाच्या शेवटी गटविकास अधिकारी / तहसीलदार यांचेकडे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे व सदर प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच टँकरच्या बिलाची अदायगी करण्यात यावी, असे शासन आदेश आहेत. तथापि, सदरचे अहवाल संचिकेत आढळुन आले नाहीत.

5) निवड महिन्यांव्यतिरीक्त इतर महिन्यातील देयकांमध्ये वरीलप्रमाणे अनियमितता झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**4.347 शासकीय पाणी पुरवठा खाजगी टँकरने पाणी टंचाई ग्रस्त गावांना पाणी पुरवठा देयकातील अनियमितता.**

**पंचायत समिती गेवराई, जिल्हा बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समितीने सन 2016-2017 मध्ये वरील ठेकेदारांनी टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेल्या देयकाचे 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 2,28,87,458/- प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी तसेच उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी आर.सी.बुक प्रामाणे टँकरची भारवाहन क्षमता प्रमाणित केलेली यादी (उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांचे पत्र क्रमांक जा.क्र.56/आस्था/उपप्रापका/2017, दिनांक 29/03/2017 आणि पत्र क्रमांक 65, दिनांक 05/04/2017 पत्रानुसार जिल्हा परिषदेला प्राप्त असलेली) च्या आधारे टँकरचे लॉगबुक्स, संचिका इत्यादी अभिलेख्यावरुन टँकर देयकाच्या प्रदानाची तपासणी केली असता संबंधित ठेकेदारास टँकरच्या प्रामाणित भारवाहन क्षमतेपेक्षा जादा क्षमतेने टँकरचे प्रती दिन भाडे व प्रती कि.मी. भाडे अदा करण्यात आल्याने अनुक्रमे रक्कम रुपये 45,88,408/- व 22,83,205/- असे एकुण रक्कम रुपये 68,71,613/- एवढया रकमेचे अतिप्रदान झालेले असून ते वसुलपात्र ठरते.

2) 300 टँकरचे आर.सी. बुकप्रमाणे क्षमते बाबतचे अभिलेखे उपलब्ध झाले नसल्याने सदरील टँकरचे प्रदान सुयोग्य झाले असल्याबाबत पडताळणी करता आलेली नाही. पंचायत समितीने या प्रदानाची पुन:श्च खात्री करुन जादा प्रदान झाले असल्यास ते पण वसुल करणे आवश्यक आहे.

**4.348 शासकीय पाणी पुरवठा खाजगी टँकरने पाणी टंचाईग्रस्त गावांना पाणी पुरवठा देयकातील अनियमितता**

**पंचायत समिती माजलगाव, जिल्हा बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समितीने सन 2016-2017 मध्ये ठेकेदारांनी टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेल्या देयकाचे 5 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 79,73,323/- प्रदान केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी यांचे आदेशातील अट क्रमांक 13 व 14 नुसार टँकर ज्या दिवशी पाणी वाहतुकीचे कामी हजर करण्यात येईल, त्यावेळी त्याच्या क्षमतेबाबतची प्रमाणे सादर करण्याची जबाबदारी वाहतुक ठेकेदाराची राहील. तसेच पंचायत समितीकडे आर.सी. बुकाची झेरॉक्स प्रत, गाडीमालकाचे पॅनकार्ड जमा करणे तसेच टँकर कोणत्या

गांवी पाणी पुरवठा करीत आहे, याबाबत टँकरच्या काचावर गांव नमूद करणे आवश्यक असतांनाही पंचायत समितीकडे प्राप्त आर.सी. बुकाच्या झेरॉक्स प्रती अथवा आर.सी. बुके लेखापरीक्षणास मागणी करुनही उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत. तसेच उपरोक्त प्रमाणकांचे प्रदान केलेल्या टँकर देयक नस्तीला / संचिकेत पाणीपुरवठा करणेबाबत तहसिलदार यांचे आदेश लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी तसेच उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी आर.सी.बुक प्रामाणे टँकरची भारवाहन क्षमता प्रमाणित केलेली यादी (उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांचे पत्र क्रमांक जा.क्र.56/आस्था/उपप्रापका/2017, दिनांक 29/03/2017 आणि पत्र क्रमांक 65, दिनांक 05/04/2017 पत्रानुसार जिल्हा परिषदेला प्राप्त असलेली) च्या आधारे टँकरचे लॉगबुक्स, संचिका इत्यादी अभिलेख्यावरुन टँकर देयकाच्या प्रदानाची तपासणी केली असता संबंधित ठेकेदारास टँकरच्या प्रामाणित भारवाहन क्षमतेपेक्षा जादा क्षमतेने टँकरचे प्रती दिन भाडे व प्रती कि.मी. भाडे अदा करण्यात आल्याने अनुक्रमे रक्कम रुपये 1,84,864/-, 45,516/-, 76,950/- असे एकुण रक्कम रुपये 3,07,330/- एवढया रकमेचे अतिप्रदान झालेले असून ते वसुलपात्र ठरते तसेच वर नमूद प्रमाणकान्वये प्रदान केलेल्या देयकातील 08 टँकर, प्रमाणक क्रमांक 1 दिनांक 06/09/2016 अन्वये प्रदान केलेल्या देयकातील 4 टँकर व प्रमाणक क्रमांक 15 दिनांक 16/09/2016 अन्वये प्रदान केलेल्या देयकातील 3 टँकर या सर्व टँकरचे आर.सी. बुक प्रमाणे क्षमतेबाबतचे अभिलेखे उपलब्ध झाले नसल्याने सदरील टँकरचे प्रदान सुयोग्य झाले असल्याबाबत पडताळणी करता आलेली नाही. पंचायत समितीने या प्रदानाची पुनःश्च खात्री करुन जादा प्रदान झाले असल्यास ते पण वसुल करणे आवश्यक आहे.

**4.349 खाजगी पाणी टँकरने पाणी टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा देयकातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती अंबेजोगाई, जिल्हा बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समितीने सन 2016-2017 मध्ये वरील ठेकेदारानी टँकरव्दारे पिण्याचे पाणी पुरवठा केलेल्या देयकाचे रक्कम रुपये 54,67,459/- प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी यांचे आदेशातील अट क्रमांक 13 व 14 नुसार टँकर ज्यादिवशी पाणी वाहतुकीचे कामी हजर करण्यात येईल. त्यावेळी त्याच्या क्षमतेबाबतची प्रमाणे सादर करण्याची जबाबदारी वहातुक ठेकेदाराची राहील. तसेच पंचायत समितीकडे आर.सी. बुकची झेरॉक्स प्रत, गाडीमालकाचे पॅनकार्ड जमा करणे तसेच टँकर कोणत्या गांवी पाणी पुरवठा करीत आहे, याबाबत टँकरच्या काचावर गांव नमूद करणे आवश्यक असतांनाही पंचायत समितीकडे प्राप्त आर.सी.बुकच्या झेरॉक्स प्रती अथवा आर.सी.बुके लेखापरीक्षणास मागणी करुनही उपलब्ध करुन देण्यांत आल्या नाहीत.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी तसेच उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी आर.सी.बुक प्रमाणे टँकरची भारवाहन क्षमता प्रमाणित केलेली यादी (उप प्रादेशिक परिवाहन कार्यालय बीड यांचे पत्र क्रमांक जा.क्रं.56/आस्था/उपप्रापका/2017, दिनांक 29/03/2017 आणि पत्र क्रमांक 65, दिनांक 05/04/2017 पत्रानुसार जिल्हा परिषदेला प्राप्त असलेली ) च्या आधारे टँकरचे लॉगबुक्स, संचिका इत्यादी अभिलेख्यांवरुन टँकर देयकाच्या प्रदानाची तपासणी केली असता संबंधित ठेकेदारास टँकरच्या प्रमाणित भारवाहन क्षमतेपेक्षा जादा भार क्षमतेने टँकरचे प्रतिदिन भाडे व प्रतिदिन प्रती कि.मी. भाडे अदा करण्यांत आल्याने अनुक्रमे रक्कम रुपये 5,85,408/-, 4,13,163/- व 34,296/-, आणि 1,70,612/- असे एकुण रक्कम रुपये 12,03,479/- एवढया रकमेचे अतिप्रदान झालेले असून ते वसुलपात्र ठरते.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्च्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 2013/प्र.क्रं.41/पापु-14 दिनांक 04/01/2014 व महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे पत्र क्रमांक जा.क्रं.टंचाई/प्र.क्रं.20/ पापु-14, दिनांक 15/03/2014 मध्ये निर्देशित केल्यानुसार टँकरवर जीपीएस प्रणाली बसवुन त्याचे नियंत्रक उपकरण जी.पी.एस. प्रणालीचे नोडल अधिकार यांचेकडे बसवुन घेवून सदर संगणकीय प्रणालीव्दारे टँकर फेऱ्यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. जी.पी.एस. प्रणाली चा अहवाल उपलब्ध झाला नाही.

4) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई-1002/प्र.क्र.290/पापु-14, दिनांक 19/09/2002 नुसार टँकर/इतर वाहनाने पाणी पुरवठा मंजूर झाल्यानंतर प्रत्यक्षात ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार व विहित प्रमाणात प्रत्यक्षात गांव / वाडीला पाणी पुरवठा होतो किंवा नाही, यावर देखरेख ठेवणे तसेच पाणीपुरवठा करतांना काही गैरप्रकार होत असल्यास ते शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करणे आवश्यक आहे. पाणी पुरवठादारास मंजुरी आदेशानंतर गटविकास अधिकारी यांनी गाम स्वच्छता व पाणी पुरवठा समितीस पाणी पुरवठाच्या तारीखनिहाय वेळापत्रक, प्रत्येक दिवशी टँकरच्या किती फेऱ्या होतील, टँकरची क्षमता किती असेल, इत्यादी तपशीलवार वेळापत्रक तयार करुन त्याची प्रत प्रत्येक आठवडयाच्या सुरुवातीस संबंधित गावाच्या ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीस उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे समितीने त्यानुसार पाणी पुरवठा झाल्याचे प्रत्येक आठवडयाच्या शेवटी गटविकास अधिकारी / तहसीलदार यांचेकडे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे व सदर प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच टँकरच्या बिलाची अदायगी करण्यात यावी, असे शासन आदेश आहेत. तथापि, सदरचे अहवाल संचिकेत आढळुन आले नाहीत.

5) पाणी उद्भव विहीरीची व टंचाईग्रस्त गावाची गटविकास अधिकारी व तहसीलदार यांनी संयुक्त पाहणी करुन अंतराची प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. परंतू, अशी प्रमाणपत्र संचिकेत नाहीत.

6) वाहनाच्या लॉगबुकातील नोंदीवर स्पीडोमिटरच्या नोंदी नाहीत. त्यामुळे प्रदानातील किमी योग्य असल्याबाबतचे खातरजमा करता आली नाही.

**4.350 विहीर व बोअर अधिग्रहणाच्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती केज, जिल्हा बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,31,66,800/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती, केज सन 2016-2017 मध्ये विहीर व बोअर अधिग्रहणाकरीता रक्कम रुपये 1,31,66,800/- चा खर्च केलेला आहे. सदर वर्षातील लेखापरीक्षणासाठी निवड केलेल्या महिन्याचे देयके तपासुन अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत. परंतु, सदरचे अभिप्राय पूर्ण वर्षातील खर्चास लागु राहतील. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) सन 2016-2017 मध्ये पाणी पुरवठा करण्यात आलेल्या अधिग्रहण आदेशामध्ये प्रत्यक्षात पाणी पुरवठयाच्या कालावधी हा सुरुवातीचा / अगोदरचा असतना, तहसील कार्यालय केज यांचे विहीर / बोअर अधिग्रहणाचे आदेश उपरोक्त रकाना क्रमांक 6 प्रमाणे नंतरच्या तारखेचे आहेत. आदेशावर अधिग्रहण सुरु केल्याचा दिनांक नमुद आहे. परंतु, बंद करण्याचा दिनांक नमुद नाही. तसेच देयकासोबत जोडण्यात आलेले आदेश झेरॉक्स प्रती आहेत. त्यामुळे सदरचे आदेश तहसिल कार्यालयाने निर्गमित केल्याबाबत साशंकता निर्माण होते.

अधिग्रहणाचे आदेशानंतर प्राप्त झालेले असताना आदेशापुर्वीच विहीर / बोअर अधिग्रहण केल्याचे दिसुन येते. म्हणजेच तहसील कार्यालयाच्या आदेशापुर्वीच पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. त्याचा प्रमाणकनिहाय अतिरीक्त दिवस 5,921 व अतिप्रदान रक्कम रुपये 23,68,400/- आहे.

2) विहीरीवरुन जर ग्रामस्थांना पाणी दिले असेल, तर कोणत्या ग्रामस्थांनी त्याचा दैनिक फायदा घेतला, याकरीता त्यांच्या स्वाक्षऱ्या घेणे अनिवार्य असताना तशा प्रकारच्या स्वाक्षऱ्या घेतल्या नसल्याचे दिसुन येते.

3) गावातील पाणी टंचाईच्या देयकासोबत त्याकालावधी करीता तलाठी यांची स्वाक्षरी अनिवार्य असताना ती घेण्यात आली नाही.

**4.351 शासकीय पाणीपुरवठा खासगी पाणी टँकरने पाणी टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा देयकातील अनियमिततेबाबत**

**पंचायत समिती पाटोदा, जिल्हा बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समितीने सन 2016-2017 मध्ये वरील ठेकेदारांनी टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरवठा केलेल्या देयकाचे 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 37,08,121/- प्रदान केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी आर सी बुक प्रमाणे टँकरची भारवाहन क्षमता प्रमाणित केलेली यादी (उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांचे पत्र क्रमांक जा क्र 56/आस्था/उपप्रापका/2017, दिनांक 29/03/2017 पत्रानुसार जिल्हा परिषदेला प्राप्त असलेला) च्या आधारे टँकर लॉगबुक्स संचिका इत्यादी अभिलेख्यावरुन टँकर देयकाच्या प्रदानाची तपासणी केली असता सोबत जोडलेल्या जोडपत्र 1 व 2 प्रमाणे संबंधित ठेकेदारास टँकरच्या प्रमाणित भारवाहन क्षमतेपेक्षा जादा भारवाहन क्षमतेने टँकरचे प्रती दिन भाडे व प्रती दिन प्रती किमी भाडे अदा करण्यात आल्याने अनुक्रमे रक्कम रुपये 12,14,153/- व रक्कम रुपये 2,51,827/- असे एकूण रक्कम रुपये 14,65,981/- चे अतिप्रदान झालेले असुन ते वसुलपात्र ठरते.

2) जोडपत्र 3 व 4 मधील सर्व टँकरचे आर सी बुक प्रमाणे वाहन क्षमतेबाबतचे अभिलेखे उपलब्ध झाले नाही. तसेच उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांचे पत्र उपलब्ध न केल्यामुळे सदरील टँकरचे प्रदान सुयोग्य झाले असल्याबाबतची पडताळणी करता आली नाही. जोडपत्र क्रमांक 3 व 4 यांची रक्कम अनुक्रमे रक्कम रुपये 21,32,664/- व रक्कम रुपये 1,09,475/- असे एकूण रक्कम रुपये 22,42,139/- इतकी रक्कम येते. पंचायत समितीने या प्रदानाची पुनःश्च खात्री करुन जादा प्रदान झाले असल्यास ते पण वसुल करणे आवश्यक आहे.

**4.352 शासकीय पाणीपुरवठा खासगी पाणी टँकरने पाणी टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा देयकातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती परळी, जिल्हा बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समितीने सन 2016-2017 मध्ये वरील ठेकेदारांनी टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरवठा केलेल्या देयकाचे 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 58,70,099/- प्रदान केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी यांचे आदेशातील अट क्रमांक 13 व 14 नुसार टँकर ज्या दिवशी पाणी वाहतुकीचे कामी हजर करण्यात येईल, त्यावेळी त्याच्या क्षमतेबाबतची प्रमाणे सादर करण्याची जबाबदारी वाहतुक ठेकेदाराची राहील. तसेच पंचायत समितीकडे आर सी बुकची झेरॉक्स प्रत, गाडी मालकाचे पॅनकार्ड जमा करणे तसेच टँकर कोणत्या गावी पाणी पुरवठा करीत आहे, याबाबत टँकरच्या काचावर गाव नमूद करणे आवश्यक असतानाही पंचायत समितीकडे प्राप्त आर सी बुकच्या झेरॉक्स प्रती अथवा आर सी बुके लेखापरीक्षणास मागणी करुनही उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी आर सी बुक प्रमाणे टँकरची भारवाहन क्षमता प्रमाणित केलेली यादी (उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बीड यांचे पत्र क्रमांक जा क्र 56/आस्था/उपप्रापका/2017, दिनांक 29/03/2017 पत्रानुसार जिल्हा परिषदेला प्राप्त असलेला) च्या आधारे टँकर लॉगबुक्स संचिका इत्यादी अभिलेख्यावरुन टँकर देयकाच्या प्रदानाची तपासणी केली असता जोडपत्र 1, 2, 3 व 4 प्रमाणे संबंधित ठेकेदारास टँकरच्या प्रमाणित भारवाहन क्षमतेपेक्षा जादा भारवाहन क्षमतेने टँकरचे प्रती दिन भाडे व प्रती दिन प्रती किमी भाडे अदा करण्यात आल्याने अनुक्रमे रक्कम रुपये 52,596/-, 7,458/-, 97,860/- व 6,08,259/- असे एकूण रक्कम रुपये 7,66,173/- चे अतिप्रदान झालेले असुन ते वसुलपात्र ठरते. सदर बाब उदाहरणादाखल असून सर्व प्रदानावर नियमानुसार सुयोग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3) जोडपत्र 5, 6, 7, व 8 मधील सर्व टँकरचे आर सी बुक प्रमाणे वाहन क्षमतेबाबतचे अभिलेखे उपलब्ध झाले नाही. तसेच उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बीड यांचे पत्र उपलब्ध न केल्यामुळे सदरील टँकरचे प्रदान सुयोग्य झाले असल्याबाबतची पडताळणी करता आली नाही. जोडपत्र क्रमांक 5, 6, 7, व 8 यांची रक्कम अनुक्रमे 3,03,136/-, 17,04,168/-, 5,23,246/- व 3,07,823/- असे एकूण रुपये 28,38,373/- इतकी रक्कम येते. पंचायत समितीने या प्रदानाची पुनःश्च खात्री करुन जादा प्रदान झाले असल्यास ते पण वसुल करणे आवश्यक आहे.

4) जोडपत्र क्रमांक 5 मधील अनुक्रमांक 04 व 06 टँकर क्रमांक MTB 3737 नुसार आचार्यटाकळी येथे दिनांक 29/05/2016 ते 31/05/2016 तसेच 29/07/2016 ते 31/07/2016 या कालावधीमध्ये टँकरच्या खेपा दर्शवण्यात आलेल्या आहेत. प्रत्यक्षात 3 व 3 अशा एकूण 6 दिवस होत असताना 31 व 31 असे एकूण 62 दिवस

दर्शवून रक्कम रुपये 61,918/- अदाई केलेली आहे. परंतु, प्रत्यक्षात रक्कम रुपये 26,066/- इतकी अदा करणे आवश्यक होते. जादा अदाई रक्कम रुपये 35,852/- वसूलपात्र ठरते.

**4.353 विहीर व बोअर अधिग्रहणाच्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती धारुर, जिल्हा बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती, धारुर चे सन 2016-2017 मध्ये विहीर व बोअर अधिग्रहणाकरीता रक्कम रुपये 30,13,200/- चा खर्च केलेला आहे. सदर वर्षातील लेखापरीक्षणासाठी निवड केलेल्या महिन्यांमध्ये उपरोक्त प्रमाणे रक्कम रुपये 14,15,500/- चे देयके तपासुन अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 मध्ये पाणी पुरवठा करण्यात आलेल्या अधिग्रहण आदेशामध्ये प्रत्यक्षात पाणी पुरवठयाच्या कालावधी हा सुरुवातीचा / अगोदरचा असतना तहसील कार्यालय धारुर यांचे विहीर / बोअर अधिग्रहणाचे आदेश उपरोक्त रकाना क्रमांक 5 प्रमाणे नंतरच्या तारखेचे आहेत. तसेच देयकासोबत जोडण्यात आलेले आदेश झेरॉक्स प्रती आहेत. त्यामुळे सदरचे आदेश तहसिल कार्यालयाने निर्गमित केल्याबाबत साशंकता निर्माण होते

अधिग्रहणाचे आदेशानंतर प्राप्त झालेले असताना आदेशापुर्वीच विहीर/बोअर अधिग्रहण केल्याचे दिसुन येते. म्हणजेच तहसील कार्यालयाच्या आदेशापुर्वीच पाणी पुरवठा करण्यात आलेले दिवस 1,375 इतके असुन त्यापैकी 919 दिवस प्रती दिन रक्कम रुपये 400/- प्रमाणे रक्कम रुपये 3,67,600/- व 456 दिवस प्रती दिन रक्कम रुपये 200/- प्रमाणे रक्कम रुपये 91,200/- असे एकूण रक्कम रुपये 4,58,800/- इतकी वसुलपात्र ठरते.

2) प्रमाणक क्रमांक 21/30.3.17 अन्वये अनुक्रमांक 1, 2 अन्वये दिनांक 13/12/2015 ते 17/01/2016 एकुण दिवस 72 दर्शविले आहे. परंतु, प्रत्यक्ष 35 दिवस येते अनुक्रमांक 1 चे 35 दिवस अनुक्रमांक 2 चे 35 दिवस जादा 70 दिवस दर रक्कम रुपये 200/- रक्कम रुपये 14,000/- जादा प्रदान झाले आहे. सदर रक्कम वसुलपात्र ठरते.

**4.354 खाजगी पाणी टँकरने पाणी टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा देयकातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती धारुर, जिल्हा बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समितीने सन 2016-2017 मध्ये वरील ठेकेदारानी टँकरव्दारे पिण्याचे पाणी पुरवठा केलेल्या देयकाचे 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 46,95,176/- प्रदाने केलेली आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी तसेच उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी आर.सी.बुक प्रमाणे टँकरची भारवाहन क्षमता प्रमाणित केलेली यादी (उप प्रादेशिक परिवाहन कार्यालय, बीड यांचे पत्र क्रमांक जा.क्रं.56/आस्था/उपप्रापका/2017, दिनांक 29/03/2017 आणि पत्र क्रमांक 65, दिनांक 05/04/2017 पत्रानुसार जिल्हा परिषदेला प्राप्त असलेली ) च्या आधारे टँकरचे लॉगबुक्स, संचिका इत्यादी अभिलेख्यावरुन टँकर देयकाच्या प्रदानाची तपासणी केली असता संबंधित ठेकेदारास टँकरच्या प्रमाणित भारवाहन क्षमतेपेक्षा जादा भार क्षमतेने टँकरचे प्रती दिन भाडे व प्रती दिन प्रती कि.मी. भाडे अदा करण्यांत आल्याने अनुक्रमे रक्कम रुपये 70,276/- आणि रक्कम रुपये 4,25,133/- असे एकूण रक्कम रुपये 4,95,409/- एवढया रकमेचे अतिप्रदान झालेले असून ते वसुलपात्र ठरते. तसेच वर नमूद प्रमाणक क्रमांक 01 दिनांक 06/08/2016 अन्वये प्रदान केलेल्या देयकातील टँकर क्रमांक MH-12-M-5138, MH-11AL-4142, MH-14-F-6676, MH-21X2966 तसेच प्रमाणक क्रमांक 01, दिनांक 15/11/2016 अन्वये प्रदान केलेल्या देयकातील टँकर क्रमांक MH-31 M 8911, MH-24 F4393, MH-11 5432, MH-43 E 994, MH-16 B 416, MCU 4049, MH-05 K 7276, या सर्व टँकरचे आर.सी.बुक प्रमाणे वाहन क्षमतेबाबतचे अभिलेख उपलब्ध झाले नसल्याने सदरील टँकरचे प्रदान सुयोग्य झाले असल्याबाबत पडताळणी करता आलेली नाही. पंचायत समितीने या प्रदानाची पुनश्च खात्री करुन जादा प्रदान झाले असल्यास ते पण वसूल करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्च्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 2013/ प्र.क्र.41/पापु-14, दिनांक 04/01/2014 व महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे पत्र जा.क्रं. टंचाई/ प्र.क्र.20/पापु-14,

दिनांक 15/03/2014 मध्ये निर्देशित केल्यानुसार टँकरवर जीपीएस प्रणाली बसवुन त्याचे नियंत्रक उपकरण जी.पी.एस. प्रणालीचे नोडल अधिकार यांचेकडे बसवुन घेवून सदर संगणकीय प्रणालीव्दारे टँकर फेऱ्यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. जी.पी.एस. प्रणालीचा अहवाल उपलब्ध झाला नाही.

**4.355 विहीर व बोअर अधिग्रहणाच्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती शिरुर कासार, जिल्हा बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती, शिरुर सन 2016-2017 मध्ये विहीर व बोअर अधिग्रहणा करिता रक्कम रुपये 5,81,800/- चा खर्च केलेला आहे, सदर वर्षातील लेखापरीक्षणासाठी निवड केलेल्या महिन्याचे देयके तपासुन अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत. परंतु, सदरचे अभिप्राय पूर्ण वर्षातील खर्चास लागु राहतील याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 मध्ये पाणी पुरवठा करण्यात आलेल्या अधिग्रहण आदेशामध्ये प्रत्यक्षात पाणी पुरवठयाच्या कालावधी हा सुरुवातीचा / अगोदरचा असतना, तहसील कार्यालय शिरुर यांचे विहीर / बोअर अधिग्रहणाचे आदेश उपरोक्त रकाना क्रमांक 8 प्रमाणे नंतरच्या तारखेचे आहेत. आदेशावर अधिग्रहण सुरु केल्याचा दिनांक नमुद आहे. परंतु, बंद करण्याचा दिनांक नमुद नाही. तसेच देयकासोबत जोडण्यात आलेले आदेश झेरॉक्स प्रती आहेत. त्यामुळे सदरचे आदेश तहसिल कार्यालयाने निर्गमित केल्याबाबत साशंकता निर्माण होते.

अधिग्रहणाचे आदेशानंतर प्राप्त झालेले असताना आदेशापुर्वीच विहीर/बोअर अधिग्रहण केल्याचे दिसुन येते, म्हणजेच तहसील कार्यालयाच्या आदेशापुर्वीच पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. आदेशापुर्वी अधिग्रहीत केलेल्या कालावधीचे रक्कम रुपये 5,05,100/- लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

2) उपरोक्त विवरणातील अनुक्रमांक 1, 2, 3, 4, 6, 7, 8 व 9 मधील विहिर व बोअर अधिग्रहण नसून इंजीन भाडे आहे. इंजिन भाडे प्रती दिन रक्कम रुपये 300/- प्रमाणे अदा केले आहेत. महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1008/ प्र.क्र.05/पापु14, दिनांक 25/03/2008 नुसार इंजिन भाडे प्रती दिन रक्कम रुपये 100/- प्रमाणे अनुज्ञेय आहे. जादा अदा केलेली रक्कम रुपये 1,53,700/- संबंधीतांकडुन वसुल करुन शासन खाती भरणा करण्यात यावी. सदर रक्कम लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

**4.356 टंचाईग्रस्त गावांना खाजगी टँकरने पाणी पुरवठा देयकातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती शिरुर कासार, जिल्हा बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत 5 प्रमाणकान्वये रक्कम रक्कम रुपये 1,25,10,161/- खर्च करण्यात आला आहे. शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012 / प्र.क्र.53 / पापु.14, दिनांक 30/04/2012 अन्वये पंचायत समिती शिरुरचे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात खाजगी टँकरव्दारे टंचाईग्रस्त गावांना पाणी पुरवठा केलेल्या वाहनांच्या लॉगबुक व संचिकाची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, निर्णय क्रमांक टंचाई 2012 /प्र.क्र.53/पापु 14, दिनांक 30/04/2012 अन्वये अट क्रमांक 2 नुसार पाणी पुरवठा करणाऱ्या टँकर / ट्रकवरील टाकीची पाणी वाहन क्षमता आरटीओमार्फत प्रमाणीत करुन घ्यावी. असे असताना टाकीचे वजन करुन टाकीची क्षमता ठरविली आहे. आरटीओचे प्रमाणपत्र घेतले नाही.

2) जिल्हा परिषद, बीड यांनी पत्र क्रमांक जाक्र ग्रापापु /लेखा-2/ कावि/2017/00481, दिनांक 20/03/2017 अन्वये सकल भारक्षमतेपेक्षा अधिक भार वहन करणाऱ्या वाहनावर दंडात्मक कारवाई करणेबाबत कळविले होते. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांनी त्यांचे पत्र क्रमांक जाक्र 56 /आस्था / उपप्रापका 2017, दिनांक 29/03/2017 नुसार वाहनाची आरसी बुकप्रमाणे क्षमता व प्रत्यक्ष केलेली वाहतुक याची पडताळणी केली. सदर पडताळणीमध्ये सन 2016-2017 मध्ये अदा केलेल्या देयकामधील सोबतच्या विवरणपत्रातील टँकर व त्याच्या क्षमता निदर्शनास आल्या. त्या अनुषंगाने आरसी बुकाच्या क्षमतेप्रमाणे देयक अदा न केल्याने रक्कम रुपये 7,85,344/- इतकी रकमेची जादा अदाई झाली आहे. प्राप्त माहितीमध्ये विवरणपत्रातील टँकर व्यतिरिक्त पाणी

वाहतुक केलेल्या टँकरची क्षमता तपासली नसल्याने सदर टँकरणे क्षमतेइतकेच पाणी वाहतुक केलेबाबत तपासणी करता आली नाही.

**4.357 उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकरचे प्रदानातील अनियमितता व जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती पाथरी, जिल्हा परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती, पाथरीचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकरने पाणीपुरवठा केल्याबाबत खाजगी टँकर वाहतुक ठेकेदार यांना 3 प्रमाणकाद्वारे रक्कम रुपये 40,46,978/- प्रदान केल्याचे दिसुन आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रदानाच्या संदर्भात सादर संचीकेची तपासणी केली असता सदरील टँकर्स 12,000 लिटरचे असल्याचे दर्शवून प्रदान केले आहे. तथापि, सदरील खाजगी वाहनाचे आर.सी. बुक लेखापरीक्षणात उपलब्ध न केल्यामुळे टँकरच्या पाणी क्षमतेची पडताळणी करता आली नाही.

2) लेखापरीक्षणात सदरील टँकर्सची लॉगबुके सादर केली नहीत. देयकासोबत केवळ उपरोक्तपैकी अनुक्रमांक 02 व 03 चे संदर्भात लॉगबुकची झेरॉक्स प्रत जोडल्याचे आढळून आले. तसेच देयकासोबत दररोज सदरील टँकरने किती अंतर प्रवास केला. त्याचे Distance Summery Reports जोडले आहेत. ज्यावरुन केवळ सदरील टँकर त्यादिवशी किती अंतर चालले, हेच नमुद आहे. कोणत्या गावापासुन/उद्भवापासुन पाणीपुरवठा करावयाच्या गावाचे अंतर किती आहे, याचा बोध होत नाही.

3) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई-1005/प्र.क्र.305-पापु-14, दिनांक 24/01/2006 तसेच तहसिलदार, पाथरी यांचे आदेशानुसार टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या गावास प्रत्यक्षात पाणीपुरवठा होतो किंवा कसे हे पाहणे आवश्यक असल्याने संबंधीत गावाला टँकर उपलब्ध करुन दिल्यानंतर वेळच्या वेळी टँकर पोहचला असल्याबाबत टँकर गावात पोहचल्याची तारीख व वेळ याची लॉगबुकमध्ये नोंद करणे आवश्यक आहे. तसेच नियोजीत खेपा होत आहेत किंवा नाही व प्रत्येक खेपेच्या वेळी त्या गावातील पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नियुक्त केलेल्या दोन महिला सदस्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. तथापि, अशी नियुक्तीबाबत अभिलेखे संचिकेत आढळून आली नाहीत. तसेच लॉगबुकाअभावी संबंधीतांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या किंवा कसे, याची पडताळणी करता आली नाही.

4) उक्त प्रमाणकांची व विहिर अधीग्रहणाच्या प्रमाणकांची तपासणी केली असता, सारख्याच गावात खाजगी टँकरने व विहीर अधिग्रहणाच्या माध्यमातुन पाणीपुरवठा केल्याचे दर्शवले आहे तथापि, टँकर पाठविण्याच्या आदेशामध्ये कोणत्या नगरासाठी/भागासाठी खाजगी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे याबाबत उल्लेख केलेला नाही. त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य पाणीपुरवठा झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

5) लेखापरीक्षणामध्ये सादर संचिकेची तपासणीमध्ये विविध कारणांसाठी रक्कम देय नसतांना किंवा देय रककमेपेक्षा जादा रक्कम अदा केलेमुळे रक्कम रूपये 9,17,998/- वसूलपात्र आहे. सदर रक्कम संबंधीतांकडून वसूल करावी.

6) लेखापरीक्षणात सादर संचिकेची तपासणी केली असता, त्यात मौ.टाकळगव्हाण, पाथरगव्हाण बु. येथे खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी तहसिलदार यांचे आदेश अनुक्रमे जाक्र.2015/नैआ/ पाटं/कावि/81/16, दिनांक 08/01/2016 व जा.क्र. 2015/नैआ/पाटं/कावि/80/16, दिनांक 08/01/2016 नुसार दिनांक 30/06/2016 पर्यंत पाणीपुरवठा करण्याबाबत श्री.अण्णाराव संभाजी लाड यांना आदेशीत केल्याचे दिसुन आले. तथापि, मौ.टाकळगव्हाण (दिनांक 23/02/2016 ते 30/06/2016), मौ.जैतापुरवाडी (दिनांक 23/02/2016 ते 27/07/2016), मौ.पाथरगव्हाण बु.(दिनांक 23/02/2016 ते 30/06/2016) व लोणी बु. (दिनांक 23/02/2016 ते 27/07/2016) या कंसात दर्शवलेल्या कालावधीत पाणीपुरवठा करण्याबाबत श्री.ओमप्रकाश कुंदनमल कोटेचा यांना आदेशीत केल्याचे दिसुन आले नाही. याबाबत संबंधीत आदेश दर्शवणे आवश्यक आहे.

7) लेखापरीक्षणात उपरोक्त अनुक्रमांक 01 चे प्रमाणकासंबंधीत मौ.सारोळा बु. येथील श्री.विठ्ठल

आश्रोबा जगताप यांच्या सादर संचीकेची तपासणी केली असता, त्यातील पृष्ठ क्रमांक 27 वर दिनांक 14/04/2016 रोजी सर्वश्री गोपीनाथ उमाजी कदम, आसाराम रामभाउ धोपटे, तुकाराम सोपानराव टाकळकर, अविराज तुकाराम टाकळकर व सुधाकर किशनराव बुलंगे या ग्रामस्थांनी केलेला पंचनामा दिसुन आला आहे त्यात टँकरची दिवसातुन एकच खेप होत असल्याबाबत नमुद केले आहे. याबाबत कोणत्या तारखेपर्यंत एकच खेप मारण्यात येत होती, याबाबत चौकशी करुन पडताळणी करुन जादा खेपांची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

**4.358 2245, नैसर्गिक आपत्ती, उन्हाळी पाणी पुरवठा अंतर्गत खाजगी टँकरने पाणी पुरवठा केलेल्या प्रदानातील अनियमितता व जादा प्रदाना बाबत.**

**पंचायत समिती जिंतूर, जिल्हा परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती, जिंतुरचे 2016-2017 चे लेखापरीक्षाणांस निवड महिन्यांत 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणी पुरवठा अंतर्गत खाजगी टँकरने पाणी पुरवठा केल्याबाबत खाजगी टँकर वाहतुक ठेकेदारांना प्रमाणक क्रमांक 37, दिनांक मार्च 2017 अन्वये रक्कम रुपये 2,39,03,263/- प्रदान केल्याचे दिसुन आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रदानांच्या संदर्भात अनुक्रमांक 1 ते 110 (सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे) संचिकेची व प्रमाणकांची तपासणी केली असता सोबतच्या विवरणपत्रानुसार वेगवेगळया क्षमतेचे टँकर दर्शविण्यात आले आहेत व त्याच्या क्षमतेनुसार दर निश्चितीप्रमाणे रक्कमा प्रदान करण्यात आल्या आहेत. तथापि, खाजगी वाहनांचे मुळ आर.सी. बुक [प्रमाणित सत्यप्रती] लेखापरीक्षणांस सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे वापरलेले वाहने पूर्ण क्षमतेचे असल्याबाबत खात्री करता आले नाही.

2) लेखापरीक्षणांस सदरील टँकरर्सची (अनुक्रमांक 1 ते 110) मुळ लॉग बुके सादर केली असून नियमाप्रमाणे लॉग बुकमध्ये दर्शविलेले सर्व रकाने भरलेली नसून अपूर्ण आहेत लेखापरीक्षण पथकांचे अर्धसमास पत्र क्रमांक 1 दिनांक 14/08/2017, क्रमांक 4 दिनांक 29/08/2017, क्रमांक 5 दिनांक 06/09/2017, क्रमांक 6 दिनांक 07/09/2017, क्रमांक 7 दिनांक 13/09/2017 अन्वये उपरोक्त खर्चाबाबतची सर्व मुळ अभिलेख्यांची मागणी केली असता सादर करण्यात आले नाही. त्यामुळे देयाकासोबत दररोज सदरील टँकरने किती अंतर प्रवास केला, त्याचे Distance Summery Report जोडले आहेत. ज्यावरुन केवळ सदरील टँकर त्या दिवशी किती आंतर चालले, हेच नमुद आहे. गावांपासुन पाणी उदभवापासुन पाणी पुरवठा करावयाच्या गावांचे अंतर किती आहे याचा बोध होत नाही. यासोबत पाणीपुरवठा करणारे टँकर याचे स्पीडो मीटर कोणत्या क्रमांकापासुन सुरु झाले आहेत व केंव्हा बंद झाले आहे, याबाबतचा स्पीडो मीटरचा अहवाल नाही. त्यामुळे गांव व उदभव अंतराची खात्री करता आला नाही.

3) वरूड या गावाच्या प्रमाणकासोबत जोडलेल्या जीपीएस प्रणालीच्या अहवालानुसार दिनांक 01/06/2016 ते 15/07/2016 म्हणजेच 45 दिवसाचा अहवाल आहे. म्हणजेच संबंधीतास 31 दिवसाचे जादा प्रदान झाले आहे. एकुण रक्कम रूपये 1,94,233/- संबंधीताकडुन वसुल करावे.

4) वाघी धानोराच्या प्रमाणकासोबत जोडलेल्या जीपीएसच्या अहवालाप्रमाणे प्रत्यक्षात 45 दिवस पाणीपुरवठा करण्यात आला आहे व 31 दिवसाचे जादा प्रदान झाले आहे. एकुण रक्कम रुपये 2,31,919/- वसुल करावे.

5) अकोली गावाच्या जीपीएस प्रणालीच्या अहवालाप्रमाणे दिनांक 26/06/2016 ते 30/06/2016 या कालावधीसाठी 5 दिवस पाणी पुरवठा करण्यात आला आहे. उर्वरीत 10 दिवसाचे जादा प्रदान करण्यात आले आहे. रुपये 55,058/- जादा प्रदान वसुल करण्यात यावे.

6) चौधरणी गावाच्या जीपीएस प्रणालीचा अहवालासाठी पडताळणी केली असता दिनांक 26/06/2016 ते 30/06/2016 = 5 दिवस पाणी पुरवठा केल्याचे दर्शविण्यात आले आहे. म्हणजेच 10 दिवसाचे जादा प्रदान झाले आहे.

जादा प्रदान रक्कम रुपये 5,31,369/- संबंधीतांकडुन वसुल करावी.

7) लेखापरीक्षण पथकांचे अर्धसमास पत्र क्रमांक 1 दिनांक 14/08/2017, पत्र क्रमांक 4 दिनांक 29/08/2017, पत्र क्रमांक 5 दिनांक 06/09/2017, पत्र क्रमांक 6 दिनांक 07/09/2017, पत्र क्रमांक 7 दिनांक 13/09/2017 अन्वये उपरोक्त खर्चाबाबतचे सर्व मुळ किंवा प्रमाणित केलेले सत्यप्रतीचे अभिलेखे सादर करणेबाबत

कळविण्यात आले आहे. अभिलेख्यांची मागणी केली असता संपुर्ण अभिलेखे सादर करण्यात आले नाहीत. प्रमाणकासोबत जोडलेल्या टँकरने पाणी पुरवठा करण्यात आलेल्या अनुक्रमांक 1 ते 10 यांचे पाणी पुरवठा करण्यासंबंधीचे कार्यालयीन, तहसिलदार यांचे आदेशाची मागणी केली असता संपुर्ण आदेश लेखापरिक्षणांस सादर करण्यात आले नाही. संचिकेची तपासणी केली असता एकुण 24 गावांचेच तहसिलदार यांचे आदेशाची पडताळणी करण्यात आली. उर्वरीत 86 गावांचे तहसिलदार यांचे आदेश पहावयास मिळाले नाहीत. त्यामुळे संबंधीत गावांना पाणी पुरवठा नियमाप्रमाणे तहसीलदार यांचे आदेशाप्रमाणे झाले असल्याची खात्री, पडताळणी करता आली नाही.

**4.359 पाणी टंचाई काळातील पाणी टँकरचे देयक दुबार प्रदान केलेबाबत.**

**पंचायत समिती पुर्णा, जिल्हा परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती, पुर्णा सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणामध्ये टंचाई काळातील टँकरने पाणी पुरवठा करण्यावर रक्कम रुपये 52,63,566/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 128 दिनांक 31/03/2017 मधील उपप्रमाणक (अ) टँकर क्रमांक MH 22 AA 2198 कालावधी दिनांक 20/11/2015 ते 22/02/2016 एकुण 95 दिवस हटकरवाडी येथे पाणी पुरवठा केल्याचे नमुद करुन रूपये 2,67,938/- इतकी रक्कम ठेकेदार आण्णाराव लाड यांना अदा केलेली आहे. परंतु, सदर रक्कम अदा करण्यापुर्वी प्रमाणक क्रमांक 42 दिनांक 31/03/2017 मधील उपप्रमाणक (इ) टँकर क्रमांक MH 22 AA 2198 कालावधी दिनांक 20/11/2015 ते 22/02/2016 एकुण 95 दिवस हटकरवाडी येथे पाणी पुरवठा केल्याचे नमुद करुन रूपये 3,06,346/- इतकी रक्कम ठेकेदार आण्णाराव लाड यांना अदा केली आहे. म्हणजेच टँकर क्रमांक MH 22 AA 2198 या वाहनाने हटकरवाडी येथे पाणी पुरवठा करण्यावर प्रमाणक क्रमांक 42 व प्रमाणक क्रमांक 128 ने एकाच टँकरने एकाच गावात, एकाच कालावधीत पाणी पुरवठा करण्याचे दोन देयके अदा केल्याने दुबार रक्कम ठेकेदारास अदा झालेली आहे. सदर दुबार अदा रक्कम रूपये 3,06,340/- ठेकेदाराकडुन वसुल करावी.

2) प्रमाणक क्रमांक 7 दिनांक 23/03/2017 मधील उपप्रमाणक (ब) MH 04 B 4362 या टँकरकरीता कालावधी दिनांक 19/11/2015 ते 22/02/2016 एकुण 96 दिवस हिवरा येथे पाणी पुरवठा केल्याचे नमुद करुन रूपये 11,97,575/- इतकी रक्कम ठेकेदार आण्णाराव लाड यांना अदा केलेली आहे. त्यानंतर प्रमाणक क्रमांक 128 दिनांक 31/03/2017 मधील उपप्रमाणक क्रमांक (ब) टँकर क्रमांक MH 04 B 4362 कालावधी दिनांक 19/11/2015 ते 22/02/2016 एकूण 96 दिवस हिवरा येथे पाणी पुरवठा केल्याचे नमूद करून रूपये 7,10,344/- इतकी रक्कम ठेकेदार आण्णाराव लाड यांना आदा केलेली आहे. म्हणजेच टँकर क्रमांक MH 04 B 4362 या वाहनाने हिवरा येथे पाणी पुरवठा करण्यावर प्रमाणक क्रमांक 7 व प्रमाणक क्रमांक 128 ने एकाच टँकरने एकाच गावात, एकाच कालावधीत पाणी पुरवठा करण्याचे दोन देयके अदा केल्याने दुबार रक्कम ठेकेदारास अदा झालेली आहे. सदर दुबार अदा रक्कम रूपये 11,97,575/- ठेकेदाराकडुन वसुल करावी.

**4.360 पंचायत समिती, सोनपेठ यांनी खाजगी टँकर अधिग्रहण केल्याबाबत ठेकेदारास मंजुर टँकरची क्षमतेपेक्षा जादा क्षमतेची टँकर लावल्याचे दर्शवुन मंजुर प्रतिदिन व किमी. दरापेक्षा जादा दराने रक्कम मंजुर करुन प्रदान केल्याबाबत.**

**पंचायत समिती सोनपेठ, जिल्हा परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, सोनपेठ सन 2016-2017 मध्ये टंचाई परिस्थितीत गांवाना व वाडी वस्त्यांना पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी लावण्यात आलेले खाजगी टँकर अधिग्रहण मोबदला 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,70,90,485/- प्रदान केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेखापरीक्षण अहवालातील परिशिष्ठ क्रमांक 6 मधील अनुक्रमांक 9 विटा खुर्द या गावासाठी दिनांक 01/04/2016 ते 30/04/2016 साठी रूपये 1,12,560/- मागणी प्रमाणक क्रमांक 1 दिनांक 02/09/2016 मध्ये मंजुर केली असुन सदर कालावधीची रक्कम मागणी प्रमाणक क्रमांक 1 दिनांक 01/03/2017 मध्ये पुन्हा दुबार दिनांक 01/04/2016 ते 31/05/2016 या कालावधीमध्ये रूपये 2,63,047/- मागणी मंजुर केली, त्यामुळे दिनांक

01/04/2016 ते 30/04/2016 या कालावधीची रक्कम रूपये 1,12,560/- दुबार प्रदान झाल्याचे मागणी विवरणपत्रावरुन आढळुन येत आहे.

2) लेखापरीक्षण अहवालातील परिशिष्ठ क्रमांक 6 मधील अनुक्रमांक 45 व 46 उकळी बु. या गावासाठी दिनांक 01/07/2016 ते 31/07/2016 साठी रूपये 1,24,238/- + 1,24,238/- दुबार मागणी प्रमाणक क्रमांक 1 दिनांक 01/03/2017 मध्ये मंजुर केली आहे. रूपये1,24,238/- दुबार प्रदान झाल्याचे मागणी विवरणपत्रावरुन आढळुन येत आहे.

3) सोनपेठ तालुक्यामध्ये पिण्याचे पाणी टंचाई निवारणार्थ खाजगी विहीर / बोअर अधिग्रहण केलेले असुन त्यांना तहसीलदार सोनपेठ यांनी 109 विहीर/बोअर अधिग्रहणास दिनांक 15/07/2016 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्यानंतर दिनांक 16/07/2016 ते 16/08/2016 याकालावधीसाठी कोणतीही मुदतवाढ गटविकास अधिकारी पंचायत समिती, सोनपेठ यांनी मागणी केल्याचे व तहसीलदार, सोनपेठ यांनी मुदतवाढ दिल्याचे आदेश दर्शविले नाही. तसेच या कालावधीत विहीर/बोअर अधिग्रहण करण्यात आलेले नाही. तरीसुध्दा खाजगी टॅंकरकद्वारे गावांना पाणी दिनांक 16/07/2016 ते 16/08/2016 पर्यंत पाणी पुरवठा केल्याचे दर्शवुन ठेकेदारची मागणी मंजुर केली वास्तविक पाहता या कालावधीत विहीर/बोअर अधिग्रहण नाही. त्यामुळे टॅंकरमध्ये पाणी कोठुन भरले, याबाबत खुलासा मागणी करुनही सादर केलेला नाही.

4) परिशिष्टातील अनुक्रमांक 24 कोठाळासाठी खाजगी टॅंकर जीपीएस प्रणालीमध्ये दिनांक 22/02/2016 ते 07/04/2016 या कालावधीमध्ये 1,568 कि.मी. बेरीज येत असतांना मागणीमध्ये 2,664 कि.मी. दर्शवुन जादा 1,096 कि.मी. साठी मागणी केली असुन ती मंजुर करुन प्रदान केली आहे.

5) खपाट पिंप्री (माणिकनगर) खाजगी टॅंकर जीपीएस प्रणालीमध्ये दिनांक 22/02/2016 ते 30/04/2016 या कालावधीमध्ये 2,808 कि.मी. बेरीज येत असतांना मागणीमध्ये 4,320 कि.मी. दर्शवुन जादा 1,512 कि.मी. साठी मागणी केली असुन ती मंजुर करुन प्रदान केली आहे.

6) खपाट पिंप्रीसाठी खाजगी टॅंकर जीपीएस प्रणालीमध्ये दिनांक 01/05/2016 ते 30/06/2016 या कालावधीमध्ये 4,392 कि.मी. बेरीज येत असतांना मागणीमध्ये 6,588 कि.मी. दर्शवुन जादा 2,196 कि.मी. साठी मागणी केली आहे. तसेच दिनांक 01/07/2016 ते 31/07/2016 जीपीएस प्रणालीमध्ये बेरीज येत असुन मागणी विवरणपत्रात 3,348 कि.मी. दर्शवुन 1,188 कि.मी. साठी जादा मागणी केली असुन ती मंजुर करुन प्रदान केली आहे.

7) लेखापरीक्षण पथकाचे अर्धसमास पत्र क्रमांक 2 दिनांक 27/07/2017, क्रमांक 9 दिनांक 31/07/2017, क्रमांक 10 दिनांक 08/08/2017, क्रमांक 13 दिनांक 18/08/2017, क्रमांक 15 दिनांक 22/08/2017 व 16 दिनांक 21/08/2017 व वारंवार मौखिक मागणी करुन देखील टॅंकर अधिग्रहण, खाजगी विहीर/बोअर अधिग्रहण रक्कम मंजुरीबाबतचे अभिलेखे मागणी करुनही लेखापरिक्षणासाठी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सोनपेठ यांनी उपलब्ध करुन दिलेले नाहीत.

8) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सोनपेठ यांनी लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यानुसार व उपरोक्त उणिवांनुसार यासोबत जोडलेले परिशिष्ठ क्रमांक 6 नुसार तहसीलदारांनी मंजुर केलेली टॅंकरची क्षमता, व त्यानुसार अनुज्ञेय होत असलेले प्रती दिन भाडे, प्रती कि.मी. दर, दुबार प्रदान, जीपीएसनुसार व मागणीनुसार कि.मी. अंतरातील जादा कि.मी.साठीची रक्कम, मुदतवाढ नसतांना पाणी पुरवठा केल्याचे दर्शवुन केलेली मागणीची रक्कम असे एकूण रूपये 1,07,92,508/- रक्कम जादा मंजुर करुन प्रदान केल्याचे आढळुन येते. सदर रक्कम वसूल करावी.

**4.361 पंचायत समिती, मानवत यांनी खाजगी टँकर अधिग्रहण केल्याबाबत ठेकेदारास मंजुर टँकरची क्षमतेपेक्षा जादा क्षमतेची टॅकर लावल्याचे दर्शवुन मंजुर प्रतिदिन व किमी. दरापेक्षा जादा दराने रक्कम मंजुर करुन प्रदान केल्याबाबत.**

**पंचायत समिती मानवत, जिल्हा परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती, मानवत सन 2016-2017 मध्ये टंचाई परिस्थितीत गांवाना व वाडी वस्त्यांना पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी लावण्यात आलेले खाजगी टँकर अधिग्रहण मोबदला रक्कम रुपये 1,33,46,499/- प्रदान करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी, परभणी यांनी उन्हाळी पाणी टंचाई 2016 साठी ई-निविदा दिनांक 15/01/2016 अन्वये मागविण्यात येऊन प्राप्त निविदेतुन ओमप्रकाश कुंदनमल कोटेचा यांची निविदा स्विकृत करुन टँकरची पाण्याची क्षमता 1 मे.टन साठी रूपये 109/- प्रती दिन भाडे व 1 मे.टन साठी रूपये 1.49 प्रती कि.मी. दर मंजुर करुन परभणी जिल्हयातील तालुक्यातील गांवात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे

2) उपरोक्त निविदा मंजुरीनंतर तहसीलदार, मानवत यांनी त्यांचे विविध आदेशान्वये एकूण 16 गांवामध्ये प्रत्येकी 6,000, 12,000, 12,500, 13,500, 24,000 लिटर क्षमतेचे टँकरद्वारे टँकरच्या खेपेसह पाणी पुरवठा करणेसाठी मंजुरी दिली आहे. तसेच तहसीलदारांचे अधिग्रहण रद्द करावयाचे आदेश दिनांक 11/07/2016 मध्ये संदर्भ क्रमांक 10 जिल्हाधिकारी, परभणी यांचे भ्रमणध्वनी संदेश दिनांक 10/07/2016 नुसार तालुक्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्यामुळे अग्रिहित करण्यात आलेले सर्व विहीर बोअर अधिग्रहण बंद करण्याचे कळविले. त्यामुळे तहसीलदार, मानवत यांनी आदेश दिनांक 11/07/2016 अन्वये दिनांक 10/07/2016 पासुन सर्व अधिग्रहण रद्द केलेले आहेत.

3) अधिग्रहण केलेल्या विहीर/बोअर तलाठी, मंडळ निरीक्षकामार्फत विहीर गांवाच्या सर्वात जवळ अंतरावर असल्याचे प्रमाणीत करावयाचे आहे. त्यानंतर तहसिलदार यांनी स्वत: विहीर गावाच्या जवळ असल्याची व पाणीपुरवठा होऊ शकेल, याची खात्री करुन तसे आदेशात नमुद करणे आवश्यक आहे. परंतु, असे प्रमाणपत्र दिलेले दिसून आले नाही. त्यामुळे गावाजवळची विहीर अधिग्रहण करुन त्यांनाच रक्कम प्रदान केल्याची खात्री करता आली नाही.

4) यासोबत जोडलेले परिशिष्ट 7 नुसार तहसीलदार मानवत यांनी गावनिहाय टँकर अधिग्रहण आदेशामध्ये टँकरची क्षमता दर्शवून टँकरच्या खेपासह दिनांक 30/06/2016 पर्यंत अधिग्रहणास मंजूरी दिली असून प्रत्यक्षात ठेकेदाराने मंजूर क्षमतेपेक्षा टँकरची जादा क्षमता दर्शवून प्रती दिन भाडे रक्कम व प्रती कि.मी.दरापेक्षा जादा दराने मागणी केली असून ती गटविकास अधिकारी, पंचायत समिती मानवत यांनी कोणतीही मागणी छाननी न करता मंजूर केली.

4) मानवत तालुक्यामध्ये पिण्याचे पाणी टंचाई निवारणार्थ खाजगी विहीर/बोअर अधिग्रहण केलेले असुन त्यांना तहसीलदार मानवत यांनी विहीर/बोअर अधिग्रहणास दिनांक 10/07/2016 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. तहसीलदारांचे अधिग्रहण रद्द करावयाचे आदेश दिनांक 11/07/2016 मध्ये संदर्भ क्रमांक 10 जिल्हाधिकारी परभणी यांचे भ्रमणध्वनी संदेश दिनांक 10/07/2016 नुसार तालुक्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्यामुळे अग्रिहित करण्यात आलेले सर्व विहीर बोअर अधिग्रहण बंद करण्याचे कळविले. त्यामुळे तहसीलदार, मानवत यांनी आदेश दिनांक 11/07/2016 अन्वये दिनांक 10/07/2016 पासुन सर्व अधिग्रहण रद्द केलेले आहेत. त्यानंतर दिनांक 11/07/2016 ते 15/08/2016 या कालावधीसाठी कोणतीही मुदतवाढ गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानवत यांनी मागणी केल्याचे व तहसीलदार, मानवत यांनी मुदतवाढ दिल्याचे आदेश नाहीत. तसेच या कालावधीत विहीर/बोअर अधिग्रहण करण्यात आलेले नाही. तरीसुध्दा खाजगी टॅकरकद्वारे गावांना पाणी दिनांक 11/07/2016 ते 15/08/2016 पर्यंत पाणी पुरवठा केल्याचे दर्शवुन ठेकेदारची मागणी मंजुर केली वास्तविक पाहता या कालावधीत विहीर/बोअर अधिग्रहण नाही. त्यामुळे टँकरमध्ये पाणी कोठुन भरले, याबाबत खुलासा मागणी करुनही सादर केलेला नाही.

5) लेखापरीक्षण पथकाचे अर्धसमास पत्र क्रमांक 2, दिनांक 28/07/2017, क्रमांक 12 दिनांक 16/09/2017, क्रमांक 14 दिनांक 08/09/2017, क्रमांक 15 दिनांक 21/09/2017 व वारंवार मौखिक मागणी करुन देखील टॅंकर अधिग्रहण, खाजगी विहीर/बोअर अधिग्रहण रक्कम मंजुरीबाबतचे मुळ लॉग बुक, आरसी बुक व इतर अभिलेखे जीपीएस प्रणालीत दर्शविलेल्या कि.मी. पेक्षा जादा कि.मी.साठी रक्कम मंजुर करणेबाबत खुलासा, तहसीलदारांचे मंजुरी आदेशात दर्शविलेली टॅंकरची क्षमता व प्रत्यक्षात मागणीमध्ये वाढ केलेली क्षमता, अधिग्रहणास मुदतवाढ नसतांना पाणी पुरवठा केल्याचे दर्शवुन जादा रक्कम मंजुर करणे याबाबत खुलासा/अभिलेखे मागणी करुनही लेखापरिक्षणासाठी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानवत यांनी उपलब्ध करुन दिलेले नाहीत व सर्व अर्धसमास पत्रे अनुत्तरीत ठेवली आहेत.

6) प्रमाणकासोबत जोडलेले लॉग बुकच्या प्रती ह्या, ठेकेदाराने छापून तयार केलेल्या पुस्तकांच्या प्रती जोडल्या असून बहुतांश प्रती हया अस्पष्ट, खाडाखोड व उपरीलेखन केलेल्या आहेत. त्यामुळे मुळ लॉग बुकच्या प्रती लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देणेसाठी अर्धसमास पत्र क्रमांक 14 दिनांक 20/09/2017 अन्वये कळविले असुन कोणतेही कामांचे मुळ लॉगबुक लेखापरीक्षणासाठी उलब्ध करुन दिले नाहीत.

7) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानवत यांनी लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यानुसार व उपरोक्त उणिवांनुसार लेखापरीक्षण अहवालासोबत जोडलेले परिशिष्ठ क्रमांक 7 नुसार तहसीलदारांनी मंजुर केलेली टॅंकरची क्षमता व त्यानुसार अनुज्ञेय होत असलेले प्रती दिन भाडे, प्रती कि.मी. दर, दुबार प्रदान, जीपीएसनुसार व मागणीनुसार किमी. अंतरातील जादा कि.मी.साठीची रक्कम, मुदतवाढ नसतांना पाणी पुरवठा केल्याचे दर्शवुन केलेली मागणीची रक्कम असे एकूण रूपये 74,63,225/- रक्कम जादा मंजुर करुन प्रदान केल्याचे आढळुन येते. सदर रक्कम संबंधीतांकडून वसूल करावी.

**4.362 पंचायत समिती, मानवत यांनी विहीर/बोअर अधिग्रहण प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मानवत, जिल्हा परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती, मानवत सन 2016-2017 मध्ये विहीर अधिग्रहण अधिग्रहण मोबदला रक्कम रुपये 18,71,600/- प्रदान केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 1099/प्र.क्र.12/पापु-14 दिनांक 03/02/1999 प्रमाणे प्रत्येक जिल्हयात दरवर्षी पावसाळा संपल्यानंतर जिल्हयाच्या वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी संबंधीत भागातील सरासरी वार्षीक पर्जन्यमान, चालू पावसाळयात पर्जन्यमानातील फरक, संबंधीत भागातील निरीक्षण विहीरींच्या माहितीवरुन भूजलाच्या पातळीमध्ये आढळलेला फरक तसेच संबंधीत गावांच्या वाडयांच्या 1.5 कि.मी. च्या परिसरातील सार्वजनिक उद्भवातून दरडोई दर दिवशी 20 लिटर्सपेक्षा कमी पाणी उपलब्ध होण्याची शक्यता इत्यादी बाबी तपासून याबाबतचे तपशीलवार माहिती प्रपत्र (अ) व (ब) मध्ये तयार करुन ते संबंधीत तहसीलदार व गटविकास अधिकारी पंचायत समिती यांच्या संयुक्त अहवालासह जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतु, असे केल्याचे प्राप्त अभिलेख्यावरुन दिसून आले नाही.

2) महाराष्ट्र भूजल अधिनियम 1993 अन्वये सतत तीन वर्षापेक्षा जास्त एकाच विहीरीचे अधिग्रहण झाले असेल, तर उपविभागीय अधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी यांनी विहीरीची पाहणी करावयाची आहे. पंचायत समिती, परभणी यांनी अधिग्रहण केलेल्या विहीरी/बोअर तीन वर्षापेक्षा जुन्या अधिग्रहीत असल्याची माहिति दर्शविली नाही.

3) परिशिष्ठातील अनुक्रमांक 1 श्री. सुरज इंदरराव कदम यांची मागणी दिनांक 01/03/16 ते 31/03/2016 रूपये 12,400/- साठीची प्रमाणकासोबत मागणी प्रस्ताव व पाणी पुरवठा विवरणपत्र जोडलेले नाही.

4) अधिग्रहण केलेल्या विहीरी / बोअरवेलच्या प्रदानाची तपासणी केली असता, अधिग्रहण न केलेल्या कालावधीचे किंवा दुबार प्रदानापोटी जादा अदाई रक्कम रूपये 69,200/- अदा केलेली आहे. ती संबंधीतांकडून वसूल करावी.

5) अधिग्रहण केलेल्या विहीर/बोअर तलाठी, मंडळ निरीक्षकामार्फत विहीर गांवाच्या सर्वात जवळ अंतरावर असल्याचे प्रमाणीत करावयाचे आहे. त्यानंतर तहसिलदार यांनी स्वत: विहीर गावाच्या जवळ असल्याची व पाणीपुरवठा होऊ शकेल, याची खात्री करुन तसे आदेशात नमुद करणे आवश्यक आहे. परंतु, असे प्रमाणपत्र दिलेले दिसून आले नाही. त्यामुळे गावाजवळची विहीर अधिग्रहण करुन त्यांनाच रक्कम प्रदान केल्याची खात्री करता आली नाही.

6) अधिग्रहण करणेसाठीचे विहीर / बोअरला पुरेसे पाणी उपलब्ध असल्याबाबत क्षमता चाचणी करुन घेण्यात आलेली नाही.

7) अधिग्रहीत विहीर / बोअरमार्फत पाणी पुरवठा केल्याबाबत बहुतांश मसिक विवरणपत्रे, ज्यावर गावातील महिलांची, सरपंच, ग्रामसेवक, तलाठी यांची स्वाक्षरी असलेले घेण्यात आलेली नाहीत.

**4.363 उन्हाळी पाणीपुरवठा (टंचाई) खाजगी टांकर द्वारे पाणीपुरवठा खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती नांदेड, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 04, दिनांक 10/01/2017 रुपये 57,68,611/- श्री विवेकानंद ट्रान्सलाईन्स, श्रीरामपूर यांना खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा केल्याने देयक प्रदानाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उप कार्यकारी अभियंता (लघूपाटबंधारे) यांचे आदेश क्रमांक जा.क्र.-2016 /जिपना /पापुवि/उपकाअ/67/ 2015-16, दिनांक 18/03/2016 व 23 तहसीलदार यांचे आदेशानुसार टँकरची क्षमता प्रमाणित केलेली आहे. टँकरची क्षमता जास्तीची दर्शविल्याने रुपये 1,11,888/- चे जादा प्रदान झाल्याचे दिसून येते. संबंधिताकडून जादा प्रदानाची रक्कम वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन दर्शवावे.

2) जिल्हाधिकारी यांचे आदेश क्रमांक 2015/मशाका-2/टे-/प्रक्र, दिनांक 30/11/2015 व उपअभियांता बांधकाम यांचे पत्रान्वये पाणी भरण्याच्या ठिकाणापासून पाणीपुरवठा करण्याचे ठिकाणापर्यंतच्या फेरीचे अंतर, फेरींची संख्या, टँकर व टँकरची क्षमता इत्यादी नमूद केले आहे. त्यानुसारचे अंतर व GPS प्रणालीप्रमाणे घेतलेले अंतर यामध्ये मोठी तफावत दिसून येते. करारनामा लिहून घेणारे जिल्हाधिकारी, नांदेड व करारनामा लिहून देणारे विवेकानंद गोरखनाथ शर्मा, श्रीरामपूर, वार्ड क्रमांक -6 समता कॉलनी, तालुका श्रीरामपूर जिल्हा अहमदनगर यांच्यातील करारनाम्यातील अट क्रमांक 10 नुसार खाजगी ठेकेदार यांचे टँकर इंधन भरण्यासाठी जाणे / येणेच्या प्रवासातील अंतर कि.मी. भाडे व त्यासाठीचे इंधन देय असणार नाही. उपरोक्त आदेशात नमूद फेरीचे अंतर, फेरींची संख्या व कामाचे दिवस याप्रमाणे काढलेले अंतर व GPS प्रणालीप्रमाणे घेतलेले अंतर यामध्ये मोठी तफावत दिसून येते. त्यामुळे तक्त्यातील स्तंभ 9 मध्ये दिसून येणारा अंतरातील फरक हा खाजगी ठेकेदार यांचे टँकर इंधन भरण्यासाठी जाणे / येणे च्या प्रवासातील अंतर असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जादा प्रदानाची रक्कम रुपये 4,77,228/- वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन दर्शवावे.

**4.364 उन्हाळी पाणीपुरवठा (टंचाई) खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती कंधार, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 27) -** प्रमाणक क्रमांक 06 दिनांक 21/01/2017 अन्वये रक्कम रुपये 1,29,22,614/- श्री विवेकानंद ट्रान्सलाईन्स श्रीरामपूर यांना खाजगी टँकर द्वारे पाणीपुरवठा केल्याने देयक प्रदानाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उप-कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) मुखेड यांचे आदेश क्रमांक (जावक क्रमांक व दिनांक नमूद नाही.) व तहसीलदार यांचे आदेशानुसार टँकरची क्षमता प्रमाणित केलेली आहे. टँकरची क्षमता जास्तीची दर्शविल्याने रुपये 6,21,588/- चे जादा प्रदान झाल्याचे दिसून येते. जादा प्रदानाची रक्कम संबंधिताकडून वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन दर्शवावे.

2) उपरोक्त देयकाच्या अनुषंगाने पाणीपुरवठा करणाऱ्या टँकरचे लॉगबुकची तपासणी केली असता गावांना पाणी पुरवठा करणारे टँकर मे 2016 व जून 2016 कालावधीत काही दिवस बंद असल्याचे दिसून आले. देयकात

संपूर्ण दिवस पाणीपुरवठा केल्याचे दर्शविल्यामुळे जादा प्रदान झालेले आहे जादा प्रदानाची रक्कम रुपये 1,51,684/- वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन दर्शवावे.

**4.365 खाजगी टँकर भाडे व किलोमीटर भाडे प्रदानातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती किनवट, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती, किनवटचे सन 2016-2017 या कालावधीचे लेखापरीक्षणात 2245-नैसर्गिक आप्पती टंचाई अंतर्गत खाजगी टँकरने पाणीपुरवठा केल्याचे प्रमाणक क्रमांक 5, दिनांक 04/03/2017 अन्वये रक्कम रुपये 13,44,095/- चा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय दिनांक 03/02/1999 अन्वये ज्या गावांना पाणीपुरवठा केलेला आहे, त्या गावांना पाणी टंचाईग्रस्त असल्याचे जाहीर करणे तसेच टँकरचे आदेश देताना आदेशात उद्धवापासून गावाचे अंतर व गावासाठी लागणाऱ्या ट्रीपांबाबत प्रमाणित केलेले अभिलेखेची तपासणी केली असता तहसिलदार, किनवट यांचे आदेशानुसार टँकर क्रमांक MH-20-F-5076 ने मौजे रामपूर / भामपूर येथे पाणी पुरवठासाठी तुलसीराम महादू सिडाम रागोंडखेडी ता.माहूर येथून येणेजाणे अंतर 08 कि.मी. दर्शविलेले असून प्रती दिन 2 फेऱ्या म्हणजे (16 कि.मी.) प्रमाणे 132 दिवसाचे 2,112 कि.मी.चे दर रुपये 18.36 प्रमाणे रुपये 38,776/- प्रदान करणे आवश्यक असतांना GPS अहवालानुसार जादाचे अंतर दर्शवून 5,628 कि.मी. अंतराचे रुपये 1,03,337/- अदाई केलेले आहे. त्यामुळे रक्कम रुपये 64,561/- अतिप्रदान झाल्याचे दिसून येते. सदर रक्कम वसूल करून शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

2) जिल्हाधिकारी, नांदेड यांचे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार टँकर नादुरूस्त अथवा कोणत्याही कारणास्तव बंद पडल्यास कंत्राटदाराने 12 तासाच्या आत दुरुस्त करून पाणीपुरवठा करावे अन्यथा पर्यायी व्यवस्था करावी. जर टंचाई कालावधीत पाणीपुरवठा केले नसल्यास प्रती दिन रुपये 2,500/- प्रमाणे दंडाची रक्कम देयकातून वसूल करावी. असे असतांना टँकर क्रमांक MH-20-F-5076 व टँकर क्रमांक MH-31-AP-5470 चे GPS अहवालानुसार टंचाई कालावधीत अनुक्रमे 16 व 6 दिवस टँकर बंद असून कोणतीही पर्यायी व्यवस्था केल्याचे अहवाल संचिकेत नाही. अहवाल दर्शवुन खात्री पटवावी अन्यथा एकूण 22 दिवसाचे रुपये 2,500/- प्रमाणे एकूण रुपये 55,000/- दंडाची रक्कम वसूल करुन शासन खाती भरणा करावी व अनुपालन दर्शवावे.

3) खाजगी टँकर पंचायत समितीत केंव्हा हजर झाले, त्याचा रुजू अहवाल व दिनांक तसेच पंचायत समिती स्तरावरील तांत्रिक अधिकारी यांनी दिलेला टँकर तपासणी अहवाल संचिकेमध्ये दर्शविले नाही. दर्शवुन अनुपालन सादर करावे.

4) खाजगी टँकर अधिग्रहीत करताना मोटारवाहन अधिनियमाचे कलम (62) (1) (क) नुसार प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याकडून स्वास्थ प्रमाणपत्राची संचिका मागणी करूनही अद्याप दर्शविलेली नाही. सदर सर्व खाजगी टँकरचे RTO कडून मीटर चालू असल्याचे तपासणी केल्याचे व टँकर पाणीपुरवठा करण्यास योग्य असल्याचे अहवाल दर्शविले नाही. त्यामुळे केलेले प्रदान योग्य असल्याची खातरजमा करता आली नाही.

5) जिल्हाधिकारी, नांदेड यांनी कंत्राटदाराशी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार टँकर पाणीपुरवठा केल्याचे GPS अहवालानुसारच प्रत्यक्ष फेऱ्या केल्याचे तपासणी करूनच देयके अदाई करण्यात येईल, असे स्पष्ट असताना GPS अहवालानुसार सर्व टँकरचे मीटर बंद असल्याचे दिसून येते त्यामुळे केलेले प्रदान योग्य असल्याची सत्यता पटत नाही. याबाबत तहसिलदर, किनवट यांनी GPS अहवाल प्रमाणित केल्याचे अहवाल दर्शवून अनुपालन सादर करावे.

**4.366 ग्रामपंचायत मोहाली येथील दलितवस्ती पाणीपुरवठा कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती भोकर, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती, भोकर सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात दलितवस्ती योजनेअंतर्गत पाईप लाईन करणे व विद्युत मोटार बसविणे,

ओटा बांधकाम, सिंटेक्स टाकी बसविणे याकरीता प्रमाणक क्रमांक 03/01-2017 अन्वये रक्कम रुपये 1,80,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाच्या अटी व शर्ती प्रमाणे काम सुरु करण्यापूर्वी 25 टक्के रक्कम प्रथम अदा करावी व तदनंतर प्रत्यक्षात पुर्ण झालेल्या कामाचे मुल्यांकन करुन त्या त्या प्रमाणात रक्कम अदा करावी. जसे 25 टक्के, 50 टक्के, 75 टक्के, 90 टक्के रक्कम अदा केल्यानंतर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी पाहणी करुन 100 टक्के काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर उर्वरीत रक्कम ग्रामपंचायतीस अदा करावी तशी कार्यवाही न करता सुरुवातीस 90 टक्के रक्कम अदा केली आहे.

2) काम पुर्ण झाल्यावर गटविकास अधिकारी यांचे उपयोगिता प्रमाणपत्र व बांधकाम उपविभागाचे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र, ग्रामपंचायतचा ठराव, गटविकास अधिकारी यांचे अंतीम मुल्यांकन प्रमाणपत्र व दलितवस्तीत काम झाल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करुन 10 टक्के निधीची मागणी करावी असे केल्याचे कोणतेही अभिलेखे संचिकेत दिसून येत नाहीत.

3) सदरील काम सुरु करण्यापूर्वी व काम पुर्ण झाल्यावर परिसराची छायाचित्रे घ्यावीत असे नमुद असतांनाही तसे छायाचित्रे घेतलेले नाहीत.

4) कामाचे प्रगती अहवाल दरमहा गटविकास अधिकारी यांनी समाजकल्याण विभागास सादर केले नाही.

5) प्रस्तावित ठिकाणी यापूर्वी कोणत्याही योजनेतून काम झाले नसल्याचे खात्री केल्याचे संचिकेत नमुद नाही.

6) कार्यकारी अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेतील मापांची 5 टक्के तपासणी केलेले नाही.

**4.367 नैसर्गिक आपत्ती अंतर्गत खाजगी टँकरने पाणीपुरवठा केल्याचे खर्चातील अनियमितता व जादा प्रदानाबाबत पंचायत समिती माहुर, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती, माहूरचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात नैसर्गिक आपत्ती टंचाई अंतर्गत खाजगी टँकरने पाणीपुरवठा केल्याबाबत रक्कम रुपये 2,21,256/- चा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खाजगी टँकर पंचायत समितीत कैंव्हा हजर झाले, त्याचा रुजू अहवाल व दिनांक तसेच पंचायत समिती स्तरावरील तांत्रिक अधिकारी यांनी दिलेला टँकर तपासणी अहवाल संचिकेत नाही. दर्शवून अनुपालन सादर करावा.

2) खाजगी टँकर अधिग्रहीत करताना मोटारवाहन अधिनियमाचे कलम (62) (1) (क) नुसार प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याकडून स्वास्थ प्रमाणपत्राची संचिका व सर्व खाजगी टँकरचे RTO कडून मीटर चालू असल्याचे तपासणी केल्याचे व टँकर पाणीपुरवठा करण्यास योग्य असल्याचे अहवाल दर्शविणेबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 13 दिनांक 24/08/2017 अन्वये मागणी करूनही उपलब्ध केले नाही. त्यामुळे केलेले प्रदान योग्य असल्याची खातरजमा करता आली नाही.

3) जिल्हाधिकारी, नांदेड यांनी कंत्राटदाराशी केलेल्या करारनामातील अटी व शर्ती नुसार टँकर पाणीपुरवठा केल्याचे GPS अहवालानुसारच प्रत्यक्ष फेऱ्या केल्याचे तपासणी करूनच देयके अदाई करण्यात येईल, असे स्पष्ट असताना GPS अहवालानुसार सर्व टँकरचे start location व end location चे अंतर सारखेच आहे. यावरून टँकरचे मीटर बंद असताना व गटविकास अधिकारी यांनी GPS अहवाल प्रमाणित केलेले नसताना नियमबाह्य देयक पारित केले आहे.

4) जिल्हाधिकारी, नांदेड यांनी कंत्राटदारासोबत केलेल्या करारनामातील अट क्रमांक 20 नुसार GPS प्रणालीवर ज्या टँकरच्या फेऱ्याची नोंद होईल, त्याच फेऱ्या देयकाकरिता अनुज्ञेय होतील, असे स्पष्ट केलेले असताना व तहसीलदार यांचे आदेशात प्रती दिन 3 फेऱ्या करणे बंधनकारक असताना 2 फेऱ्या केलेले असताना पूर्ण भाडे प्रदान केलेले आहे. टंचाई अंतर्गत पाणीपुरवठा करण्यासाठी तहसिलदार, माहूर यांचे आदेशानुसार एका टंचाईग्रस्त गावात प्रती दिन 3 फेऱ्या करणे बंधनकारक असतांना वरील तपशिलातील टंचाई अंतर्गत गावांना 2 फेऱ्या व 1 फेऱ्यानुसार पाणीपुरवठा केलेले आहे. त्यामुळे टंचाई कालावधीत विहित प्रमाणात पाणीपुरवठा न करता लोकांना

पाण्यापासून वंचित ठेवल्याचे दिसून येते त्यामुळे कमी फेऱ्या केलेल्या दिवसाचे पूर्ण दिवसाची रक्कम देय ठरत नाही. तरी कमी फेऱ्याची प्रदान रक्कम रुपये 26,660/- वसूल करून शासन खाती भरणा करावी.

**4.368 पंचायत समिती उपकर अंतर्गत मौजे विरसनी येथे बोअरमध्ये सिंगल फेज मोटार बसविणे कामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती हिमायतनगर, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती, हिमायतनगर सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात 2215-पाणीपुरवठा व स्वच्छता पंचायत समिती उपकर अंतर्गत विरसनी (पिंपरी) येथे बोअरमध्ये सिंगल फेज मोटार बसविणे कामावर प्रमाणक क्रमांक 1, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रूपये 55,000/- चा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012 / प्र.क्र.-680/ वित्त 9, दिनांक 31/01/2013 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 4 परिशीष्ट 2 नुसार भाग-1 मधील प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार गटविकास अधिकारी यांनी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेची माहिती विषय समिती / स्थायी समितीच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 2 (ख) नुसार सन 1996-1997 या आर्थिक वर्षापासून ग्रामपंचायतीने स्वतंत्र पाणीपुरवठा निधीची स्थापना केली आहे. ग्रामपंचायत स्तरावरील पाणीपुरवठा योजने अंतर्गत दुरुस्तीची सर्व कामे ग्रामपंचायतीने या निधीतून करणे अभिप्रेत आहे तथापि, 14 समाजकल्याण पंचायत समिती उपकर मधून अनावश्यक खर्च केले आहे.

3) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्र.क्र.12, दिनांक 03/02/1999 चे स्थायी आदेश (2) (iii) नुसार ज्या गावात/वाडयात नळ योजनांची विशेष दुरुस्ती करुन संभाव्य टंचाईस तोंड देण्याचे प्रस्तावित असेल, अशा गावांत, वाडयात सदरील दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीतून घेता येईल किंवा कसे, हे प्रथम पडताळून पाहण्यात यावे. जी कामे हाती घेण्यासाठी जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीत रक्कम उपलब्ध असेल, ती कामे ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 18/10/1993 च्या परिशिष्ट (6) मधील सुचनानूसार देखभाल व दुरुस्ती निधीतून घ्यावीत, असे स्पष्ट आहे. जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीत रक्कम उपलब्ध करून न घेता नियमबाह्य पंचायत समिती उपकरमधून दुरुस्तीचे कामावर अनावश्यक खर्च केले आहे, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) जिल्हा परिषद विभागाकडे देखभाल व दुरुस्ती अंतर्गत निधी उपलब्ध आहे किंवा नाही, याबाबतची पंचायत समिती हिमायतनगरने कोणतीही शहानिशा न करता पंचायत समिती उपकर निधीतून खर्च करण्याचे प्रयोजन काय, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) सदर कामाची तपासणी केली असता देयकातून मूल्यवर्धित कर, आयकर, गौणखनीज, विमा व कामगार उपकाराची रक्कम कपात केलेली आहे. परंतु, सदर रक्कम संबंधित खाते भरणा केल्याचे चालन दर्शविले नाही. सदर रक्कम भरणा केल्याचे दर्शवून अनुपालन सादर करून पूर्तता करावी

**4.369 नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ पाणीपुरवठा योजनेतील नियमबाह्यतेबाबत.**

**पंचायत समिती परांडा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11)**

**पंचायत समिती कळंब, जिल्हा उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18)**

**पंचायत समिती लोहारा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ पाणीपुरवठा योजनेतर्गत पंचायत समितींनी टंचाईग्रस्त गावांना खाजगी टॅंकरद्वारे पाणीपुरवठा केला असल्याने खाजगी पाणीपुरवठा वाहतुक ठेकेदार श्री. महमद साजिक इसाक पटेल रा. लातुर यांना प्रमाणकान्वये अनुक्रमे रक्कम रुपये 99,43,458/-, 32,96,194/-, व 1,64,25,173/- असे एकूण 2,96,64,825/- टॅंकरभाडे प्रदान करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक टंचाई 1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24/01/2006 परिच्छेद ब(6) नुसार टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या गावात प्रत्यक्षात पाणीपुरवठा होतो किंवा कसे, हे पाहणे आवश्यक असल्याने संबंधित गावास टँकर उपलब्ध करुन दिल्यानंतर वेळच्यावेळी टँकर पोहचला असल्याबाबत टँकर गावात पोहचल्याची तारीख व वेळ याची लॉगबुकमध्ये नोंद करणे आवश्यक आहे. तसेच टँकरच्या क्षमतेबाबत आणि नियोजित खेपा होत असल्याबाबत प्रत्येक खेपेच्यावेळी त्यागावातील पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या दोन महिला सदस्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. तथापि, लॉगबुकमध्ये वेळ नमुद न करता व टँकरच्या क्षमतेबाबत खातरजमा न करता नियमबाहयरित्या टॅकरचे भाडे प्रदान करण्यात आले आहे.

2) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 1008/प्र.क्र.49/पापु-14, दिनांक 11/06/1999 मधील परिच्छेद 2 नुसार पाणी पुरवठा करणाऱ्या टँकर / ट्रकवरील टाकीची पाणी वहनक्षमता प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यामार्फत प्रमाणित करुन घ्यावी व त्यानुसार टँकर / ट्रकला देण्यात येणारे प्रती दिन व प्रती किमी भाडे 1 मेट्रीक टन एककाच्या प्रमाणत देण्यात यावे. खाजगी टँकरच्या पाणीपुरवठयासाठी वापरण्याच्या क्षमतेची खात्री करण्यासाठी व वाहनाची प्रादेशिक कार्यालयाकडील नोंदणीबाबतची खातरजमा करण्यासाठी वाहनाच्या आर.सी. व टि.सी.बुकच्या प्रमाणित प्रतीची उपलब्ध करुन देण्यात आले नाही. त्यामुळे टँकरच्या क्षमतेबाबत व वाहनाचे परिपुर्ण नोंदणी क्रमांक (वाहनाचे सिरीज क्रमांक) नसल्याने टँकरचे नोंदणीबाबत खातरजमा होवु शकली नाही. तथापि, उपअभियंता (यांत्रिकी), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी क्षमतेबाबत प्रमाणपत्र देवुन त्यानुसार टँकरचे भाडेप्रदान करण्यात आले आहे. सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र दर्शवुन प्रदान योग्य असल्याबाबत खात्री पटवावी.

3) खाजगी टँकरने पाणीपुरवठा केल्यानंतर त्या टँकरच्या धावसंख्येची स्पीडोमीटरनुसार नोंद रोजवहीत दररोज घेणे व त्या नोंदी गटविकास अधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही केलेली नाही.

4) महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक एससीवाय-2016/प्र.क्र.14/म-7, दिनांक 23/02/2016 नुसार नव्याने आदेश काढणे आवश्यक असतांना व 90 दिवसापर्यंतच्या कालावधीकरिता टँकर्स चालु ठेवण्याचे निकष असतांना पुर्वीचेच आदेश कायम ठेवुन 90 दिवसापेक्षा जास्त कालावधीकरिता टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करण्याबाबतचे आदेश देण्यात आल्याने निकषाचे पालन झालेले नाही.

5) तहसीलदार यांनी अनेक प्रकरणी अधिग्रहणाचे पुर्वीलक्षी प्रभावाने आदेश दिलेले आहेत. तरी पुर्वीलक्षी प्रभावाने पाणीपुरवठा असलेबाबत अभिलेखे दर्शविण्यात यावे.

6) विहिर तथा बोअर अधिग्रहित मालकांना प्रदान करण्यात आलेले रकमेचे पोचसंचिकेत आढळून आली नाही.

7) जी.पी.एस. अहवाल सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रमाणित करण्यात आलेला नाही.

**4.370 2245 - नैसर्गिक आपत्ती अंतर्गत केलेल्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती औसा, जिल्हा लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 35) -** नैसर्गिक आपत्ती अंतर्गत रक्कम रूपये 2,13,70,438/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाणीपुरवठा केलेल्या टँकर्सचे लॉगबुक वरील अंतर व जीपी.एस. प्रणाली वरुन घेतलेल्या अहवालावरील अंतर यांचा ताळमेळ घेतला असता जादा अंतराचे प्रदान केल्याचे या अहवालासोबत जोडलेल्या परीशिष्ट अ वरुन दिसून येते. रक्कम रुपये 62,066/- ची वसूली करण्यात यावी. सदर जादा प्रदान हे निवड महिन्यातील असून इतर महिन्यात असे जादा प्रदान झाले नसल्याबाबतचे खात्री पटवावी व जादा प्रदान झाले असल्यास वसुल करुन तसे अनुपालन दर्शवावे.

2) निविदेतील अट क्रमांक 21 अन्वये कंत्राटदाराचे वाहन नादुरुस्त झाल्यास अथवा इतर कोणत्याही कारणामुळे वाहन पाणी पुरवठयाचे काम न करता वाहन उभे असल्यास त्याचे भाडे दिले जाणार नाही असे असतांना खालील विवरणातील तपशीलाप्रमाणे वाहन उभे असतांना रुपये 73,080/- भाडयाची अदाईगी करण्यात आलेली आहे. सदर रक्कम वसुल करून चलनाने भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

3) खाजगी Tanker पाणीपुरवठा साठी प्रथम रुजू होणे पूर्वी वाहन मालकाने वाहनाचे विमा पॉलिसी, वाहन चालकाचा परवाना, PAN कार्ड, वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आर.सी.बुक) इत्यादी कागदपत्रे सदर करावयाची आहेत. परंतु, अशी कार्यवाही पंचायात समितीकडून झालेली नाही.

4) विहीर / बोर अधिग्रहणापूर्वी तहसीलदार यांचे tanker मंजुरी आदेशप्रमाणे पाणी पिण्यायोग्य असलेबाबत आरोग्य विभागाचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक होते. परंतु, अशी कार्यवाही झालेली नाही.

5) पाणीपुरवठा करणेसाठी वापरण्यात आलेल्या खाजगी tanker च्या लॉगबुक वर मक्तेदारच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत.

6) देयकाचे दुबार प्रदान होउ नये यासाठी दुबार प्रदान प्रतिबंध नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

7) अधिग्रहित केलेल्या विहिर / बोअर मालकाने वरीलप्रमाणे विद्युत/डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामग्री उपलब्ध करुन दिल्याबाबत संबंधिताचे विद्युत देयक / डिझेल पंपाच्या क्रमांकासह मोका तपासणीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाही. विहिर मालकांना रुपये 400/- प्रती दिन विहिर अधिग्रहण मोबदला दिलेला योग्य असल्याबाबतची लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

8) तहसिलदार यांनी टँकरव्दारे पाणी पुरवठा तथा बोअर व विहिर अधिग्रहण करणेबाबतच्या दिलेल्या आदेशामध्ये अधिग्रहणाचा सुरुवातीचा व अंतिम दिनांक नमूद नाही प्रत्यक्ष अंतराची खात्री न करताच आदेश दिलेले असल्याने जादा प्रदानाची शक्यता नाकारता येत नाही. तसेच तहसीलदार यांचे आदेशात अधिग्रहित विहिर / बोअरचे सर्व्हे क्रमांक नमूद नाही. एंकदरीत आदेश त्रोटक स्वरुपात काढलेले आहेत.

**4.371 2245-नैसर्गिक आपत्ती अंतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत**

**पंचायत समिती उदगीर, जिल्हा लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती, उदगीर यांनी वित्तिय वर्ष 2016-2017 मध्ये 2245- नैसर्गिक आपत्ती या लेखाशिर्षांतर्गत विहीर, बोअर व टँकर अधिग्रहणावर एकुण रुपये 2,56,75,254/- खर्च नोंदवलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अधिग्रहित केलेल्या विहिर/बोअर मालकाने विद्युत/डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन साम्रगी उपलब्ध करुन दिल्याबाबत संबंधिताचे विद्युत देयक / डिझेल पंपाच्या क्रमांकासह तपासणीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाही. विहिर मालकांना रुपये 400/- प्रती दिन विहिर अधिग्रहण मोबदला दिलेला योग्य असल्याबाबतची लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

2) टँकर क्षमतेबाबत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी दिलेले योग्यता प्रमाणपत्र (Fitness Certificate) जोडण्यात आलेले नाही.

3) पाणीपुरवठा केलेल्या टँकर्सचे मंजूर अंतर व जीपीएस प्रणालीवरुन घेतलेल्या अहवालावरील अंतर यांचा नमुनादाखल ताळमेळ घेतला असता ज्यादा अंतराचे प्रदान झालेचे दिसून येते. अशी ज्यादा अंतराची रक्कम रुपये 31,561/- ची वसूली करण्यात यावी.

सदर जादा प्रदान हे निवड महिन्यातील असून इतर महिन्यातील असे जादा प्रदान झाले नसल्याबाबतचे खात्री पटवावी, अन्यथा ज्यादा झालेले प्रदान हे वसूलात आणून अनुपालन दर्शवावे

4) शासन निर्णय क्रमांक टंचाई-1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24/01/2006 नुसार मुद्दा क्रमांक 7 नुसार उद्भव नोंदवही ठेवून अधिग्रहित केलेल्या विहिर/बोअर वरुन पाणीपुरवठा नियमित होत असल्याची खात्री पर्यवेक्षिय यंत्रणेने वेळोवेळी भेटी देवून केलेल्याबाबत उपलब्ध केलेल्या अभिलेख्यावरुन दिसून आले नाही

5) देयकांचे दुबार प्रदान होऊ नये, यास्तव दुबार प्रदान प्रतिबंध नोंदवही ठेवली नसल्याने देयकांचे दुबार प्रदान झाले नसलेबाबत खात्री पटवावी. तसेच पाणी पुरवठा करण्याचे ठिकाण ते पाणी उदभवाचे ठिकाण यामधील अंतर सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केलेले नसल्याने अंतर वाढीने अतिप्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांमुळे उभय ठिकाणांमधील अंतर योग्य असल्याबाबत खात्री पटवावी.

6) विहिर तथा बोअर अधिग्रहित मालकांना प्रदान करण्यात आलेले रकमेचे पोच संचिकेत आढळून आली नाही. तसेच जी.पी.एस. अहवाल सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रमाणित करण्यात आलेला नाही.

7) लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या विहिर /बोअर वरुन पाणी उचल केलेचे शेतकऱ्यांचे दैनंदिन अहवाल पाहता काही शेतकऱ्यांकडून पाणी पुरवठा बंद असतांनाही टँकर व किलोमिटरचे भाडे अदा करणेत आलेले आहे जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांचे पत्र क्रमांक 2016/महसूल/टंचाई/कावी- दिनांक 31/03/2016 अट क्रमांक 21 नुसार पाणी पुरवठयाचे काम न करता वाहन उभे राहिल्यास त्याचे भाडे अथवा नुकसान भरपाई दिली जाणार नाही, असे आदेश असल्याने टँकर भाडे व किलामीटर भाडे देय होत नाही. तरी रक्कम रुपये 27,270/- वसुल होणे आवश्यक आहे.

8) मंजूर अंतरापेक्षा GPS मध्ये खूपच कमी अंतर दर्शविलेले आहे. याचाच अर्थ सदर दिवशी टँकर बंद असलेने कमी अंतर GPS मध्ये दिसून येते. तरी रक्कम रुपये 5,555/- वसुल होणे आवश्यक आहे.

9) टँकर अधिग्रहण संबंधाने लेखापरीक्षणास सादर केलेली टँकरची लॉग बुक्स विहित नमून्यात नाहीत अंतर नमूद केलेले नाही. त्यांमध्ये खाडाखोड, उपरी लेखन, व्हाईटनर चा वापर केलेला आहे. लॉग बूकांमध्ये सरपंच व ग्रामसेवक यांच्या सहया आहेत. इतर सदस्यांच्या सहया नाहीत. त्यामुळे लेखांकन वैध असलेची खात्री पटत नाही.

10) जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांचे पत्र क्रमांक 2015/महसूल/टंचाई/कावी-708, दिनांक 18/06/2015 अट क्रमांक 09 नुसार, टँकर व विहीर अधिग्रहण यांची देयके अदा करण्यांपूर्वी संबंधीत तहसिलदारांचा अभिप्राय नस्तीवर घेऊनच देयक अदा करावे, असे आदेश असतांना त्याचे पालन झालेले नाही. तसेच देयके अदा करतांना शासन आदेश व करानाम्यांतील अटि व शर्ती यांचे पालन झालेबाबतचे पृष्ठांकन देयकांवर देणेत आलेले नाही.

**4.372 2245 - नैसर्गिक आपत्ती अंतर्गत केलेल्या खर्चाबाबत.**

**पंचायत समिती अहमदपूर, जिल्हा लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 23) व**

**पंचायत समिती जळकोट, जिल्हा लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती, जळकोट सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा यासाठी रक्कम रुपये 2,18,84,000/- अनुदान प्राप्त झालेले असून सदरील बाबीवर पंचायत समितीने दिलेल्या विवरणानुसार 1,94,02,000/- चा खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाणीपुरवठा केलेल्या टँकर्सचे लॉगबुकवरील अंतर व जीपी.एस. प्रणालीवरुन घेतलेल्या अहवालावरील अंतर यांचा ताळमेळ घेतला असता जादा अंतराचे प्रदान केल्याचे दिसून येते. पंचायत समिती, जळकोटकडील रक्कम रूपये 10,04,731/- व पंचायत समिती अहमदपूरकडील रक्कम रूपये 20,60,914/- वसूल करावी. सदर जादा प्रदान हे निवड महिन्यातील असून इतर महिन्यात असे जादा प्रदान झाले नसल्याबाबतचे खात्री पटवावी व जादा प्रदान झाले असल्यास वसुल करुन तसे अनुपालन दर्शवावे.

2) खाजगी टँकर पाणीपुरवठा साठी प्रथम रुजू होणेपूर्वी वाहन मालकाने वाहनाचे विमा पॉलिसी, वाहन चालकाचा परवाना, पॅन कार्ड, वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आर.सी.बुक) इत्यादी कागदपत्रे सादर करावयाची आहेत. परंतु, अशी कार्यवाही पंचायात समितीकडून झालेली नाही.

3) पाणीपुरवठा करणेसाठी वापरण्यात आलेल्या खाजगी टँकरच्या लॉगबुक वर मक्तेदारच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत.

4) पाणीपुरवठा करणेसाठी वापरण्यात आलेल्या खाजगी टँकरचे लॉगबुक पृष्ठांकीत करून गट विकास अधिकारी यांनी प्रमाणित केलेले नाही.

5) देयकाचे दुबार प्रदान होउ नये यासाठी दुबार प्रदान प्रतिबंध नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

6) अधिग्रहित केलेल्या विहिर / बोअर मालकाने वरीलप्रमाणे विद्युत / डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामग्री उपलब्ध करुन दिल्याबाबत संबंधिताचे विद्युत देयक / डिझेल पंपाच्या क्रमांकासह मोका तपासणीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाही. विहिर मालकांना रुपये 400/- प्रती दिन विहिर अधिग्रहण मोबदला दिलेला योग्य असल्याबाबतची लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

7) शासन निर्णय क्रमांक टंचाई-1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24/01/2006 नुसार मुद्दा क्रमांक 7 नुसार उद्भव नोंदवही ठेवून अधिग्रहित केलेल्या विहिर/बोअर वरुन पाणीपुरवठा नियमित होत असल्याची खात्री पर्यवेक्षिय यंत्रणेने वेळोवेळी भेटी देवून केलेल्याबाबत उपलब्ध केलेल्या अभिलेख्यावरुन दिसून आले नाही

8) तहसिलदार यांनी टँकरव्दारे पाणीपुरवठा तथा बोअर व विहिर अधिग्रहण करणेबाबतच्या दिलेल्या आदेशामध्ये अधिग्रहणाचा सुरुवातीचा व अंतिम दिनांक नमूद नाही. प्रत्यक्ष अंतराची खात्री न करताच आदेश दिलेले असल्याने जादा प्रदानाची शक्यता नाकारता येत नाही. तसेच तहसीलदार यांचे आदेशात अधिग्रहित विहिर / बोअरचे सर्व्हे क्रमांक नमूद नाही. एंकदरीत आदेश त्रोटक स्वरुपात काढलेले आहेत.

**4.373 2245-नैसर्गिक आपत्ती अंतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती रेणापूर, जिल्हा लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 28) -** पंचायत समिती, रेणापूर यांनी वित्तिय वर्ष 2016-2017 मध्ये 2245 नैसर्गिक आपत्ती या लेखाशिर्षांतर्गत विहीर, बोअर व टँकर अधिग्रहणावर एकुण रुपये 1,96,19,883/- खर्च नोंदवलेला आहे. वित्तिय वर्ष 2016-2017 मधील उक्त लेखाशिर्षांतर्गत प्राप्त प्रमाणकांच्या अभिलेख्यांचे खर्चासंबंधात लेखापरीक्षण केले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अधिग्रहित केलेल्या विहिर/बोअर मालकाने वरीलप्रमाणे विद्युत/डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामग्री उपलब्ध करुन दिल्याबाबत संबंधिताचे विद्युत देयक /डिझेल पंपाच्या क्रमांकासह मोका तपासणीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाही. विहिर मालकांना रुपये 400/- प्रती दिन विहिर अधिग्रहण मोबदला दिलेला योग्य असल्याबाबतची लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

2) टँकर क्षमतेबाबत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी दिलेले योग्यता प्रमाणपत्र (Fitness Certificate) जोडण्यात आलेले नाही.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्र.क्र.पापु-14, दिनांक 03/02/1999 नुसार, टँकरची मागणी आलेल्या गावांची यादी भूवैज्ञानिक यांचेकडून तपासणी करुन त्यांचे विहित नमुन्यातील प्रपत्र-ब घेतल्याचे अभिलेखे संचिकेत दिसून आले नाहीत.

4) शासन आदेशानुसार विहित अंतराच्या अटिचे पालन झालेले नसलेने रक्कम रुपये 2,86,867/- नियमबाहय प्रदान झालेले आहे ते वसूल होणे आवश्यक आहे. तसेच या अटीसंबंधाने इतर अनेक देयकांमध्ये कांही दिनांकास GPS अहवालांमध्ये 01 कि.मी. पेक्षाही कमी अंतर दर्शविले आहे. अशा अंतराची पडताळणी करुन चुकीचे प्रदान झाले असलेस वसूल करुन अनुपालन दर्शवावे.

5) पाणीपुरवठा केलेल्या टँकर्सचे मंजूर अंतर व जीपीएस प्रणालीवरुन घेतलेल्या अहवालावरील अंतर यांचा नमुना दाखल लेखापरीक्षण अहवालासोबत जोडलेले विवरणपत्र “अ” प्रमाणे ताळमेळ घेतला असता GPS द्वारा ज्यादा अंतराचे प्रदान झालेचे दिसून येते. अशी ज्यादा अंतराची रक्कम रुपये 83,143/- ची वसूली करण्यात यावी. अशा प्रकारचे प्रदान इतर देयकांतही झाले असण्याची शक्यता आहे. तरी यांबाबत अंतर्गत लेखापरिक्षणाधारे ताळमेळ घेऊन अनुपालन दर्शवावे.

6) लेखापरीक्षण अहवालासोबत संलग्नित विवरणपत्र “ब” मध्ये दर्शविलेल्या नमुनादाखल उदाहरणांच्या प्रमाणकांचे केवळ जी.पी.एस. प्रमाणे अंतरे विचारात घेऊन प्रदान केलेले आहे. अंतरांची खात्री करणेसाठी इतर कोणतेही पुरावे अजमावले नाहीत उदा. एकाच गावासाठी पाण्याचा उद्भव व पाणी पुरवठा करण्याचे ठिकाण, त्यांना मंजूर असणाऱ्या टँकरच्या खेपा इत्यादी पाहता एकाच गांवचे जी.पी.एस मधील दिनांकनिहाय अंतरामध्ये खूपच तफावत आहे. त्यांमुळे सदर प्रमाणकांतील जी.पी.एस. अंतराची व प्रत्यक्ष अंतराची, मंजूर टँकरच्या खेपांची संख्या इत्यादींची अंतर्गत लेखापरीक्षणाद्वारे तपासणी करुन अतिप्रदानाची वसूली करुन अनुपालन दर्शवावे. तसेच विवरणपत्राच्या शेरा रकान्यात दिलेल्या अभिप्रायांचीही पूर्तता दर्शवावी. टँकर बंद असणाऱ्या दिनांकास नियमानुसार कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

7) लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या जी. पी. एस. अहवालाद्वारे पाणी पुरवठा बंद असतांनाही टँकरचे भाडे अदा करणेत आलेले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांचे पत्र क्रमांक 2016/महसूल/टंचाई/कावी, दिनांक 31/03/2016 अट क्रमांक 21 नुसार, पाणी पुरवठयाचे काम न करता वाहन उभे राहिल्यास त्याचे भाडे अथवा नुकसान भरपाई दिली जाणार नाही, असे आदेश असल्याने टँकर भाडे देय होत नाही. सबब, रक्कम रुपये 5,08,790/- वसुल होणे आवश्यक आहे. तसेच एकाच क्रमांकाच्या टँकरचे प्रती दिन भाडे उदाहरण MH-24F 4261 वेगवेगळे दर्शविले आहे. त्याचा खुलासा होणे आवश्यक आहे अन्यथा ज्यादाची रक्कम वसूल करुन अनुपालन सादर करावे. वरील दर्शविण्यात आलेला तक्ता उदाहरणादाखल असून अशा प्रकारची अनियमितता ही संपूर्ण लेखापरीक्षण वर्षामध्ये झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब याप्रमाणे सर्व प्रदानांची तपासणी करुन अनुपालन दर्शवावे.

8) सन 2016-2017 या कालावधित टँकर बंद असून टँकरचे भाडे अदा करण्यात आले आहेत. टँकर कोणत्या कारणास्तव बंद होता, याबाबतचे अभिलेखे दर्शवावे. तसेच टँकर मालकाच्या चुकी / दुरुस्तीमुळे टँकर बंद असेल, तर रक्कम रूपये 1,06,944/- वसूलात आणावी आणि जर शासकीय कारणास्तव असेल, तर तसे अभिलेखे दर्शवावे. सदर रक्कम उदाहरणादाखल असून अशा प्रकारची अनियमितता ही संपूर्ण 2016-2017 या वर्षामध्ये झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब याप्रमाणे सर्व प्रदानांची तपासणी करुन अनुपालन दर्शवावे, अन्यथा रक्कम रुपये 1,06,944/- वसूल करुन अनुपालन दर्शवावे.

9) जी पी एस अहवालांमध्ये नमूद अंतरापेक्षा देयकांत ज्यादाचे अंतराने रक्कम प्रदान केलेमूळे रक्कम रुपये 6,477/- चे नुकसान झालेले आहे. ते वसूल होणे आवश्यक आहे.

10) सरासरी अंतरापेक्षा GPS प्रणालीमध्ये अंतर वाढल्याचे दिसून येते. त्या रकमेची वसूली रुपये 13,552/- होणे आवश्यक आहे. अशाच प्रकारच्या गंभीर अनियमितता अनेक देयकांमध्ये झालेल्या आहेत. त्यांची अंतर्गत लेखापरिक्षणाद्वारे तपासणी करुन अतिप्रदानाची रक्कम वसूल करुन अनुपालन सादर करावे

11) टँकर अधिग्रहणाच्या देयकाच्या प्रदानात टँकर भाडयाचे अतिप्रदान झालेमुळे रक्कम रुपये 97,440/- ची वसूली होणे आवश्यक आहे.

12) तहसिलदार व उप अभियंता (बांधकाम) उपविभाग, जिल्हा परिषद, लातूर यांनी त्यांचे आदेशांत एकाच गावचा उद्भव व पाणी पुरवठा ठिकाणाचे अंतर वेगवेगळे दिलेले आहे. त्यांमूळे शासनाचे रक्कम रुपये 2,26,042/- चे नुकसान झालेले आहे. ते वसूल होणे आवश्यक आहे. तसेच उक्त लेखाशिर्षांतर्गत प्रदान केलेल्या देयकांच्या संबंधात सर्व अंतरांची सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत प्रशासकिय व तांत्रिक चौकशी होऊन ज्यादा अंतराने प्रदान झालेल्या सर्व रक्कमांची वसूली करुन साधार अनुपालन दर्शवावे.

13) टँकर अधिग्रहण संबंधाने लेखापरीक्षणास सादर केलेली टँकरची लॉग बुक्स विहित नमून्यात नसून त्यांमध्ये अंतर नमूद केलेले नाही. वाहन आलेची वेळ आणि नेहलेची वेळ नमूद नाही. अनेक रकाने कोरे सोडलेले आहेत. लॉगबुक्स मध्ये खाडाखोड, उपरी लेखन, व्हाईटनरचा वापर केलेला आहे. अशा ठिकाणी सक्षम अधिकाऱ्यांनी साक्षांकन केलेले नाही. लॉगबुकांमध्ये सरपंच व ग्रामसेवक यांच्या सहया आहेत. इतर सदस्यांच्या सहया नाहीत. इत्यांदीवरुन वाहनांचे लॉगबुक्स वरील लेखांकन वैध असलेची खात्री पटत नाही. तरी यांबाबत उचित खात्री पटवावी.